भारतीय प्रभावी पुरुष

लेखक

रसिकलाल दामोदरदास मेहेता, बी.ए

व

शांतिलाल खेमचंद शाह

वी. सं. २४६८ (इ. स. १९४२)

महाराष्ट्र जैन साहित्य प्रकाशन समिति

चांदवड (जि. नाशिक)

मूल्य एक रुपया

प्रकाशक —
रमणलाल दामोदरदास मेहेता,
चिटणीस– महाराष्ट्र जैन साहित्य प्रकाशन समिति
चादवड (जि. नाशिक)

मुद्रक —
लक्ष्मण नारायण चापेकर
आर्यसस्कृति मुद्रणालय
१९८(१७) सदाशिव पेठ
टिळक रस्ता, पुणे २

प्रस्तावना

॥ वन्दे फणिफणमण्डितदेहं पार्श्वं निजहितगतसंदेहम् ॥

मगध देशांतील बिंबिसार-अशोकादि चक्रवर्तीपासून तो आंध्र, कर्नाटक व गुजरातेतील कुमारपालापर्यंतच्या जैन राजेमहाराजानी विदर्भ, महाराष्ट्र व कोंकण देशावर इ. स. पूर्वी पाचव्या शतकापासून इ. स. नंतर बाराव्या शतकापर्यंत अधूनमधून राज्ये केली. तेव्हा अर्थात्‌च महाराष्ट्रात जैन वस्ती व मंदिरे अगणित असली पाहिजेत व जैनवाङ्मयही विपुल असले पाहिजे. पण दुर्दैवाची गोष्ट ही की डोंगरातील काही लेण्याशिवाय बृहन्महाराष्ट्रात जैन संस्कृतीचे नाव घेण्याजोगे दुसरे नावनिशाणहि उरलेले नाहीं. नाही म्हणावयास बडोद्यास भरलेल्या श्वेतांबर कान्फरन्सच्या अधिवेशनात लो. टिळकानी केलेल्या आपल्या भाषणात म्हटल्याप्रमाणे 'दक्षिणेतील व गुजरातेतील ब्राह्मण निवृत्तमांस आहेत हा जैन राज्यात ब्राह्मणावर झालेला परिणामच असल्यामुळे हा एक अप्रत्यक्ष जैन अवशेषच म्हणावयास हरकत नाहीं. लिंगायत, वारकरी व महानुभाव या पंथांच्या तत्त्वज्ञानावर व धर्माचारावर जैन संस्कृतीची छाप पडलेली उघड दिसत असल्यामुळे हाही जैन संस्कृतीचाच एक अवशेष म्हणता येईल'.

सुदैवाने कित्येक कर्नाटकी, मारवाडी व गुजराती जैन गेल्या काही शतकापासून बृहन्महाराष्ट्रात व्यापारी व जमीनदार म्हणून राहात आले आहेत. त्यांच्या वास्तव्यामुळे महाराष्ट्रात ठिकठिकाणीं जिनालये दिसून येत आहेत व काही ठिकाणीं प्राचीन ग्रंथसंग्रहही त्यानी केलेला आहे. महाराष्ट्रांत जो जीवदयेचा प्रचार होत आहे त्याचे श्रेय जैन लोकानाच आहे. मराठी वाङ्मयात कोल्हापूर व सोलापूरकडील जैनानीं थोडीशी भर टाकली आहे. तरीपण त्या दृष्टीने व्हावें तसे कार्य अजून मुळींच झाले नाहीं ही गोष्ट कोणालाही कबूल करावी लागेल. तरुण पिढींत या दृष्टीने अधिक उत्साह दिसत आहे व महाराष्ट्र जैन-साहित्य-प्रकाशन-समिति ही संस्था या वाढत्या जागृतीचेच प्रत्यंतर होय.

वरील समितीतर्फे हें जें प्रथम प्रकाशन प्रसिद्ध होत आहे त्यात अमदाबादचे नगरशेट शांतिदास, जगद्गुरु श्रीहीरविजयसूरि व तीर्थंकर प्रभु पार्श्वनाथ, ह्या तीन प्रभावी महापुरुषांचीं त्रोटक चरित्रे देण्यात बरेच औचित्य दाखविले गेले आहे. सर्वच तीर्थंकरानीं जैन धर्माची प्रभावना जास्तींत जास्त केली हें उघडच आहे; तरी पण श्रीपार्श्वनाथ तीर्थंकरांच्या नावानें बरीच अधिक प्रभावना झाली ही गोष्ट हिन्दुस्तानभर त्यांचींच मंदिरे अधिक आहेत यावरून प्रत्यक्षच दिसत आहे. तीर्थंकराचे खालोखाल धर्मप्रभावना जैनाचार्य करतात, व अर्वाचीन काळात श्रीहीरविजयसूरींनीं या बाबतींत अप्रतिम कार्य केलें आहे ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. जिनशासनप्रेमी श्रावक धर्मप्रभावनेचे कार्य कसे उत्कृष्टपणें करूं शकतो याचें नमुनेदार उदाहरण म्हणजे शांतिदासशेट होत. तेव्हा धर्मवीर नगरशेठ शांतिदास, अकबरप्रतिबोधक जगद्गुरु श्रीहीरविजयसूरि व प्रकटप्रभावी तीर्थंकर प्रभु पार्श्वनाथ यांच्या चरित्राचे संकलन ह्या ग्रंथात केल्याबद्दल लेखक अभिनंदनास पात्र आहेत.

कौरव-पांडवांच्या भारतीय महायुद्धानंतरची प्रतिक्रिया म्हणून प्रभु पार्श्वनाथ अवतरले व त्यांचें नाव अखिल भरतखंडात अहिंसा, संयम, तप, शांति, संतोष व सदुद्यम या गुणांचा प्रसार करण्यास शतकानुशतकें कारणीभूत होत आले असल्यामुळे वैदिकानाही त्यांचें समग्र चरित्र अभ्यासणे आवश्यक आहे. त्यांच्या चरित्राचे बाबतीत दिगंबर व श्वेतांबर कथनात कांहीं फरक असला तरी तेवढ्यानें पूज्यतेत फरक येऊं देणे बरें नाहीं व येतही नाही. जैनाचार्य हीरविजयसूरींनीं आपल्या तत्त्वनिष्ठेने, निर्भीड प्रवचनाने व तपःसिद्धीने अकबर बादशहासारख्या चिकित्सकावरही इतकी छाप पाडली कीं त्यानेच सूरींना जगद्गुरु ही पदवी दिली व त्यांच्या आज्ञेनुसार स्वतः काहीं जैन व्रते घेतलीं. शत्रुंजयादि तीर्थांना अपाय न पोहोचूं देण्याबद्दलही फर्मानें काढलीं व काहीं तिथींना कत्तल बंद करण्याचेंही हुकूम सोडले. या कामगिरीने श्वेतांबराना तर सूरींनीं कायमचें ऋणी करून ठेवलेच आहे पण दिगंबरानाही ह्याबद्दल अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. एवढेच नव्हे तर सर्व हिंदु समाजालाही मुसलमान बादशहाला नमविणाऱ्या जगद्गुरूमुळें आपला गौरव झाला असेंच वाटणार हे उघड आहे.

नगरशेट शांतिदासाच्या धर्मप्रेमाबद्दल, त्यागाबद्दल, कलाकौशल्याबद्दल व व्यवहारचातुर्याबद्दल त्याचे जेवढे गोडवे गावेत तेवढे थोडेच आहेत. आपल्या आयुष्यात त्यांनीं अकबर तो औरंगजेबापर्यंतचे चार बादशहा पाहिले व जव्हेरीमम्मा म्हणवून घेण्याइतक्या घरोब्यापासून तो मंदिराची मशीद झालेली पाहाण्यापर्यंतचे उन्हाळेपावसाळेहि त्यांनीं अनुभवले. बादशहाना वेळोवेळी त्यानी कर्जें दिली, जडजवाहीरें देऊन ऋणी केले व अकबरावर रुसलेल्या बेगमचा भगिनी म्हणून पाहुणचारही केला. तरी पण औरंगजेबाने सुभेदारी गाजवून मंदिराची मशीद बनविलीच. एकदा झालेली मशीद ती कायमचीच मशीद हा कडवा कायदाही शहाजहानने तोडला. पण एकदा गाईचे रक्त सांडले म्हणून कलासंपन्न व विशाल जिनमंदिरही कायमचेच भ्रष्ट मानण्याचा हट्ट मात्र सनातन्यानी सोडला नाही. यावरून इतरांच्या उपसर्गापेक्षा आपलेच दुराग्रह हिंदुसमाजाला कसे नडत आले आहेत हे स्पष्ट दिसून येते. असो.

आपल्या गुणाचा व उपयोगाचा मोबदला म्हणून धर्मवीर शांतिदास-शेटनी स्वतःसाठी किंवा घराण्यासाठीं काहीही न मागता तीर्थरक्षणा-साठींच फर्माने घेतली ही त्यांची धर्मभक्ति सर्वस्वी वाखाणण्याजोगी व अनुकरणीय अशीच आहे. अकबराने पालख्या-मेणे पाठविले तरी आपले पादचारी व्रत श्रीहीरविजयसूरींनी सोडले नाही ही त्यांची धर्मनिष्ठा त्याना व समाजालाही हितकारकच झाली. तात्पर्य, वरील तिन्ही चरित्रे सर्व वाच-कांना उद्बोधक होतील अशींच आहेत यात शंका नाही.

तीर्थंकरासारख्या अलौकिक व्यक्तींचे चरित्र लिहिणे अनेक दृष्टीनीं कठिणच आहे. म्हणूनच सांप्रदायिक पद्धतीने लिहिलेल्या चरित्रांशिवाय अधिक ग्रंथ तीर्थंकरांच्या चरित्रावर झालेले आढळत नाहींत. काही कवींनी आपली काव्यशक्ति दाखविण्यासाठीं तीर्थंकरचरित्रे लिहिली आहेत व अलिकडे ऐतिहासिक दृष्टीने तीर्थंकरचरित्रे लिहिण्याचा प्रयत्न होत आहे. पण लहानथोराना सर्वसामान्यपणे व ऐतिहासिक दृष्टीने तीर्थंकरांच्या जीवनाचा परिचय करून देणे एवढाच साधा हेतु प्रस्तुत ग्रंथाचा असणार. त्या दृष्टीनेच या ग्रंथाकडे पाहून जुन्या दृष्टीची जैन मंडळी या प्रयत्नावर टीका न करतील तर बरे. कारण श्री. कांतिलाल शहांनीं अमळनेरहून

विद्यार्थिदशेत लिहिलेले लहानसे महावीरचरित्रहि जैनजैनेत्तर जनतेत जैनविषयक ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने बरेच उपयुक्त ठरले आहे. श्रीहीरविजयसूरि व नगरशेट शातिदास याच्या चरित्राचे लिखाण उत्कृष्ट साधले आहे ही गोष्ट वाचकाना दिसून यईलच. प्राचीन काळी कऱ्हाड, कोल्हापूर, मान्यखेड, पैठण, देवगिरी, नाशिक वगैरे ठिकाणी बसून पडितानी जैन ग्रथसपत्ति ज्या महाराष्ट्रात निर्माण केली त्या महाराष्ट्रात जसे व जितके जैनग्रथ निर्माण होतील तितके आवश्यकच आहेत ही गोष्ट लक्षात घेऊन या समितीचे हे ग्रथप्रकाशनाचे प्रयत्न सर्वांना पुरस्करणीय आहेत. युरोपियन पंडितांनीं बौद्धवाङ्मयात लक्ष घातले म्हणून हिंदी विद्वानानीही बौद्धवाङ्मयाकडे युरोपियन दृष्टीनेच लक्ष दिले. जैनवाङ्मयाच्या बाबतींतही तीच चूक घडत आहे आणि लक्षही कमीच दिले जात आहे. खरे पाहता बौद्धासारख्या एकातिक मतापेक्षा जैनासारख्या सार्वांगिक व हिदु धर्माला मूलभूत असलेल्या जैनसंस्कृतीचा अभ्यास सर्व विद्वानानी अधिक केला पाहिजे. पण परप्रत्ययनेयबुद्धि असल्यामुळे तसे घडत नाही ही दुःखाची गोष्ट आहे. जैनसस्कृतीचा जितका अधिक अभ्यास होईल तितका अधिक प्रकाश हिन्दुसंस्कृतीच्या निरनिराळ्या अंगावर पडणार आहे. म्हणून जैनविषयक कोणत्याही ग्रथप्रकाशनास प्रोत्साहन देणे कर्तव्य आहे. ह्या दृष्टीने मी या समितीची भरभराट इच्छितो.

पुणे, ता. २५।११।४२ **लक्ष्मण रघुनाथ भिडे**

दानवीर शेठ दलीचंदजी पुनमचंदजी आचळया

चांदवड

प्रकाशकाचें निवेदन

महाराष्ट्र जैन साहित्य प्रकाशन समितीचे प्रथम प्रकाशन 'भारतीय प्रभावी पुरुष' महाराष्ट्रीयाच्या सेवेस सादर करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे.

ह्या प्रकाशनसमितीची स्थापना याच वर्षी जुलै महिन्यात चादवड येथे झाली. समितीचा उद्देश जैन संस्कृतीचा इतिहास, तत्त्वज्ञान वगैरे साहित्य मराठींत आधुनिक पद्धतीने लिहून पुस्तकाच्या द्वारे प्रसिद्ध करण्याचा आहे. भारतीयाचा गौरवशाली इतिहास व संस्कृति घडविण्यात जैनाचा फार मोठा हिस्सा आहे. असे असूनही जैनाच्या प्रभावशाली पुरुषाना भारतीय इतिहासात योग्य स्थान दिले गेले नाहीं याचें कारण युरोपियन इतिहाससंशोधकानी त्यात प्रथम विशेष लक्ष घातले नाहीं व तोच कित्ता पौर्वात्य विद्वानानीं गिरविला हेच होय.

भरतवर्षांत जैन राजानीं आसेतुहिमाचल राज्य केलेले आहे. तसेच जैन साधु, कवि व वीरानीं भारताचा सर्वांगीण उत्कर्ष करण्यात महत्त्वाचा भाग घेतला आहे. त्यानीं केलेली कामगिरी केवळ जैन दृष्टीची नसून समस्त राष्ट्र अगर मानवसमाजाच्या कल्याणाच्या विशाल दृष्टीची होती असे असून या थोर पुरुषाकडे दुर्लक्ष केले गेले आहे. आताशा कोठे त्याच्याकडे विद्वानाचे लक्ष जात चालले आहे.

महाराष्ट्राचा आणि जैनाचा संबंध अति प्राचीन आहे. महाराष्ट्रावर अनेक जैन राजानीं राज्ये केलेलीं आहेत. अनेक प्रभावी पवित्र साधूनी महाराष्ट्रीय जनतेस उपदेशामृत पाजून महाराष्ट्रीय संस्कृति घडविलेली आहे. ब्राह्मणापासून तो अस्पृश्यापर्यंत सर्व प्रकारचे जातींचा जैनात समावेश आहे. खेडोपाडीं जैनाची वस्ती अजूनही मुबलक आहे. त्यामुळे जैनाचा इतिहास, साहित्य व तत्त्वज्ञान याची ओळख महाराष्ट्रीयास असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील जैनाना तर या गोष्टीचे ज्ञान असणे त्याचे परम कर्तव्य आहे. ज्या समाजास आपली उन्नति साधावयाची असेल त्या समाजाने

आपल्या भूतकाळाची अवगणना करता कामा नये. भिन्न भिन्न दृष्टि-कोनानें मागील घडामोडींचे निरीक्षण झालें पाहिजे आणि त्यामधून निष्पन्न झालेल्या विचाराना आचारात ठेविल्याशिवाय सुटकाच नाहीं हे पक्कें समजावे. वर्तमानकाळात उच्च कोटीस पोहोचलेल्या कोणत्याही प्रजेचे उदाहरण घेतलें, त्याची उन्नति कशी झाली याबद्दल खोल विचार केला, तर आपणास असे दिसून येईल कीं त्या त्या प्रजेतील विचारवंतानीं आपल्या पूर्वजाच्या कामगिरीचे सर्वग्राही ज्ञान आपल्या लोकास करून दिले होते. इतिहास हे स्फूर्तीचे व प्रगतीचें साधन आहे, संस्कार व संस्कृतीचे प्रेरणा-बळ आहे, हे समजून महाराष्ट्रीय जैनानीं ह्या समितीच्या प्रकाशनाचा पुरस्कार केला पाहिजे.

महापुरुष ही अखिल मानवसमाजाची मिळकत आहे अशी समितीची विचारप्रणाली असल्याने त्यात संप्रदायादि भेदाची दृष्टि ठेवली जाणार नाहीं.

वाचकांत केवळ रसिकवृत्ति उत्पन्न होण्यासाठीं कल्पनातरंगांनीं रंगलेल्या नवलकथा प्रसिद्ध करण्याचा समितीचा मुळीच उद्देश नाही. त्यामुळे सत्यशोधकास साजेल अशा ऐतिहासिक शुद्धतेच्या पायावरच समितीचीं सर्व चरित्रे प्रसिद्ध करण्यात येतील. कारण इतिहास हा जगताचा आरसा आहे. तो नेहमीं शुद्ध आणि यथार्थ स्वरूपात राहिला पाहिजे. त्या दृष्टीनेच हे प्रकाशन असून यापुढील प्रकाशनेही अशाच रीतीने प्रसिद्ध होतील.

१ **धर्मवीर शान्तिदास** (ले. शान्तिलाल खेमचंद शाह)— हें चरित्र पाश्चिमात्य प्रवाश्याचीं प्रवासवर्णने, रासमाळा, काव्यप्रशस्ति, गुजरातचा इतिहास आदि साहित्यास ऐतिहासिक कसोटीवर चढवून कराचीचे सुप्रसिद्ध जैनेतर इतिहाससंशोधक श्री. डोंगरसी धरमसी संपट ह्यांनीं संपादिलेल्या 'प्रतापी पूर्वजो' ह्या चरित्राचे आधारावर लिहिले आहे.

२ **अकबरप्रतिबोधक जगद्गुरु हीरविजयसूरि** (ले. रसिकलाल दामोदरदास मेहेता, बी. ए.)— हे चरित्र इतिहासप्रेमी विद्वान् मुनिराज विद्याविजयजी यानीं मोगलकालीन सनदा, फर्माने, आज्ञापत्रे, तवारिखा, ऐने अकबरीसारखे तत्कालिन लेखकाचे प्रमाणित ग्रंथ आणि परदेशी

प्रवासी व इतिहासकाराच्या साहित्याचें संशोधन करून लिहिलेल्या 'सूरीश्वर अने सम्राट्' ह्या ग्रंथाच्या आधारानें लिहिले आहे.

३ भगवान् पार्श्वनाथ (ले. शातिलाल खेमचंद शाह)— ह्या अलौकिक तीर्थंकराचे चरित्र प्राचीन ग्रंथाच्या आधारे लिहिलेले आहे. तीर्थंकरांचे जीवन म्हणचे त्याच्या त्यापूर्वीच्या जन्माचे परिणत स्वरूप होय. ह्या चरित्राला ब्रह्मगिरीच्या हत्तीगुफेच्या शिलालेखाचा आणि मथुरेच्या कंकाली-टीलेच्या खोदकामात सापडलेल्या शिल्पशिलालेखाचाही आधार आहे.

कागद दुर्मिळ झाला असताही कार्याचे महत्त्व जाणून आम्ही हें प्रकाशनकार्य चालू ठेवण्याचे धाडस करीत आहोत. वाचक त्याचा योग्य पुरस्कार करतील अशी आशा आहे.

'धर्मवीर शातिदास' ह्या चरित्राचे हस्तलिखित श्री. कृ. भा. वीरकर, एम्. ए., श्री. श्री. दा. भालेराव, बी. ए., यानीं अत्यंत आपुलकीने तपासून दिले. त्याप्रमाणेच वरील तिन्ही चरित्रें श्री. के. ह. आबड, श्री. ल. र. भिडे, श्री. बा. हि. चादवडकर यानीं आपुलकीने तपासलीं व त्यावर उपयुक्त सूचना दिल्या. छपाईसाठीं पुण्याचे श्री. केसरचंदजी ललवाणी यानीं चागलाच सहकार दिला. चादवड गुरुकुलाच्या छात्रानीं रात्रींबेरात्रीं जागून त्याच्या नकला करून दिल्या. ह्याबद्दल ह्या सर्वांची समिति अत्यंत आभारी आहे.

शेवटी ज्याच्या आर्थिक साहाय्यानें हे काम सुकर झाले ते श्री. दली-चंदजी पुनमचदजी आचळ्या याचा आणि चरित्राना आधारभूत असलेल्या ग्रथाचे लेखक, प्रकाशक आणि चित्रकार याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून हे निवेदन संपवितो.

दान. श्री. दलीचंदजी पुनमचंदजी आचळ्या यांचा संक्षिप्त जीवनवृत्तान्त

श्रीमान् पुनमचदजी शेठ आचळ्या हे चादवड येथील एक रहिवासी असून याचे किराण्या मालाचे दुकान होते. त्याची परिस्थिति अत्यंत गरिबीची परतु स्वभाव आनंदित, करारी आणि बाणेदार होता. याचे लग्न पाथरी (सिन्नर) गावीं झाले. पत्नीचे नाव छगनाबाई होते. याना शेषमलजी, हरकचंदजी, हजारीमलजी, दलीचंदजी, किसनदासजी असे पाच मुलगे आणि रामीबाई, रमाबाई व तिजीबाई अशा तीन मुली होत्या. पैकीं श्री. दलीचंदजी आचळ्या याचा जन्म शके १८०२ मध्ये झाला. घरची अत्यत गरिबी असल्यामुळे पाचही भावाचे शिक्षण यथातथाच झाले. पैकीं सर्वांत लहान असलेले श्री. दलीचदजी व श्री. किसनदासजी हे दोघे भाऊ व्यवहारकुशल व तरल बुद्धीचे असल्यामुळे वेगळे निघाले. जवळ खर्चा-वयास काहींच नसल्यामुळे निव्वळ डाळ मुरमुरे खाऊन यानी आठ दिवस काढले आणि नतर ते लासलगावीं नोकरीस राहिले. परतु त्यात श्री. दलीचदजी हे वडील असूनही त्यास रु. २०० व श्री. किसनदासजी यास रु. ३०० वार्षिक पगार असल्यामुळे दलीचंदजींना ते लाछनास्पद वाटू लागले आणि म्हणून नोकरी न करता घरीं निघून जाण्याविषयीं त्यानी किसनदासजी याचा सल्ला घेतला. दोघाचे एकमत होऊन पुन्हा दोघे भाऊ चादवडला आले आणि लासलगाव येथील श्रीमान् अगरचदजी नाहटा याचे मार्फत वशिला लावून श्रीमान् शेठ दगडूराम उमाजी याच्याकडून रु. ५० भाडवलासाठीं कर्जाऊ काढले. लहानशा दुकानापासून व्यापाराची त्यानीं सुरुवात केली. पण दोन-तीन वर्षे दुकान चालले असेल नसेल तोच प्लेगाने कहर उडविला. त्यात पंधरा दिवसातच श्री. हजारीमलजी व शेषमलजी हे दोघे वडील भाऊ व त्याचे वडील श्री. पुनमचंदजी असे तिघेही स्वर्गवासी झाले. श्री. हरकचदजी व हजारीमलजी याच्या पत्नी यापूर्वीच निवर्तलेल्या होत्या. अशा प्रकारे चोहोकडूनच आकाश कोसळल्यामुळे त्याना

भाबावल्यासारखे झाले. स्वर्गस्थ झालेल्या दोघा भावाच्या धर्मपत्नी श्रीमती सीताबाई व जडावबाई यास आपल्यात घेऊन पुन्हा यानीं पूर्ववत् किराण्या मालाचा व्यापार चालू केला व अविश्रान्त परिश्रम करून दुकान अल्पावधींत भरभराटीस आणले. शके १८२५ मध्ये स्वर्गस्थ झालेल्या दोघा वडील भावाचा व वडिलाचा त्यानीं मोसर दिवस केला. आणि लवकरच किसनदासजींचे श्री. कल्याणमलजी चोरडे, धारणगावकर, याची मुलगी फुलाबाई हिच्याशीं त्याचे लग्न झाले. शके १८२९ मध्ये श्री. दलीचदजी याचे लग्न इगतपुरी येथील श्री. जुगराजजी टाटिया याचे मुलीशी झाले मुलीचे नाव सीताबाई होते. श्री. किसनदासजी यास पाच मुले असून त्याचीं नावे अनुक्रमे (१) श्री. रतनलालजी ऊर्फ बाबूशेठ, (२) श्री. माणकलालजी, (३) श्री. हिरालालजी, (४) श्री. गुलाबचदजी (मयत), व (५) शातीलालजी अशीं आहेत. तसेच श्रीमान् दलीचंदजी यास चार मुलगे व एक मुलगी असून त्याचीं नावे अनुक्रमे (१) श्री. झुबरलालजी, (२) मोतीलालजी, (३) लालचदजी, (४) ताराचंदजी, व सदाकुंवरबाई अशीं आहेत. फक्त कुमार ताराचंदजीखेरीज सर्व विवाहित आहेत. शके १८४५ मध्ये श्री. दलीचदजी व किसनदासजी वेगवेगळे झाले. आणि नतर लवकरच श्री. दलीचंदजी याच्या पत्नी श्री. सौ. सीताबाई या निवर्तल्या. शके १८५२ मध्ये श्री. किसनदासजी हेही निवर्तले. हे हयात परंतु आजारी असतानाच चादवड येथे श्री. नयणसुखलालजी पारखवणी याचे अध्यक्षतेखाली स्थानिक सभा होऊन त्यात सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठराव मजूर झाले. त्यातच मोसर न करण्याविषयीचा ठराव होता. सभेच्या कामाची हकीगत ऐकून श्री. किसनदासजी यास कल्पनातीत आनद झाला व त्यानीं आपल्यामागे आपला मोसर मुळींच न करण्याविषयी इच्छा प्रदर्शित केली. त्याची नोंद सदरचे ठराव छापून प्रसिद्ध करण्यात आले त्यात घेतलेली आहे. अशा प्रकारे तेव्हापासून चादवड येथें मोसरची प्रथा नाहींशी होण्यास सक्रिय पाठिंबा स्वर्गस्थ श्री. किसनदासजी व त्याचे कुटुंबीजन यानीं दिला असून वाडिलाचे स्मरणार्थ श्री. बाबूशेट यानीं रु. ३०१ देऊन श्री. नेमिनाथब्रह्मचर्याश्रमाचे वसतिगृहात एक खोली बाधून दिली आहे. श्रीमान् दली-

चंदजी यानीं आतापावेतो खालीलप्रमाणे सार्वजनिक कार्यास देणग्या देऊन स्वकष्टार्जित संपत्तीचा सदुपयोग केला.

१००० यात्रिकरूंना व गरीब अपंग लोकाना धान्यादींच्या रूपाने मदत आणि गुराना चारा घालणे व गुरे सोडविणे यासाठीं वेगवेगळ्या रुपाने खर्च केले.

६०२ श्री. नेमिनाथ ब्रह्मचर्याश्रमामध्ये पूज्य पिताजींच्या व स्वतःच्या नावाने दोन खोल्या आश्रमाचे वसतिगृहात बाधून दिल्या.

२४० चार वर्षेपर्यंत कार्तिकी शु. १५च्या दिवशी दरसाल स्वामिवात्सल्या-साठी रु. ६० प्रमाणे दिले.

१७५० एक स्वतत्र वसतिगृह बाधण्यासाठी श्री. नेमिनाथ ब्रह्मचर्या-श्रमाला रोख दिले.

१००० जैन स्थानक बाधण्यासाठीं चादवड येथील पचास दिले.

२०० लासलगाव येथे गुप्तदान दिले.

३०० चादवड येथे गुप्तदान दिले.

२०० जीर्ण मंदिरास व लोकाना पिण्यासाठीं पाण्याचे टाकीसाठीं खर्च केले.

३०० श्रीमहाराष्ट्र जैन साहित्य प्रकाशन समिति, चादवड, यास छपाई-साठीं दिले.

५५९२ रु.

येणेप्रमाणे चरित्रनायकानें रुपये पाच हजार पाचशे ब्याण्णव वर दाखविल्याप्रमाणे धर्मदाय केला असून शिवाय आणखी दोन हजार रुपये लवकरच दानधर्म करण्याची त्याची इच्छा आहे.

अनुक्रम

आधार त ग्रंथ

१ प्राचीन भारतवर्ष (इ.स.पूर्वी १००० वर्षांचा इतिहास. ले. डॉ. त्रिभुवन-दास लेहेरचंद, रावपुरा, बडोदे).

२ जैन साहित्यनो संक्षिप्त इतिहास (ले. मोहोनलाल दलिचंद देसाई, बी.ए., एलएल. बी., ॲडव्होकेट).

३ त्रिषष्ठि शलाका पुरुष (ले. कलिकालसर्वज्ञ हेमचंद्राचार्य).

४ पार्श्वनाथ (ले. प्रसिद्ध वक्ता श्री. चोथमलजी महाराज).

५ जिनवाणी (ले. हरिदत्त भट्टाचार्य).

६ प्रतापी पूर्वजो (ले. डुंगरशी धरमशी संपट).

७ हिंदुस्थानचा इतिहास (ले. बर्वे).

८ भगवान् पार्श्वनाथ (ले. बाबू कामताप्रसाद जैन, एम्. आर्. ए. एस्.)

९ सूरीश्वर अने सम्राट्. (मुनिराज श्रीविद्याविजयजी यानीं तत्कालिन प्राचीन व अर्वाचीन संस्कृत, मागधी, गुजराती, हिंदी व इंग्रजी नव्वद ऐतिहासिक ग्रंथाच्या आधारे लिहिलेला अपूर्व ग्रंथ.)

भारतीय प्रभावी पुरुष

धर्मवीर शांतिदास

१

सोळावे शतक. भारतवर्षात मोगल सम्राट् अकबर आपलें राज्य स्थिर करीत होता. राजपुतान्यावर त्याची दृष्टि वळली होती. इतस्ततः पसरलेली रजपूत राज्याची परिस्थिति त्याने न्याहाळिली. ईर्षा, द्वेष आणि सूडाच्या भावनानी ती पोखरली जात होती. स्वतंत्र भारताचीं तीं देदिप्यमान किरणे अगदीं निष्प्रभ बनत चाललीं होतीं. अकबराने ह्याचा पूर्ण लाभ घेतला. साम, दाम, दंड व भेद ह्या चारही उपायानीं एकामागून एक रजपूत राज्ये त्याने आपल्या अंमलाखालीं आणलीं.

ढगाआड गेला म्हणून काय सूर्य शीतल बनेल ? उपाशीं मरावें लागले म्हणून का सिंह गवत खाईल ? तीच स्थिति मेवाडच्या राण्याची होती. त्याने गुलामगिरींतील नामुष्कीचे स्वास्थ्य लाथाडून अशान्ततेचें जिवंत जिणे पत्करले. हितशत्रु व प्रकट शत्रूशीं त्याने सामना दिला. त्यास आपल्या शूरवीर सरदार-जहागिरदारासह रानोमाळ फिरावें लागलें. या फिरणाऱ्या अनेक कुटुंबाची पुढे वाताहात झाली.

अशाच एका जहागिरदाराचा मुलगा सहस्रकिरण गुजरातमध्ये अमदाबादेस आला. हा इतिहासप्रसिद्ध शिसोदिया वंशातील असून ज्ञातीने ओसवाल होता. पधरा वर्षाचे कोवळे वय आणि निराधार स्थिति. वर आकाशाचे छत्र आणि खालीं जमिनीचा आधार. राजवंशी रजपूत पण परिस्थितीने लाचार. फक्त एकच अमूल्य वस्तु त्याच्याजवळ होती : दैवाशीं दोन हात करण्याची तयारी ! संकटाच्या मुखात हसत हसत शिरण्याची निर्भयता !

अमदाबाद म्हणजे गुजरातचे वैभवस्थान. लक्ष्मीदेवीचे निवासस्थान. व्यापाराचे त्या काळचे मोठे केंद्र. त्यामुळे राज्यक्रांतीचेही आघात-प्रत्याघात ह्या शहरास सहन करावे लागत.

शहरात हिंडत हिंडत सहस्रकिरण एका मारवाडी जवाहिऱ्याच्या दुकानापुढे उभा राहिला. वृद्ध जवाहिऱ्याचे त्याच्याकडे लक्ष गेले. किरकोळ कामे करण्यासाठी त्याला त्याने ठेवून घेतले. परिस्थिति माणसाला गाय बनविते परंतु माणूस आपल्या धडाडीने परिस्थितीलाच गाय बनवू शकतो हे सहस्रकिरणाने आपल्या कृतीने सिद्ध केले. सचोटी आणि सततोद्योग ह्यामुळे त्याने शेटजींची मर्जी संपादन केली. जवाहिऱ्याच्या धंद्यातहि नैपुण्य मिळवून हुशारी दाखविली. त्याने आपल्या गुणांनी शेटजीची इतकी प्रीति संपादन केली की, शेटजींना आपली कन्या त्यास देऊन कायमचे आपलेसें करण्यात यत्किंचितही संकोच वाटला नाहीं. शेवटीं अमदाबादचे प्रमुख जवाहिरे म्हणून त्याने प्रसिद्धि मिळविली.

ह्या सहस्रकिरणांना दोन मुले झाली: वर्धमान आणि शांतिदास. ह्या कर्तबगार पुत्रांवर आपल्या व्यापाराचा पसारा सुपूर्त करून लवकरच सहस्र-किरणजींनी इहलोकची यात्रा आटोपली

व्यवहाराचा पसारा मोठा होता. दोघा भावांनीं जबाबदाऱ्या वाटून घेतल्या. दुकानचा कारभार वर्धमानाने सांभाळला आणि देशपरदेशात हिंडून माल व गिऱ्हाईक मिळविण्याचे शांतिदासावर येऊन पडले. वडिलांबरोबर राहून शांतिदासाने हा व्यापार आत्मसात् केला होताच. त्यामुळे माणिक, मोती, हिरे, पाचू, नीलम वगैरे रत्नांची पारख करण्यात तो निष्णात बनला. गोड व परिणामकारक भाषा, हसतमुख चेहेरा व स्वाभिमान ह्यामुळें मिसरूडही न फुटलेल्या ह्या पोराने साऱ्या हिंदुस्थानात नाव काढले! राजे-रजवाडे, अमीर-उमराव व शेट-सावकारांवर त्याने स्वतःची छाप बसविली. लक्ष्मीनेही त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला.

आपल्या कुलपरंपरेप्रमाणे शांतिदास शस्त्रविद्या शिकला व त्यास विद्येचीही गोडी असल्यानें संस्कृत, प्राकृत, गुजराती आणि फारशी भाषेचाही त्याने अभ्यास केला. हळुहळू शांतिदासचे नाव अमदाबादच्या प्रमुख जवाहिऱ्याच्या पक्तींला जाऊन बसले.

२

अकबर बादशाह आग्र्याला होते. त्याना किंमती जवाहीर खरेदी करावयाचे असल्याने अखिल भारतवर्षातील नामांकित जवाहिरे तेथे एकत्र झाले होते. दिवाण इ-आममध्ये दरबार भरला होता. रत्नखचित सिंहासनावर बादशहाची स्वारी विराजमान झाली होती. बाजूलाच जवाहिरे बसले होते. अमीर-उमराव, निमंत्रित मांडलिक राजे व सरदार यानी दरबार अगदी फुलून गेला होता. बादशहा स्वतः रत्नपरीक्षा करीत होते. पसतीस आलेली मौल्यवान् रत्ने खरेदी करीत होते. दरबारचे जवाहिरे पन्नालालजी शेजारी उभे होते. इतक्यात बादशहाला कसली तरी आठवण झाली. जवळच असलेली छोटी पेटी त्यानी उघडली. एक तेजस्वी हिरा त्यातून काढला आणि पन्नालालजींच्या हाती दिला. त्याच्या तेजाने जवाहिऱ्याचे डोळे दिपले.

'पन्नालालजी!' हिरा देत बादशाह उद्गारले.

'केवढे तेज!' एक बोलला.

'ओहो! किती मोठा!' दुसरा पुटपुटला.

'याला म्हणावे रत्न!' तिसऱ्याने पुष्टि दिली.

'काय बरे किमत होईल ह्याची?' बादशहाने विचारले.

'ही तर शुक्राची चमकती चांदणी. ह्याची आम्ही काय किमत करावी!' राजजवाहिऱ्याने नम्रपणे सांगितले.

'रत्नशास्त्राप्रमाणे ह्याची नक्की किमत नाही करता येणार?' बादशहाने पुनः विचारले.

सगळे विचारमुग्ध झाले!

'जरा कठीणच आहे.' राजजवाहिरे बोलले. ज्याची सारी ह्यात हिरे, मोती, माणिक आदि रत्नांची परीक्षा करण्यात गेली होती त्यास जर अंदाज लागेना तर इतर काय करणार?

'अखिल हिंदुस्थानातील नामांकित जवाहिरे येथें असता एकही किंमत करू शकत नाही?' आश्चर्याने बादशाहा बोलला.

सापाच्या शेपटीवर पाय पडताच जसा तो डिवचला जातो तसाच जवाहिऱ्याचा स्वाभिमान डिवचला गेला. इशाऱ्याने चालणाऱ्या उमद्या

प्राण्यास आसुडाचा फटका कसा सहन होणार?

सर्व दरबार शान्त होता.

'मी हिरा जरा पाहूं शकतो का?' एका आवाजाने शाततेचा भंग केला. दरबारचे डोळे तिकडे वळले. बादशहानेही नजर वळविली.

'कोण आहे हा तरुण?' पन्नालालजींकडे पहात बादशहाने विचारले.

एक गोरटेला, हसतमुख आणि पाणीदार चेहेऱ्याचा तरुण पुढे आला.

'अमदाबादचे प्रसिद्ध जवाहिरे शातिदास आहेत हुजूर.' पन्नालालजीने सागितले.

बादशहाने कौतुकाने त्याच्याकडे पाहिले आणि हिरा पुढे केला. अत्यंत नम्रतेने शातिदासाने तो घेतला. साऱ्या दरबारच्या नजरा त्याच्यावर खिळल्या होत्या. हिऱ्याच्या सर्व बाजू त्याने न्याहाळल्या. चमक पाहिली. नतर पेटीतून थोडासा तोल काढून त्याने त्याचे वजन केले. ३५० रतीचा तो मोठा हिरा होता. स्वतःच्या छोट्याशा रोजनिशीत त्याची नोद केली. हिऱ्याची उची व रुदी काढली. कांहीं क्षण विचारात घालविले. त्याच्या मुद्रेवर एक प्रकारचे संतोषाचे स्मित झळकले.

'मी ह्याची नक्की किमत सागू शकतो.' तरुणाने निश्चयाने उत्तर दिले.

साऱ्या नजरा मंत्रमुग्ध बनल्या जणू!

'सात लाख मोहोरा.' आत्मविश्वासाने शातिदासजी बोलले.

सर्वांना एकच उत्सुकता निर्माण झाली कीं कोणत्या आधाराने ही किमत झाली. अकबरानेही तेच विचारिले. शातिदासजीनी आपल्याबरोबर असलेल्या पेटीतून एक हस्तलिखित प्रत काढली. प्राकृत अपभ्रश भाषेत ती लिहिलेली होती. एकामागून एक आधार स्पष्ट व खणखणीत आवाजात त्यानी वाचून दाखविले. रत्नपरीक्षामीमासा नावाचा प्राचीन ग्रथ होता तो.

एवढा वेळ निस्तब्ध असलेल्या दरबारातून 'शाबास जव्हेरीजी' असा एकच ध्वनि निघाला.

बादशाहाही खूष झाला. त्याने मौल्यवान् पश्मिना शाल त्याच्या अंगावर टाकली व 'पादशाही जव्हेरी' ही पदवी देऊन त्याचा गौरप केला.

'मी ह्या हिऱ्याची नक्की किंमत सागूं शकतो.' शातिदासजींनीं निश्चयानें उत्तर दिलें. (पृ.४)

३

अगोदरच शातिदासर्जींनी जवाहिरे म्हणून सर्व हिंदुस्तानात नाव काढले होते त्यात पुनः ह्या सन्मानाने विशेष भर पडली. सिलोनची मोत्ये, ब्रह्मदेशची माणके व गोवळकोंड्याचे हिरे वगैरे मौल्यवान् रत्ने घेऊन त्याना वरचेवर दिल्लीस जावे लागे व बादशहाच्या ख़नानखान्यात ते जवाहीर खपवूं लागले. अमीर-उमरावात त्याबरोबरच शातिदासजींनी सराफीचा व्यवहार चालू केला. राजेरजवाडे, अमीर-उमरावाना ते कर्ज देऊं लागले. राजकीय अस्थिरता असूनही शातिदासर्जींनीं आपल्या बुद्धिकौशल्याने व्यापारात झळ लागूं दिली नाहीं.

अकबराच्या साम्राज्याला दिवसेदिवस स्थैर्य येत चालले होते. परंतु त्यास मानसिक स्वस्थता मिळणे कठीण झाले. याला कारण राजपुत्र सेलीम हाच होता. सेलीम फारच स्वच्छंदी व स्वैराचारी बनला होता. त्याच्या विरुद्ध अकबरापुढे वरचेवर कागाळ्या येत चालल्या. आपल्या राज्याचा वारसदार असा नालायक निघाला तर साम्राज्याचे कसे होईल ही भीति त्याला रात्रंदिवस सतावीत असे. त्याला सुधारण्यासाठी बरेच प्रयत्न केले परतु ते सर्व निष्फळ ठरले. शेवटी एका विद्वानाची शिक्षक म्हणून नेमणूक केली. परंतु पालथ्या घागरीवर पाणी. उलट सेलीमने त्यानाच बनविलें आणि त्याचा उपहास केला. अकबराच्या कानावर ही गोष्ट आली तेव्हा त्यास फारच संताप आला. बादशहाने सेलीमला कडक शासन करण्याचे ठरविले. सेलीम हा जयपूरच्या राजकन्येचा मुलगा होता. तिला ही गोष्ट कळली. आपल्या प्रिय पुत्रास वाचविण्यासाठी तिने बादशहाकडे बरीच रदबदली केली. पण मागील कटु अनुभवामुळे बादशहाने गय करल्याचे नाकारले. अगोदरच रजपूत कन्या, तशात ती बडी बेगम, तिला तो मानभग कसा सहन होणार ? ती रुसून अमदाबादेस निघून गेली.

ह्यामुळे गुजरातचा सुभेदार विचारात पडला अशा परिस्थितीत बेगमचा बादशाही सत्कार करणे त्यास शक्य नव्हते. बरे, योग्य सन्मान न झाल्यास तिकडूनही पंचाईत होती. त्याने ह्या पेचातून सोडविण्याची आपले दोस्त शातिदासर्जींना विनंति केली. शेटर्जींनीं ती तात्काळ मान्य केली. ते बेगमला जाऊन भेटले. ‘अमदाबादेस आपण आला आहात

तेव्हा आमच्या मीठभाकरीचा स्वीकार करावा.' शेटजींनी नम्रतेने विनति केली.

शांतिदासजी जव्हेरी म्हणून दरबारात वरचेवर जात असल्यामुळे अंतःपुरात ते सर्वांना परिचित होते. अमदाबादसारख्या शहरात ओळखीचे कोणीच नसल्याने बेगमसाहिबाना चुकल्याचुकल्यासारखे वाटे. त्यामुळें त्यानी ही विनती लागलीच मान्य केली. शेटजींनी आपली भव्य हवेली निवासस्थानासाठीं मोकळी करून दिली. रंगीबेरंगी ध्वजा-पताका, हिऱ्या-मोत्याची तोरणे, हड्या आणि झुंबरें यानीं दिवाणखाना सजविला. त्यांत काश्मिरी गालिचे पसरले. अशा प्रकारे दिल्लीच्या राजमहालाशी स्पर्धा करणारा जणु प्रतिमहालच निर्मिला. सेवेसाठी दासी आणि नौकर याचा लवाजमा हजर ठेवला. काय नको आणि काय पाहिजे हे विचारण्यासाठी स्वतः शेटजी वरचेवर येऊं लागले.

शांतिदासाच्या आदरसत्काराने बेगमसाहेब फार खुश झाल्या. शांतिदासजीविषयी त्याना आपुलकी उत्पन्न झाली. शेटजीही नियमितपणे तेथें जात. एकदा असेच बोलण्यावरून बोलणे निघाले असता बेगमने सांगितले, 'जव्हेरीजी, मी रागावून येथे तर आले, पण परिचयाचे कोणीच नसल्यामुळे आगीतून निघून फुफाट्यात पडल्यासारखे झाले होते. परंतु तुमच्यामळेच मला धीर आला.'

'आणि जयपूरची राजकन्या आणि भारतवर्षाच्या सम्राज्ञीचे पाय या झोपडीला लागण्याचे महान् भाग्य मला प्राप्त झाले.' शांतिदासजींनी विनय प्रकट केला.

'परंतु यामुळे बादशहाचा रोष पत्करण्याची पाळी येण्याचाही संभव आहे.' बेगम बोलली.

'आपण त्याची यत्किंचितही चिंता करूं नका. अथितिसत्कार हा आमचा परमधर्म आहे. त्यात पुनः आपल्यासारख्याचा योग यासाठी येतील ते कष्ट सहन करण्यास आम्ही तयार असतो.' शेटजी बाणेदारपणानें बोलले.

'भाई, याबद्दल मी तुमची कशी उतराई होईन?' बेगम सद्गदित होऊन बोलली.

'भावाची अल्पशी भेट स्वीकारून !' शांतिदासजी बोलले. बहीण नसल्याच्या दुःखाची छटा त्याच्या चेहऱ्यावर उमटली होती.

योगायोगच विलक्षण होता. तो भाऊबीजेचा दिवस होता. प्रत्येक स्त्रीला बहीण बनणे केव्हाही आवडते. शांतिदासजींनी बहुमूल्य अशीं रत्नजडित कंकणे बीजेच्या ओवाळणीची भेट म्हणून नजर केलीं.

बेगमला येऊन जवळ जवळ दोन महिने होत आले. एके दिवशीं अचानक शहाजादा सेलीम स्वतः आला. मातेला अत्यंत हर्ष झाला. मातापुत्राच्या गुजगोष्टींना भर आला होता. जेवणाची वेळ टळल्याचेही त्यांना भान राहिले नव्हते. ठराविक वेळी नेहमीप्रमाणे शांतिदासजी स्वतः आले.

'कुमार, तुझे मामा आलेत.' हसत हसत बेगम प्रेमळपणाने बोलली. नमस्कार करून सेलीमने मातेच्या शब्दाला मान दिला. परंतु आश्चर्यचकित नजरेने मातेकडे तो पाहू लागला.

'ही पाहिली ओवाळणी ?' असे म्हणून बेगमसाहेबांनी आपले हात पुढे केले आणि रत्नजडित कंकणे दाखविलीं. नंतर शांतिदासजींकडे पहात त्या म्हणाल्या,

'भाई, आता आमच्या जाण्याची तयारी करा.'

'कां इतकी घाई ? गरीब भावाचा कंटाळा आला वाटते ?' शांतिदासजी बोलले.

'दोन महिने झाले तरी घाईच कां ? सेलीम न्यायलाच आला आहे मला. बादशहाने शहाजाद्यावर रहम केली म्हणूनच जाऊं म्हणते.' बेगम उत्तरली.

इतक्यात दासी भोजनासाठी बोलाविण्यास आली.

'कां ? आज जेवावयाचीसुद्धा आठवण नाही वाटते ? गप्पानींच पोट भरले कीं काय ?' शेटजींनीं सौम्य विनोद केला व हसत हसत ते उठले.

दुसऱ्या दिवशी बेगमसाहेबांना घेऊन सेलीम दिल्लीकडे रवाना झाला. बेगमने शांतिदासजींनी केलेल्या आदरसत्काराचे बादशाहापुढे खूप वर्णन केले व शेटजीची प्रशंसा करून आपण त्यास बंधु केल्याचे सांगितले. तें ऐकून बादशाहा खूश झाला व शांतिदासजींना त्याने दिल्लीस बोलावून भरजरी पोशाख देऊन त्याने दरबारात त्यांचा गौरव केला त्यांना पहिल्या

प्रतीचे अमीर बनवून 'अमदाबादचे नगरशेट' हा किताब वंशपरंपरा दिला. त्याप्रमाणे गुजरातचा सुभेदार खान-इ-अजम याच्यावर आज्ञापत्र पाठविलें. बेगमने धर्मबंधु मानल्यामुळे शातिदासजी दिल्लीच्या दरबारात 'जव्हेरी मम्मा' या नावानेच ओळखले जात.

४

आपल्या व्यवहाराच्या विकासात शेटजी निमग्न होते. दिवसेदिवस व्यवहाराचा व्याप वाढतच होता. निरनिराळे सरदार-सुभेदार ह्यानाही ते कर्ज देऊ लागले. अशा घडामोडींत हा हा म्हणता दोन वर्षे निघून गेलीं. ह्या प्रपंचाबरोबर परमार्थ साधण्यातही ते तत्पर होते. नगरशेट ह्या नात्याने सर्व अमदाबादची त्याच्यावर जबाबदारी होती. त्याचे घर म्हणजे दुःखी, पीडित आणि अनाथाचे आश्रयस्थानच बनले होते. त्याची परोपकारिता सर्वश्रुत होती.

मोगलाच्या राजवटींत मंदिराचे सरक्षण करणें फार अगत्याचें परतु अत्यंत दुर्घट होते. आपल्या पैशाचा आणि प्रतिष्ठेचा शेटजींनीं ह्यासाठीं अगत्यपूर्वक उपयोग केला. अमदाबादचीं सर्व मंदिरेच नव्हे तर शत्रुंजय, आबू, संखेश्वर वगैरे अखिल भारतवर्षातील प्रमुख जैनतीर्थांची व्यवस्थाही तेच पहात. शहरातही एकोपा राखण्याचे महत्कार्य त्यानी यशस्वी रीतीने पार पाडले. मोगलाच्या राजवटींतही हीं सर्व धर्मस्थाने शेटजीच्या प्रतिष्ठे-मुळे सुरक्षित राहिली.

इ. स. १६१२ त तीर्थाधिराज शत्रुंजयाच्या यात्रेला ते गेले. तेथील जीर्ण मंदिराचा उद्धार करण्याची त्यानीं व्यवस्था केली. अमदाबादेला इ. स. १६१८ त मुक्तिसागर नावाच्या विद्वान् आणि त्यागी मुनिराजाचे आगमन झाले. ते विद्वान् असून उग्र तपस्वी होते. बुद्धिमान् जितेंद्रिय शास्त्रपारंगत, विवेकी आणि विचारी असल्यामुळे मोठमोठ्या विद्वानानाही त्याच्याविषयीं आदर होता. त्याची दिव्य प्रतिभा श्रोत्याना मुग्ध करीत होती. त्याच्या आदर्श चारित्र्याने आणि उपदेशामुळे अनेक लोकाचें जीवन आदर्श बनले. 'जगात जीवनाचे दोन आदर्श आहेत: ताड आणि चंदन. एक उंच वाढून स्वतःच्या ऐश्वर्याचें आणि इभ्रतीचे प्रदर्शन करतो

तर दुसरा स्वतःच्या बलिदानानें जगाला सुखी करण्यात आनंद मानतो; तोडला किंवा जाळला तरी तो आपला स्वभाव सोडीत नाहीं. हेच खरें जीवन आहे. मानवी जीवनाचा हा खरा आदर्श आहे. अशा महापुरुषाच्या जन्मानें जगात आनंद पसरतो. त्याच्या मृत्यूनें जग दुःखी बनते. परंतु सुखाने त्याचे मन लोभावत नाहीं की दुःखाने विव्हल होत नाहीं. मृत्यू-वरही विजय मिळवून ते अमर बनतात म्हणूनच असल्या विभूतींचे जीवन, जगज्जीवन मानलें जाते. अशा महान् विभूतींच्या सहवासाने, गुणश्रवणानें आणि त्याच्या पादस्पर्शाने पवित्र झालेल्या स्थानाच्या दर्शनाने मनुष्याला आपले जीवन आदर्श बनविण्याची स्फूर्ति मिळते. असल्या स्फूर्तीनेंच मानव आत्मविकासाच्या अंतिम ध्येयाला सन्मुख होतो.' मुनिराजाचा अशा प्रकारचा हृदयस्पर्शी उपदेश श्रोत्याच्या अंतःकरणाचा ठाव घेत होता.

शेटजींच्या मनावरही ह्याचा मोठा परिणाम झाला. तीर्थाधिराज शत्रुं-जयावर मोठा संघ काढून जाण्याची त्याची फारा दिवसापासून असलेली उत्कंठा पुनः तीव्र झाली. सतत जलसिञ्चनाने वेलींना तजेला यावा तसें घडले. त्यानीं आपली इच्छा मुनिराज मुक्तिसागरजींजवळ बोलून दाखविली. मुनींच्या संमतीने एक मोठा धर्मसंघच काढावयाचे निश्चित केले.

ज्या वेळीं मंदिरे आणि तीर्थस्थाने ह्यांचें अस्तित्वच धोक्यात होतें, चोहोंकडे अशांतता आणि अराजकता पसरलेली होती, अशा वेळी तीर्थ-यात्रेसाठी मोठा संघ काढणे म्हणजे एक दिव्यच होते.

इ. स. १६१८ त त्यानीं ही महान् धर्मयात्राच काढली. पूज्य गुरुदेव मुक्तिसागरजींनाही आपल्या शिष्यसमूहासह बरोबर घेतले होते. बरोबर शेकडों तंबू, राहुट्या आदि सामानसुमानाच्या तीन हजार गाड्या असून पंधरा हजारांचा जनसमूह यात्रेसाठीं निघाला होता. गुजराथच्या सुभेदारानें संरक्षणासाठीं पांचशे स्वार दिमतीला दिले होते. *स्वतः जहांगीर बाद-शहाने ह्या संघास सर्वतोपरी संरक्षण देण्याचें फरमान काढले होते. रस्त्यात निरनिराळे राजेरजवाडे, सरदार-सुभेदार आणि शेटसावकार याजकडून या संघाचें हार्दिक स्वागत झाले.

---

* इ. स १६०५ मध्यें बादशहा अकबर मरण पावला. त्यानंतर शहाजादा सेलीम हा जहांगीर हा किताब घेऊन दिल्लीच्या गादीवर बसला होता.

. अमदाबादेहून पायींच (प्रवास) तीर्थयात्रा करावयास निघालेला हा प्रचंड संघ धर्मरंगात दंग होऊन मजल दरमजल करीत शत्रुंजयला पोहोचला. तीर्थाधिराज शत्रुंजयाच्या दर्शनानें त्यांना अत्यंत हर्ष झाला. मोठ्या भक्ति-भावाने सर्वांनी हात जोडले. निसर्गसुंदर स्थानीं असलेले गगनचुंबी वैभव-शाली जिनप्रासाद पाहून शेटजींचे मन रमले. वातावरणांत शांतता आणि उदात्तता मूर्तिमंत स्वरूपांत वावरत होती. भगवान् ऋषभदेवाच्या भव्य मूर्तीपुढे शेटजींनीं भक्तिभावाने हात जोडले. त्या अलौकिक स्वरूपांत ते अगदीं तन्मय झाले. त्यांचे देहभानही हरपलें. ह्या कारणानेंच तर निसर्ग-रम्यस्थानें तीर्थयात्रेसाठी नाहीं ना निवडलीं गेलीं ?

तीर्थातील मुख्य मंदिरासमोरच दोन देव्हारे त्यांनीं तयार करविले होते. (हे दोन्ही देव्हारे हल्लींही विद्यमान आहेत.) शांतिदासजींनीं गुरुदेवांच्या हस्ते त्यांत दोन जिनमूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली. यात्रेकरूंनींही अत्यंत भक्तिभावाने यात्रा केली. मुक्तिसागरजींनीं तीर्थयात्रा करण्याचा उद्देश, श्रीसंघाचें स्वरूप, संघ काढण्याचे प्रयोजन आणि महत्त्व वगैरे विषय विद्वत्ताप्रचुर व मधुर वाणीनें लोकांच्या मनावर ठसविले. लोकांनी शांतिदास-जींस धन्यवाद देऊन गुरुदेवांच्या जयजयकारांत संघपतीची माळ त्यांच्या गळ्यांत घातली. त्यानंतर हा बृहत्संघ परतला. मार्गांत लागणाऱ्या गांवांतील लोकांनीं संघ आणि संघपतीचा मोठा सन्मान केला आणि आपली सुख-दुःखेंही त्यांच्यापुढें मांडलीं. शांतिदासजींनीं त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठीं शक्य ती सर्व प्रकारची व्यवस्था करून दिली.

अशा प्रकारें तीन महिन्यांनीं हा प्रचंड संघ निर्विघ्नपणें परत आला. लहान लहान ठाकूर, कोळी, भिल्ल, मीयाणे वगैरेंचा त्रास, चोर, लुटारू, दरवडेखोर आणि यवन सरदारांचा उपद्रव, निरनिराळ्या रोगांच्या साथी अशा भयानक परिस्थितींत पंधरा हजार स्त्रीपुरुषांच्या संरक्षणाची आणि व्यवस्थेची जबाबदारी यशस्वी रीतीनें पार पाडणाऱ्या ह्या धर्मवीराच्या दीर्घदृष्टीची आणि पुरुषार्थाची कल्पनाच केलेली बरी.

५

तीर्थयात्रेहून परतल्यापासून शांतिदासजींच्या अंतःकरणांतील प्रभु-

भक्तीचें बीज फोफावत चालले. तीर्थदर्शनाने अन्तःकरणात धर्मप्रेम दृढ होत असल्याची त्याना प्रचीति आली. विमलशाह, वस्तुपाल, तेजपाल धन्नासंघवी यानीं कोट्यवधि रुपये खर्च करून ही धर्मस्मारके का निर्माण केलीं हे त्याच्या लक्षात आले.

वीतराग अशा परमात्म्याचे पुण्यस्मरण नित्य ताजे करून देणाऱ्या आणि आपल्या भावना विशुद्ध करणाऱ्या जिनमदिराविषयीं त्याच्या अतः करणांत अपूर्व प्रेम जागृत झाले. त्यामुळे लोककल्याणकारी असे जिन-शासनचे एक चिरस्मारक अमदाबादेला उभारण्याचे त्यानीं आपल्या बधूंच्या समतीने ठरविले. जैन शिल्पशास्त्राप्रमाणे त्याचा एक नकाशा तयार करविला. अमदाबादच्या प्रमुख लोकाशी विचारविनिमय करून मध्य-वस्तींत असलेल्या बिबीपुऱ्यात एक विशाल जिनमदिर बाधावयाचे निश्चित केले. यासाठी ते स्वतः दिल्लीला गेले. बादशहा जहागिरानें त्याचा मोठा सत्कार केला. शातिदासजीनी अमदाबादेस बिबीपुऱ्यांत एक जिनमदिर बाधण्याची उत्कट इच्छा प्रकट केली. मदिराचा नकाशा दाखवून त्या जागेची परवानगी मागितली.

बादशहाने शातिदासजीच्या इच्छेप्रमाणे मोठ्या आनदाने परवानगी दिली.

बादशहाचा हुकूम मिळताच त्यानी आग्रा आणि दिल्ली येथे असलेल्या नामाकित कारागिराना अमदाबादेस पाठविले. जयपूरचा मौल्यवान संगमरवरी दगड खरेदी केला. गुजरातच्या नामाकित शिल्पज्ञाना त्या कामी नियोजित केले. अमर होणारी जिवत कलाकृति निर्माण करण्याची त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यानी पाण्यासारखा पैसा खर्च केला.

इ. स. १६२१ त कामाला सुरवात झाली. भक्त आपल्या इष्ट देवा-पुढे सर्वस्व समर्पण करण्यास सिद्ध झाला. कलावंतानींही आपली कला-निर्मितीची हौस पुरी करून घेतली. सर्वांनी त्यात आत्माच ओतला. त्यामुळे शेकडों कारागिराच्या अविश्रान्त श्रमाने एक अपूर्व धर्मस्थान निर्माण झाले. भारतवर्षाच्या वैभवात आणखी एक भर पडली.

त्या वेळीं हिंदुस्थानात आलेल्या पाश्चिमात्य प्रसिद्ध प्रवाश्यानीं ह्या कृतीबद्दल गौरवाचे उद्‌गार काढले आहेत.

इ. स. १६३८ त आलेला प्रवासी आल्बर्ट-डी-मेन्डेल्स्लो याने ह्या मंदिराबाबत असे लिहून ठेवले आहे की—

'हे मंदिर म्हणजे जगातील एक अति रम्य कलाकृति आहे. माझ्या अमदाबादच्या प्रवासाच्या वेळीं हें मंदिर करविणारे शातिदास शेठ हयात होते. मंदिराच्या चोहोंबाजूंला उंच तटबंदी होती. आत विस्तीर्ण चौक होता. सिंहद्वारावरच काळ्या पाषाणाचे दोन प्रचड हत्ती होते. त्यावर शातिदासजीचा पुतळा बसविलेला होता. मंदिरात वर छत होते. भिंतीवर अत्यंत कौशल्याने निरनिराळया प्रकारची वेलबुट्टी, पक्षी, अप्सरा, राज-दरबार, देवक्रीडाचे कोरीव काम होतें. चोहोबाजूला असलेल्या छोट्या मदिरात तीर्थंकराच्या असंख्य मूर्ति होत्या. मध्यभागी तीन मोठीं अतरद्वारें असून त्यात प्रभूची मूर्ति होती. पितळी दीपमाळा चोहींकडे प्रकाश फैलावीत असत.'

सुप्रसिद्ध फ्रेच प्रवासी टॅव्हर्नियर याने सुद्धा आपल्या प्रवासवर्णनात या मदिराची भव्यता आणि शिल्पकला याबद्दल प्रशसोद्गार काढले आहेत.

'चिंतामणिप्रशस्ति' नावाच्या सस्कृत ग्रंथात या मंदिराचे खालील-प्रमाणे वर्णन आहे—वि. स. १६७७ (इ.स. १६२१) मध्ये वर्धमान आणि शातिदास हे अलोट सपत्तीचे स्वामी बनले. त्याचे जीवन अत्यंत साधे आणि पवित्र होते. त्यानीं बिबीपुऱ्यात एक भव्य आणि सुदर मदिर बाधले. मदिराच्या दाराजवळच आशीर्वादासाठीं पच पत्र होते. उच आणि विशाल पायऱ्या स्वर्गाकडे नेण्याच्या सूचक होत्या. त्यात सहा भव्य विभाग होते. ते मेघनाद, सिंहनाद, सूर्यनाद, रंगमडप आणि गढगोत्र या नावानीं ओळखले जात. मदिरावर दोन मनोरे असून समोवतीं चार मदिरे होतीं.

ह्या मेरुतुङ्ग मंदिरात भगवान् चिंतामणी पार्श्वनाथाच्या प्रतिमेची इ. स. १६२५ त मोठ्या धामधुमीने प्राणप्रतिष्ठा झाली.

शातिदास शेटजींच्या खास निमंत्रणावरून प्राणप्रतिष्ठेनतर हे सुप्रसिद्ध, सुंदर आणि भव्य जिनमदिर पाहण्यास खुद्द जहागीर बादशहा आले होते.

इ. स. १६२७ त बादशहा जहागीर मरण पावला. ह्या वेळची परिस्थिति फारच अशाततेची होती. राज्यासाठी दिल्लीला खटपटी चालू होत्या. नूरजहानला सिंहासन आपल्या हाती ठेवावयाचे होते. म्हणून तिने शहा-

जादा शहार्यारला हाताशी धरलें. परंतु तिच्या भावाने शहाजहानचा पक्ष घेतला. शेवटी शहाजहान बादशहा गादीवर बसला.

त्याने शहार्यारचा खून करविला व आपली बादशाही शाबीत करून घेतली. ह्या राजकीय अशांततेच्या वादळात शांतिदासजींनी किती दूरदर्शीपणाने स्वतःचें स्थान व वर्चस्व कायम राखले असेल याची कल्पनाच केलेली बरी.

कंदहारच्या लढाईमुळे बादशहाला पैशाची मोठी टंचाई पडली. बादशहानें शांतिदासजींना दिल्लीस बोलाविले आणि मोठ्या कर्जाची मागणी केली. शांतिदासजींनी बादशहाला मोठी रक्कम कर्जाऊ दिली. त्याबरोबरच त्या प्रसंगाचा वैयक्तिक स्वार्थ साधण्याकडे उपयोग न करता त्यांनीं तीर्थरक्षणाच्या सनदा मिळविण्याचे महत्कार्य साधले. इ.स. १६२९ त २१ मे रोजीं पहिले फर्मान निघाले त्यात म्हटलें आहे कीं—

'नामवर बादशहाना कळते की संखेश्वर, केसरियाजी वगैरे देवस्थानें फार प्राचीन आहेत. अमदाबाद येथील तीन, सुरतची एक आणि राधनपूरची एक अशा पाच पौपधशाला शांतिदासजीच्या मालकीच्या आहेत. ह्या सर्व धर्मस्थानात आणि चिंतामणी पार्श्वनाथाच्या मंदिराबाबत कोणीही हस्तक्षेप करता कामा नये.'

शहाजहान बादशहा कलेचा चाहता होता. त्याने सहा कोटि रुपयाचें मयूरासन तयार करविले. मयुराच्या पिसाऱ्यात बसविण्यासाठी लागणारी बहुविध मौल्यवान् रत्ने शांतिदासजींनीच पुरविली त्यामुळे बादशहाशी असलेला त्याचा परिचय दृढ झाला. स्वतः शहाजहान बादशहाने त्याना हत्ती घोड्याचा नजराणा पाठविला होता.

प्राचीन तीर्थस्थानावर सशस्त्र चौक्या बसविण्यात आल्या. त्याबरोबरच बादशहापासून प्राप्त परिस्थित्यनुरूप तीर्थरक्षणाबाबत सनदा मिळविणेही चालू ठेवले. काही दिवस जात नाहींत तोंच मोंगलाच्या छावण्या पालीताणा व राणकपूरच्या भागात पडल्याची बातमी आली. त्यामुळे देवस्थान आणि यात्रेकरूंना सैनिकापासून उपद्रव होऊं लागला. तेव्हा शांतिदासजींनी बादशहाची पुनः भेट घेतली.

इ. स. १६५६ त शांतिदासजींनीं संखेश्वर गाव आपल्या ताब्यात

घेतला आणि पुनः एक नवीन सनद शहाजहान बादशहाकडून मिळविली कीं शांतिदास हे आमचे पहिल्या प्रतीचे अमीर आहेत. त्यानीं असा अर्ज केला आहे कीं, पालिताण्याला पुष्कळ यात्रेकरू येतात. त्याना उपद्रव होऊ नये, म्हणून आम्ही पालिताणा गाव शांतिदासशेटजींना इनाम दिला आहे. तरी अधिकाऱ्यानी त्या बाबतीत कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करू नये.

शेवटीं समय ओळखून बादशहाला दोन लाख मोहरा देऊन शांतिदासजीनी शत्रुंजय परगणा वंशपरंपरा इनाम मिळविला.

अशा प्रकारे पैसा, प्रतिष्ठा व सशस्त्र फौज याच्या द्वारा जैन संस्कृतीचीं ती वैभवशाली स्मारके प्राणाच्या मोलाने नगरशेट यानी जतन केली.

६

मनुष्य अनेक योजना करतो. स्वतःच्या कर्तबगारीवर पूर्ण विश्वासून असतो, परंतु दैव अथवा निसर्ग काही वेगळेच घडवितें.

इ. स. १६४४ पर्यंत गुजरातच्या सुभेदारीवर अजमखान होता. शेटजीचा तो परमस्नेही असल्याने सर्व बाबतीत त्याची मोठी मदत होई. अजमखान वृद्ध झाल्यामुळे त्याने नोकरीवरून निवृत्त होण्याची इच्छा बादशहाकडे प्रदर्शित केली त्याच वेळी बादशहाची मुलगी जहान आरा आजारी असल्यामुळे औरंगजेब दक्षिणेतून दिल्लीस आला असताना त्याचीच गुजरातचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली व इ स. १६४५ त सुभेदार म्हणून औरंगजेब अमदाबादेस आला.

औरंगजेब स्वतःस 'सच्चा इस्लामी' समजत असे. धर्म हा आत्मगुणपोषक असतो. सूर्य उगवताच अन्धःकार नाहीसा होतो. वीराला पाहताच भ्याडाना धडकी भरते. त्याचप्रमाणे अन्तःकरणात धर्म शिरताच ईर्षा, असूया, अशांति नष्ट होते. तापलेल्या जीवाना खरी शीतलता देणारा चंदन आहे तो. परंतु कोणासाठीं ? योग्य माणसासाठीं. धर्मप्राप्तीला अयोग्य असणाऱ्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. द्राक्षे किती गोड, मधुर आणि रुचकर असतात ! परंतु त्याची दारू आरोग्याला घातुक ठरते. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक त्याज्य हेच खरे. तीच धर्माची स्थिति आहे. औरंगजेबाच्या

बाबतींत तीच स्थिति होती. धर्मवेडाचा नशा त्याला चढला होता. इस्लामशिवाय कोणतीही धर्मस्थानें त्याला पापस्थाने वाटायचीं. मशिदीत बाग पुकारून ज्याची उपासना होते त्याच अल्लाची उपासना इतर मंदिरातून होत असते हे सत्य त्याला उमगेना. राम आणि रहीम हे परस्पराचे कट्टे शत्रु आहेत असे त्याला वाटे. धर्मस्थानात हस्तक्षेप करून त्याचा विध्वंस करण्यासही तो मागेपुढे पहात नसे. त्याचमुळे त्याचे गुजरातच्या सुभेदारीवरील आगमन शांतिदासांना चिंतास्पद वाटले.

सकाळची वेळ होती. शहर पाहण्यासाठी सुभेदार औरंगजेबाची स्वारी निघाली होती. फिरता फिरता तो बिबीपुऱ्यात आला. कोपऱ्यावरच असलेल्या प्रचंड काळ्या हत्तीकडे त्याचे लक्ष गेले.

'किसका महल है यह ?' डोळे भरून पहात तो बोलला.

'महल नहीं सरकार. यह तो मंदिर है.' सरदार बोलला.

'किसने बनवाया है ?' कपाळावर आठ्या चढवीत औरंगजेबाने विचारले.

'नगरशेट शांतिदासजीने.' जबाब मिळाला.

'कौन ! झवेरी मामु ?'

'जी.'

संतापाने त्याने ओठ दाबले. त्याच्या डोळ्यात एक विलक्षण चमक आली.

'खुदाका मुल्क होते हुये भी काफरोंकी यह मजाल ?' तो बोलला.

'नगरशेट अव्वल दर्जेके अमीर होनेसे शहेनशाह जहॉंगीरने उन्हे यह मंदिर बनवनेकी इजाजद दी थी हुजूर !' सरदार पुटपुटला.

'अच्छा. देखा जायऽऽगा !' औरंगजेब परतला.

त्याची खुनशी नजर मंदिराच्या चाणाक्ष रक्षकांनीं ओळखली. भुजगाचे विषारी फूत्कार होते ते.

मंदिर हे संस्कृतीचे प्रतीक आहे. हजारो वर्षांनतरही आर्यसंस्कृतीला गौरव प्राप्त करून देणारा इतिहास आहे ही गोष्ट त्याला डांचत होती. मोंगलांचे राज्य असताना स्वतःच्या इस्लामी संस्कृतीपेक्षाही भव्य व वैभवशाली अन्यधर्मीय स्मारक त्याला कसें सहन होणार ?

महालात आल्याबरोबर आतापर्यंत दबलेले त्याचें उग्र रूप प्रकट झाले.

संतापानें त्याचे डोळे व चेहरा लाल झाला. त्याने कोतवालास बोलावणें पाठविलें. कोतवाल ते जमदग्निस्वरूप पाहून घाबरून गेला. थरथरत त्यानें कुर्निसात केला.

'कोतवाल, क्या ऐसाही कारभार चलाते ?' वीज कडाडली.

'गुन्हा माफ सरकार. कसूर फरमायेंगे हुजूर.' अजीजीने कोतवाल घाबरत घाबरत बोलला.

'कसूर ! मुसलमानी रियासतोंमे काफीरोंके ऐसे मंदर ? क्या करतेहो तुम लोग ?' कोपाने पेट घेतला.

'खुद जहापन्हॉं जहॉंगिरका फरमान था ! हम क्या कर सकते थे हुजूर ?' कोतवालाने आपली असमर्थता प्रकट केली.

'खामोश ! उसे रोकनेकी क्यों न कोशीस की ?' स्फोट झाला. 'अच्छा ठहरो. देखो. उस मन्दरमें कितने रक्षक है ?' काहीं विचार करीत औरंगजेब बोलला.

'सीर्फ पचास होंगे.' कोतवालानें जबाब दिला.

औरंगजेबाने दोनशे स्वारांची एक तुकडी बोलाविली आणि कोतवालास हुकूम केला, 'सैनिकांसह जाऊन मंदिराचा कबजा घ्या. आडवे येतील ते कापून काढा. हुकमात कसूर झाल्यास याद राखा.'

सलाबतजंगासह दोनशे घोडेस्वारांची तुकडी घेऊन कोतवाल मंदिराकडे निघाला.

औरंगजेबाची पाठ वळताच मंदिराच्या रक्षकांपैकीं एकाने लागलीच ही गोष्ट शेटजींना कळविली. त्याबरोबर शेटजी गंभीर झाले. करारीपणाची छटा त्यांच्या चेहऱ्यावर झळकली. त्यानीं वर्धमानशेटजींबरोबर संकटाचा विचारविनिमय केला. भावी संकटाचे स्वरूप ओळखून मंदिरातील मुख्य मूर्ति भुयारात ठेवून पूर्वीप्रमाणेच कार्यक्रम चालू ठेवण्यास सांगितलें. त्याबरोबरच महाजनांना बोलावण्यासाठीं एक सेवक रवाना केला.

त्या वेळीं 'महाजनसंस्था' हे अमदाबादचे एक वैशिष्ट्य होते. साऱ्या गावावरचे खरे सत्ताधारी लोकप्रतिनिधि महाजनच असत. सर्व जाती तेथे संघटित स्वरूपात होत्या आणि प्रत्येक जात आपआपला पुढारी नेमत असे. त्या जातीचे सर्व नियम व कार्य सर्वांनुमतें चालत असे. ज्याचा मतभेद

होई त्यास एक तर सर्वांचे ऐकावे तरी लागे नाहीतर जातीबाहेर तरी व्हावे लागे. अशा प्रकारे सर्व जातींचे पुढारी मिळून महाजन बने. नगर-शेट त्याचे मुख्य होते.

नगरशेटजींच्या दिवाणखान्यात महाजन एकत्र जमले. शातिदासजींनी प्रसंगाची तीव्रता सर्वांना जाणवून दिली. देवस्थानावरील आक्रमणाचे वृत्त ऐकून सर्वांच्या चित्तवृत्ति संतापाने प्रक्षुब्ध झाल्या. हातीं शस्त्र घेऊन दोन हात करण्याचे काहींनीं सुचविले. आपापले चौकीदार मंदिरसंरक्षणासाठीं पाठविण्याचेही ठरले आणि 'आमच्या पूज्य देवस्थानाच्या रक्षणासाठीं प्राण देण्यासही आम्ही तयार आहोत' असे म्हणणाऱ्या तरुणाची तुकडी तयार झाली. त्याबरोबरच शिष्टमंडळ घेऊन औरगजेबाकडे जाण्याचेही ठरलें. हा विचारविनिमय होतो आहे तोच रस्त्यात गर्दी जमल्याचा कोला-हल ऐकूं आला. घाबऱ्या घाबऱ्या एक माणूस धावत आल्याची वर्दी आली. शेटजींनीं त्यास आत बोलावले. धापा टाकीतच त्याने औरगजेबाच्या स्वारानीं मंदिर वेढल्याचे सागितले. सर्व विचारविनिमय तेथेच राहिला. प्रथम मंदिराकडे सर्व तातडीने गेले.

कोतवाल स्वारासह टप् टप् करीत गावातून निघाला. मंदिराबाबत गावात कुणकुण पसरली होतीच. त्यामुळे लोकाच्या टोळ्याच्या टोळ्या स्वाराच्या मागून निघाल्या. एकदम मदिर वेढण्यात आले. रक्षक साव-धान झाले. 'बऱ्या बोलाने बाहेर निघा नाहीं तर मराल.' कोतवालाने सागितले. काहीं बाहेर पडले पण काहीं लढले ते मारले गेले. लोकाची गर्दी वाढतच चालली. सैनिकाची संख्या वाढविण्यात येऊन मंदिराचा कब्जा बळजबरीने सत्तेच्या जोरावर घेण्यात आला. यामुळे लोकात तीव्र असतोष पसरला. लहानमोठे दंगे आणि चकमकी सुरू झाल्या. महाजनाचें शिष्टमंडळ औरंगजेबाकडे पोहोचले. पहाऱ्यावरील शिपायानें अडविले. स्वपोषकाच्या आश्रयाला असलेला श्वानच तो. शेटजींनीं एक मोहोर फेकली. भाकरीचा तुकडा मिळताच कुत्र्याचे शेपूट हालले. शिपायाने वर्दी पोहोचविली.

'अभी नहीं फिर मिलना.' आतून जबाब आला. अपमानाचा कडू घोट शातिदासजींनीं तसाच गिळला. शेवटी शातिदासजींनीं लेखी अर्ज सादर केला. त्यात अकबर बादशहापासून सारखा चालत येणारा संबंध व

दिल्लीच्या तख्ताची बजावलेली सेवा त्यानीं सर्व नमूद केली आणि मंदिर-नाशासाठीं पाठविलेल्या फौजेनें जी दंगल माजविली आहे तिचा परिणाम फारच विपरीत होईल हें बजावण्यास शांतिदासजी चुकले नाहीत.

ह्या अर्जाचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. 'आम्ही करतो ते अगदीं योग्य तेंच करीत असून त्यात जराही फरक होणार नाहीं. आम्हाला तुमचा सल्ला नको आहे' असला उमेंट जबाब आला.

शेटजींच्या सर्व आयुष्यातील हा पहिलाच अपमान असल्याने त्याना फारच संताप आला. आपल्या धर्मस्थानावर झालेल्या हल्ल्यानें त्याचे पित्त उसळले. शिष्टमंडळाच्या फदात पडल्यामुळे योग्य प्रतिकार झाला नाहीं ह्याचे त्याना फार वैषम्य वाटले. मंदिरावरचा हा आघात परतविण्याची त्यानीं प्रतिज्ञा केली. बादशाही सत्तेशीं दोन हात करणे प्राप्त होतें. त्यातून काहीं निष्पन्न होईल असे वाटेना कारण सारी बादशाही सत्ता प्रतिस्पर्धी म्हणून समोर उभी राहील. शेटजींना काहीं सुचेना. समय-सूचकता दाखवून मंदिरावरील पहारेकरी व त्यांच्या अंमलदाराना लाचलुच-पती देऊन त्यानीं भुयारात नेलेल्या मूर्ति सुरक्षितपणे बाहेर आणल्या.

संध्याकाळीं औरंगजेब मंदिराकडे निघाला. सैतानी समाधानाचे हास्य त्याच्या चेहऱ्यावर विलसत होते. टप् टप् करीत तो घोड्यावरून निघाला. जणू काय लोकाच्या धर्मभावनानाच तो तुडवीत चालला होता. मंदिरा-जवळ स्मशानशांतता होती. सरदारासहित औरंगजेब आत शिरला.

'ओ हो ! कैसा लाजबाब मंदर यह !' आश्चर्याने तो उद्गारला.

'लाखो मोहोरा खर्च झाल्या आहेत हुजूर.' कोतवाल बोलला.

'तर मग ह्याचा उपयोग करून घेतला पाहिजे.' निश्चयार्थक स्वरात औरंगजेब बोलला.

'जमीनदोस्तच करावे लागेल हुजूर. मंदिराचा आणखी कोणता सदुप-योग होऊं शकणार ?' सरदार बोलला.

'ह्याची आपण मशीद बनवूं. हीं सर्व चित्रें काढून टाकून साधेपणा आणला म्हणजे झाले. हे पहा, नुरुल्ला मिस्त्रीला बोलवा आणि सुधारणा करवून घ्या. पुढचा महिना रमजानचाच आहे. मौलवी फत्तेउल्लाना बोलावून त्याच्या हस्तें खुदाच्या चरणीं ही सेवा रुजू होऊं द्या.'

औरंगजेब परतला. साऱ्या गावांत ही वार्ता पसरली. गांवातील लोकानीं निषेधार्थ लागोपाठ तीन दिवस व्यवहार बंद केले. शातिदासजीवर आघातच झाला. संतापाने ते थरथर कापूं लागले. मंदिर परत घेईन तेव्हाच अन्न ग्रहण करीन अशी त्यानीं भीष्मप्रतिज्ञा केली. त्याच्या सर्व कुटुंबानेही तीन दिवस अन्न वर्ज्य केले. बराच विचार करून शातिदासजीनी दिल्लीस जाण्याचा विचार केला.

रात्रीं नऊ वाजण्याची वेळ होती. दिवाणखान्यात वर्धमानशेटजी बसले होते. शातिदासजी तेथे आले. त्यानीं दिल्लीस जाण्याचा आपला विचार त्याना निवेदन केला.

'वेडा आहेस शातिदास. दिल्लीस जाऊन काय उपयोग?' वर्धमानशेटजी बोलले.

'शहाजहान बादशहाच्या द्वारा न्याय मिळविण्यासाठीं.'

'अरे, बेट्यावर काय बाप सत्ता चालवील? मला तर त्यात काहीच तथ्य वाटत नाहीं.'

'बादशहावर सुलतान दाराचे चागलेच वजन आहे. तेव्हा त्याच्याकडून येवढें काम सहज निघूं शकेल असे मला वाटते'

'ठीक आहे तुझे म्हणणे; प्रयत्न करावयाला काहींच हरकत नाही.' वर्धमानशेटजींनीं संमति दिली. वयाचीं साठ वर्षें उलटली असूनही एवढा लाबचा बिकट प्रवास करण्यासाठीं धर्मवीर शातिदासजी दुसऱ्या दिवशी सकाळीं निघाले.

ह्या मेरुतुंग मंदिराचा विध्वस झाल्यानंतर तेथे गेलेल्या नॉट नावाच्या युरोपियन प्रवाशाने लिहिले आहे कीं—

'अमदाबादला मोठमोठीं मंदिरे आहेत त्यात नगरशेट शातिदासजींनीं बांधलेले मंदिर सर्वांत मोठे होते. औरंगजेबाने त्याची मशीद बनविली. त्यात गोवध करून रक्तसिञ्चन केल्यामुळे जैन लोक आता तेथें पूजा करीत नाहीत. चोहो बाजूंला लहान लहान मंदिरे विखुरलेलीं आहेत. छत आणि भिंत यांवर कोरीव काम आहे परंतु औरंगजेबाच्या धर्मांधपणामुळे सर्व कोरीव मूर्तींचीं नाकें फुटलेलीं आहेत.'

राजकार्यधुरंधर व प्रतिष्ठावान शातिदास शेटजींजवळ रक्षणासाठीं रजपूत,

मध्ये व अरबाची सशस्त्र लहान तुकडी होती, तरीसुद्धा त्याच्यावर आपल्या प्राणाहून प्रिय अशा धर्मस्थानाची विटंबना उघड्या डोळयानीं पाहण्याचा भयंकर प्रसंग ओढवला. तर मग आज ज्याच्या हातीं राजसत्ता नाहीं, संघटित शक्तीही ज्यानीं निर्माण केली नाहीं, क्षत्रियत्वाला जे पारखे होत चालले आहेत, असे आम्ही भावी कालात किती पददलित बनूं याचें भेसूर चित्र अजूनही आमच्या डोळयापुढे येऊं नये ना ?

धन आणि वैभवाने जो समाज विलासी आणि पुरुषार्थहीन बनतो त्याचे कितीही प्रभावी तत्त्वज्ञान असले आणि त्याच्यामागें जिवंत व प्रभावी संरक्षणशक्ति नसली तर त्या संस्कृतीचें अस्तित्व टिकेल तरी काय ? आमच्या दुबळेपणामुळे आमचे देव दुर्बल ठरतात यापरते दुर्भाग्य ते काय असायचे ? धन व प्रतिष्ठा याचा खरा उपयोग संस्कृतीची संरक्षकशक्ति निर्माण करणे हे समजून आम्ही संघटित व प्रतिकारक्षम बनूं तो सुदिन.

७

शातिदासजी दिल्लीला पोहोचताच सुलतान दाराला जाऊन भेटले. सुलतान दारा उतावळा परंतु समंजस होता; धर्माचा कडवा नव्हता. सहिष्णुता त्याच्या अंगी बरीच होती. उपनिषदाचे त्याने फारसींत भाषान्तर करविले होते. औरंगजेबाशीं त्याचे सूत जमत नव्हते त्यामुळे ह्या संधीचा चागलाच फायदा त्याने घेण्याचे ठरविले. शातिदासजींना त्याने आश्वासन देऊन शान्त केले.

तिसऱ्या दिवशीं शातिदासजींची बादशहा शहाजहानशीं गाठ पडली. शहाजहानने शातिदासजींना मोठ्या आदराने वागविलें.

'क्यो मम्मा, सब तो खैरियत है ?'

'कहाँ की खैरियत जहापन्हाँ. मेरी सारी जिंदगानी मिट्टीमें मिल गई. सफेत बालकी भी बेइज्जती हुई.' गद्‌गद् स्वरात शातिदासजी बोलले.

'क्या हुआ ?' बादशाहाने विचारले. शातिदासजींनीं सविस्तर हकीकत सांगितली. शातिदासजींची ती दशा पाहून शहाजहानलाही वाईट वाटले.

'अब क्या चाहते हो मम्मा ?' बादशहाने प्रश्न केला.

'मंदिर मेरे सुपूर्द होना चाहीये हुजूर.' शातिदासजींनीं आपली मागणी

माडली.

'यह कैसा हो सकता है ! मस्जिदका मंदिर कैसा बनेगा ?' शहाजहानने विचारले.

'बादशहा सलामत की मेहेरबानी हो तो क्या नहीं बन सकता ! जहापन्हॉं जहागीर के हुक्मका क्या ऐसाही अंमल होगा हुजूर ?, उन्हीके नेक निगाहसे तो यह मन्दिर बना. क्या आपहीके सल्तनतमें वह तोडा जाय ?' असे बोलून शांतिदासजींनीं मंदिरासाठीं जहागीर बादशहाकडून मिळालेले आज्ञापत्र बादशहाच्या हातीं दिलें. ते आज्ञापत्र पाहून शहाजहान बराच विचारात पडला. शेवटीं त्यानें शांतिदासशेटजींना मंदिर परत करण्याचे आश्वासन दिले. काम पूर्ण होताच शांतिदासजी सुलतान दारास भेटले. त्यानीं सर्व हकीकत सविस्तरपणे त्यास सांगितली आणि ते अमदाबादेस परतले. ही आनंदाची बातमी त्यानीं सर्वांना कळविली. तिसऱ्याच दिवशी औरंगजेबास दक्षिणेकडे जाण्याचा हुकूम आला, आणि दाराचा हस्तक असलेल्या गैरतखानाची गुजरातचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. ता. ३ जुलाई १६४८ रोजीं खालीलप्रमाणें बादशहाचे गुजराथच्या सुभेदारावर फर्मान आलें.

"तोग्रा— अबदुल मुजफर, शाहबुद्दीन महंमद साहिब करानसानी शहाजादा बादशाह गाझी.

निशान— आलीशान शहाजादा बुदेल अकबाल महम्मद दारा सिकोह.

मुद्रा— महंमद दारा सिकोह इब्न शहाजहान बादशाह गाझी.

सर्व सुभेदार व मुत्सद्दी यास हल्लीं व इतःपर असे कळविण्यात येते कीं, अमदाबादचे नगरशेठ शांतिदास याच्या मंदिराबाबत शाहस्तखान उनद्-सुल्मुल्क तर्फे माननीय गैरतखानाला फरमावण्यात येते कीं—

शाहजादा सुलतान औरंगजेब बहादुरानें ह्या ठिकाणीं थोड्या महिराफी बनवून मस्जिद बनाविली होती. परंतु मुल्ला अबदुल हकीम यानी आमच्या हुजुरास असें जाहीर केले आहे कीं दुसऱ्याच्या बळजबरीने घेतलेल्या इस्टेटींत मशीद बनाविणे नियमबाह्य आहे. ही मिळकत शांतिदासची आहे. केवळ कुमारानीं केलेल्या महिराफानीं ती मशीद बनू शकत नाहीं. आम्ही हुकूम करितो कीं वरील इसमास विनाकारण त्रास दिला जाऊ नये. ह्या

महिराफी तेथून काढून घेऊन ही मिळकत शातिदासजींच्या स्वाधीन करावी.

आता असे फर्मावण्यात येते की शातिदासजींवर मेहेरनजर म्हणून ही मिळकत शातिदासजींकडे सोपवावी. त्यानीं तिचा उपभोग घ्यावा. तसेच धार्मिक क्रिया आपल्या धर्माप्रमाणे सुखाने कराव्या. कांहीं फकीर ह्या जागीं राहतात त्याना तेथून काढून लावावे. त्याना शांतिदासजीशीं तंटाफिसाद करू देऊ नये.

नामदार शहेनशाहाना असे सागण्यात आले आहे कीं ह्या मंदिराची तोडफोड काहीं बोहोरी घेऊन गेले आहेत. त्याबाबत असा हुकूम करण्यांत येतो कीं ह्या बोहोऱ्यापासून ते सामान परत घेऊन शातिदासजींच्या हवालीं करावे. जे सामान परत येणार नाहीं त्याच्या किंमतीची भरपाई करून घेऊन शातिदासजींस द्यावी. हे फरमान अगत्याचे असल्याने त्याची तात्काळ अंमलबजावणी करणे.

ह्या फर्मानांत जरासुद्धा फेरफार व अवज्ञा होता कामा नये. हिजरी सन १०५८ च्या जुमाह आल्वेर शाच्या २१ तारखेस हे फर्मान जाहीर केले असे."

ह्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची शातिदासजींची तीव्र इच्छा होती. परतु जैनसंघात मतभेद पडला. शेवटीं एक मोठें साधुसम्मेलन भरविण्यात आले. मशीद व गोवध यांमुळे त्या जागीं, मंदिर बाधणे अयोग्य ठरविलें गेले. मुसलमानांनाही तेथे काहीं करता येणे सरकारी हुकमामुळें अशक्य असल्याने ह्या टोलेजंग जिनालयाची जागा उजाड पडली आहे.

मिराते आहमदीच्या म्हणण्याप्रमाणे—

ह्या मंदिरात शंभर शंभर मण वजनाच्या दोन प्रचंड जिनमूर्ति होत्या. जव्हेरीवाड्याच्या आपल्या घराजवळील भुयारांत शातिदासजींनीं त्याची व्यवस्था केली.*

* अमदाबादच्या इतिहासात असा उल्लेख आहे कीं चिंतामणि पार्श्वनाथाच्या मंदिरातील नगरशेठ यानीं आणलेल्या मूर्तींपैकीं चिंतामणि पार्श्वनाथाची प्राणप्रतिष्ठा जव्हेरीवाड्यातील सुरजमल यानीं बनविलेल्या मंदिरांत झाली असून तीन मोठ्या चौमुखी मूर्ति जव्हेरीवाड्यातील आदीश्वराच्या मंदिरातील भुयारात व एक निशापोळमधील मंदिरात हल्लीं विद्यमान आहेत.

नगरशेठ शांतिदास ह्यांचें अमदाबादचे वैभव फारच मोठे होते. एका टोलेजंग हवेलींत ते राहत. त्याचे तीन विभाग होते. प्रत्येक विभागावर चौकी पहारा असे. सिंहद्वारावर हत्यारबद अरब ठेवलेले होते. दुसरी चौकी भैय्याची होती. तिसऱ्यावर रजपूत शिपायांचा पहारा होता. राजथाटाने नगरशेठाचे कुटुंब राही. पाचशे गाई म्हशी, पाचशे घोडे असून शिग्राम, रथ, पालख्या ह्यांची तर गणतीच नव्हती. साऱ्या हिंदुस्तानात त्यांच्या पेढीच्या शाखा पसरल्या होत्या. बादशहाची त्याना छडी व मशाल ठेवण्याची खास परवानगी होती.

शेटजीना चार स्त्रिया असून पाच कर्तबगार मुलगे होते. व्यापाराचा सर्व भार त्यानीं सामाळला होता. शेटजी निवृत्तिमय जीवन व्यतीत करीत. कोट्यवधि रुपयाची त्याची मिळकत होती. आपल्या हाताने त्यानीं दानधर्म खूप केला. मंदिर, धर्मशाळा, संघ ह्यात त्यानीं लाखो रुपये खर्च केले. त्याबरोबरच दुष्काळाने पीडित झालेल्या लोकाची त्यानी वर्षभर तरतूद केली. पाजरपोळाची स्थापना करून जनावराचीही सोय लावली. जैन तीर्थांचा कारभारही तेच साभाळीत. चिंतामणि पार्श्वनाथाच्या मंदिरविध्वंसापासून शेटजी धार्मिक व्यवहारात भाग घेत. बाकी सर्व व्यापाराचें काम त्याचे पुत्र लक्ष्मीचंदशेट पहात. खास प्रसगींच शेटजींचा सल्ला घेतला जाई.

इ. स. १६५७ त बादशहा शहाजहान फारच आजारी झाले. त्या दुखण्यातून उठण्याची कोणतीच आशा शिल्लक राहिली नाहीं. ह्यामुळें राजगादीसाठीं त्याच्या मुलात खटपटी चालू झाल्या. गुजरातमध्ये शहाजादा मुरादबक्ष होता. त्याने मोठी फौज जमवून दिल्लीवर चाल केली. त्यासाठीं लखमीचंदशेठकडून साडेपाच लाख रुपये कर्ज काढले होते. त्याबद्दल मुरादबक्षानें नवा बादशहा ह्या नात्यानें सनद करून दिली. तींत शांतिदासशेठजींनीं इनाम मिळविलेल्या शत्रुंजय परगण्याला मंजुरी दिली होती (ता. २० जून १६५८).

मुरादबक्षाने उज्जयनी सर केल्यावर लक्ष्मीचंदशेठच्या पैशाची खालीलप्रमाणें फेड करण्याविषयीं गुजरातच्या सुभेदारास लिहिलेः—

सुरतेच्या उत्पन्नातून १॥ लाख रुपये.
खंबायतच्या उत्पन्नातून १॥ लाख रुपये.
भडोचच्या उत्पन्नातून १॥ लाख रुपये.
विरमगावच्या उत्पन्नातून ५० हजार रुपये.
मिठाच्या उत्पन्नातून ५० हजार रुपये.
५५००००

मुरादबक्ष स्वभावानें भोळा होता. 'मला राज्य नको. मी मक्केला जाणार आहे' कुराणावर हात ठेवून शपथपूर्वक उच्चारलेल्या औरंगजेबाच्या ह्या शब्दावर तो फसला. औरंगजेब व मुरादबक्षाच्या संयुक्त फौजा दारावर तुटून पडल्या. सामगडला घनघोर लढाई झाली. औरंगजेबानें कपटानें व विश्वासघातानें मुरादला कैद केलें व आलमगीर हा किताब घेऊन स्वतः बादशहा बनला.

मुराद कैद झाल्यामुळे मुरादच्या आज्ञापत्राची किंमत राहिली नाहीं. लक्ष्मीचंद शेठजींचे पैसे अडकून पडले. साडेपाच लाखाची रक्कम! सर्व भाऊ विचारात पडले. शेवटीं शांतिदासशेठजींचा सल्ला घ्यावयास ते गेले. शांतिदासजी नुकतेच सामायक (गृहस्थाची दैनिक धर्मक्रिया) आटोपून बसले होते. त्याना ती सर्व हकीकत सांगितली. ते ऐकून शेठजी फारच विचारात पडले.

'कोणाला मध्यस्थी घातलें तर?' लक्ष्मीचंदनें सुचविले.

'मध्यस्थ पैसे खाऊन बसेल एवढेंच. औरंगजेबावर कोणाचेंही वजन नाहीं. बेगमा म्हणजे त्याचीं खेळणीं. सरदारावर तर त्याचा पूर्ण अविश्वास. कार्यही तितकेंच महत्त्वाचे आणि निकडीचें आहे. पैशाचा तर प्रश्न आहेच परंतु त्याबरोबर जैन तीर्थांच्या रक्षणाचा सवालही आहे. औरंगजेबाचा कटु अनुभव आहे मला.' शेटजी बोलले.

बराच विचार करून शांतिदासजींनीं शेवटी दिल्लीला स्वतःच जावयाचें ठरविलें.

'बाबा, ज्याने तुमच्या हजारो विनंत्या ठोकरीनें उडविल्या, तुमच्या इभ्रतीकडे दुर्लक्ष केले, त्याच्याकडे तुम्ही पुनः जाणार?' लक्ष्मीचंद म्हणाले.

'हा व्यक्तीचा प्रश्न नाहीं. येथे धर्माचा सवाल आहे. व्यक्तिगत माना-

पनाला तिलाजली दिल्याशिवाय सार्वजनिक कामें होत नसतात बेटा.' शांतिदासजी त्याची समजूत करीत म्हणाले. 'दिल्लीपतीच्या तीन पिढ्या मीं ह्या डोळ्यानीं पाहिल्या आहेत. त्याची रीतमातहि चांगलीच ओळखतों. मला गेल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.'

वयाच्या ६९ व्या वर्षी इ. स. १६५८ त शातिदासजी दिल्लीस गेले. धर्मवीर महात्मा! प्रवासाच्या त्रासाची त्याना कसली पर्वा? दिल्लीपति औरंगजेबाशीं त्यांची मुलाखत झाली.

'ओहो! शातिदासजी, बरेच वृद्ध झालांत कीं! कसें काय सर्व क्षेम ना?' चोहों बाजूंनीं विजयवार्ता येत असल्याने खुशींत असलेला बादशहा बोलला.

'आपण बादशहा झाल्याचें ऐकून मुद्दाम आपल्या भेटीसाठीं आलो.' नगरशेठ उत्तरले.

'हा ठीक! तुम्ही म्हणजे ह्या दरबारचे जुने हितचिंतक!'

'जी हुजूर. जहापन्हॉ अकबरशाह, जहागीरशाह आणि शहाजहॉ ह्या तिघानीं बादशाही जव्हेरी व अमीराचा सन्मान देऊन मला ऋणी केलेलें आहे.'

'आणि आम्हींही तो संबंध तसाच कायम ठेवण्याचे ठरविले आहे.' बादशहा बोलले.

'ती हुजूरची कृपा. पण सरकार, आपल्या चरणीं सादर करण्यासाठीं आणलेली ही फूल नाहीं फुलाची पाकळी स्वीकारण्याची कृपा व्हावी.' शातिदासजींनीं मोठी रक्कम पुढे ठेवीत विनति केली. औरंगजेबाच्या चेहेऱ्यावरील भाव ते निरखीत होते. लढाईमुळे बादशहा पैशाच्या फार तंगींत होता हे त्याच्या अनुभवी बुद्धीने केव्हाच ताडले होतें.

'आपला संबंध ह्यापेक्षाही फार जवळचा आहे.' आवश्यकता नसल्याचें वर दाखवूनही आतून खूष होत बादशहा बोलला.

अपेक्षेप्रमाणें सर्व घडत असल्याने शेटजींच्या तोंडावर उत्साहाची छटा दिसत होती. ते बोलले,

'केवळ सदिच्छा!'

'बरें. आमच्या लायक काहीं कामकाज?'

‘दुसरे काय काम असणार हुजूर? फक्त आमच्या तीर्थस्थानाच्या संरक्षणाची सनद देण्याची रीत जहापनाह अकबरशहापासून चालत आलेली आहे तिची अंमलबजावणी व्हावी.’ शेटजींनीं इच्छा दर्शविली.

दक्षिणच्या सुभेदारीवर असताना अंगावर जबाबदारी नव्हती परंतु बादशह । म्हणून राज्य स्थिरस्थावर करण्यासाठीं शातिदासशेठजींसारख्याची पुष्कळ गरज लागेल हें आलमगीर जाणून होता.

‘हें काय बोलता मामा ? खुदाच्या बंदगीस्थानाचे रक्षण करणे हें तर आमचे कर्तव्यच आहे. ह्याबद्दल लवकरच सनद पाठवितो. पण आपला व्यापार तर सुरळीत चालला आहे ना? आमच्या मदतीची जरूर लागेल तेव्हां अवश्य सागा.’ औरंगजेब सहानुभूतीच्या स्वरात बोलला.

‘कसला सुरळीत हुजूर ? निकडीच्या वेळीं दिलेलीं कर्जें थकलीं आहेत. त्यामुळे परदेशात आमच्या हुंड्याची किंमत कमी व्हावयाची वेळ आली आहे. म्हणून तर आपल्या चरणीं एवढी छोटीशी भेट सादर करावी लागली. एकत्र करता आली तेवढी रक्कम घेऊन आलो आहे.’ शेटजींनीं परिस्थिति सागितली.

‘कोणाकडे थकले आहेत ?’ आलमगीराने प्रश्न केला.

‘सल्तनतकडे साडेपाच लाख रुपये येणें आहेत. आणि इतर सरदारातही मोठी रक्कम गुंतली आहे.’

‘सल्तनकडे!’

‘होय सरकार. सुलतान मुरादबक्षानीं शहेनशाहतच्या नावावर घेतलेली आहे.’

मुरादबक्षाचें नाव येताच आलमगीराच्या डोळ्यात एक विलक्षण आसुरी छटा चमकली. शेटजी मनात तात्काळ उमगले.

‘गुजराथचे सुभेदार असताना त्यांनीं मागणी केली. सत्तेपुढे आमचा शहाणपणा कसा चालणार? आम्ही व्यक्तीला पैसे दिले नाहींत; पादशाहीला दिलेले आहेत. ही सहीशिक्क्याची निशाणी बघा पाहिजे तर हुजूर.’ शातिदासजी सहीशिक्का दाखवीत बोलले.

‘ठीक आहे. अर्ज देऊन जा. लवकरच निर्णय लागेल.’ विचार करींत आलमगीर बोलला.

अशाप्रकारें कामगिरी पार पाडून शातिदासजी अमदाबादेस परतले. थोड्याच दिवसांत दिल्लीहून एक फर्मान बाहेर पडले.

तोग्रा— शाहमहंमद औरंगजेब बहादूर गाझीचें महान् फर्मान.

'आमची मेहेरबानी प्राप्त करणार रहिमतखा यास फर्मावण्यात येते कीं शातिदासजीला महान् पादशहाच्या भेटीचा मोठा सन्मान प्राप्त झाला होता. त्याना राजदरबारातून अमदाबादला जाण्याची नुकतीच परवानगी देण्यात आली आहे. त्यानीं असें विदित केलें कीं सुलतान मुरादबक्षानें त्याच्याकडून साडेपाच लाख रुपये घेतलेले होते. त्यापैकीं साडेचार लाख रुपये शातिदासचा पुत्र लक्ष्मीचंद याच्या नावाने घेतले आहेत. रु.६२००० त्याचा भागीदार रवीदास याजकडून व ८० हजार रुपये त्याच्या सोयऱ्या-धायऱ्याकडून घेतले. ह्यामुळें शातिदासला फार त्रास सहन करावे लागले.

आमच्या उदारतेच्या आणि मेहेरबानीच्या छायेखालीं असलेल्या त्याना एक लाख रुपये राज्याच्या तिजोरींतून देण्यात यावेत. बाकीच्या रकमे-बाबत सतोषकारक पुरावा मिळवावा. तसेच एक लाख रुपये सुभेदार शहानवाझची परवानगी घेऊन तावडतोब देऊन टाकावे. ह्यामुळे त्याना आपला धंदा व्यवस्थित करता येईल.'

१० आगस्ट १६५८ सालचे हें फर्मान होतें. त्यानंतर लागलीच ३० जानेवारी १६५९ मध्ये दुसरे फर्मान निघालें.

आमच्या वर्तमान व भावी अधिकाऱ्याना कळविण्यात येते कीं शाति-दासाचा पुत्र लक्ष्मीचंद यानें जाहीर केले कीं त्याची मोठी रक्कम ह्या प्रातातील अधिकाऱ्यात गुंतलेली आहे. ते ती रक्कम देत नाहींत आणि खोट्या सबबी दाखवितात. त्यामुळे ती रक्कम मिळण्यासाठीं त्यानीं सल्-तनतपुढे विनंति केली आहे म्हणून फर्मावण्यात येतें कीं जें साऱ्या जगांत मान्य आहे अशा या फर्मानाप्रमाणे पूर्ण तपास करून हिशेब व दस्त-ऐवज तपासून त्यांना पैशाची भरपाई करविण्यांत मदत केली पाहिजे. कोणीही विनाकारण पैसे दडपून बसणार नाहीं याकडे लक्ष द्यावे.

शातिदासजींनीं आपल्या उतारवयात दिल्लीचा प्रवास केला त्याचें फळ म्हणून हीं फर्मानें मिळालीं. तीर्थरक्षणाचें फर्मान न मिळाल्यानें ते जरा साचितच होते. इ. स. १६५९ त हे धुरंधर धर्मवीर निजधामास गेले.

शांतिदासजींनीं लक्ष्मी मिळविली परंतु तिला दासी म्हणून राबविलें; स्वतः तिचे गुलाम बनले नाहींत. धनिक हा लोकाचा विश्वस्त असून लोक कल्याणासाठीं त्याचा पैसा असतो. हा धर्मवीर शांतिदासजींचा महान् आदर्श विलासाकडे झुकत चाललेला धनिकवर्ग आपल्यापुढें ठेवील का ? इ. स. १६६० औरंगजेबानें तीर्थरक्षणाचें फर्मान काढलें.

'सहस्रकिरणाचा पुत्र शांतिदास जव्हेरी जो जैन आहे त्याने बादशहापुढें खास मेहेरबानीची मागणी केली. सैन्याच्या कूच करण्याच्या वेळीं त्यानीं अन्नादि सामग्री पुरविण्याची मोठी कामगिरी बजाविली आहे. आणि त्याचा मोबदला म्हणून कृपादृष्टीची मागणी केली आहे. ह्यामुळे पालीताणा गाव व त्यातील मंदिर जे शत्रुंजय डोंगराच्या नांवानें ओळखलें जातें ते सर्व आम्ही उपरोक्त जव्हेरी याना इनाम देत आहोत. तेथे जे घास होईल त्यात श्रावकाच्या जनावरानीं चरावे. गोवऱ्या आणि लाकडेंही श्रावकाच्या उपयोगात यावीं पुढे होणाऱ्या कोणींही अधिकाऱ्याने ह्यांत फरक करू नये.

ह्याशिवाय जुनागडमध्ये गिरनार व शिरोहींत आबू नावाचा पर्वत आहे. हे दोन्ही पर्वत आम्ही शांतिदास जव्हेरींस देत आहोंत. ह्या फर्मानाच्या द्वारा अधिकाऱ्याना फर्मावण्यात येते कीं त्याचा उपभोग त्याना घेऊं द्यावा. कोणत्याही राजानें तक्रार करू नये किंवा त्याच्याजवळ दरसाल सनदेची मागणी करूं नये.

याचा जो कोणी भंग करील तो ठपक्यास पात्र होऊन अल्लाचा गुन्हेगार ठरेल. त्यास याबाबत वेगळी सनद देण्यात आली आहे.

पण आपल्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षांत घेतलेल्या श्रमाचे सार्थक झालेले पाहण्यास नगरशेट इहलोकीं राहू शकले नाहींत. लंघ्यते न खलु कालनियोगः । दुसरें काय ?

अशा थोर, दीर्घोद्योगी आणि कर्तबगार धर्मवीराच्या चरित्रश्रवणाने आपलीं अंतःकरणे पुनीत होवोत.

अकबरप्रतिबोधक जगद्‌गुरु हीरविजयसूरि

१

जगाचे नदनवन म्हणजे हिंदुस्थान. हिंदुस्थानच्या सुसंस्कृत भूमीमध्यें, पूण्यभूमीमध्ये अनेक जगद्वद्य ज्योतिर्धराचा जन्म झाला आहे. जगाच्या पुरातन संस्कृतीमध्ये भारतीय संस्कृतीची गणना करण्यात येते. ह्याच भूमीमध्ये हिंदुधर्म, बौद्धधर्म आणि जैनधर्मासारख्या महान् धर्माचा उदय झाला आहे. पौर्वात्य संस्कृतीचा प्रकाश भारतवर्षाने सर्व जगास दिला आहे.

जेव्हा जगाच्या कित्येक भागात अधःकाराचें, अज्ञानाचें साम्राज्य पसरले होते, इतर ठिकाणचे मानव जेव्हा जंगली अवस्थेमध्ये होते, त्या समयीं भारताची प्रजा प्रगतीच्या उच्च शिखरावर होती.

भारताचे ऐश्वर्य आणि समृद्धि जगास थक्क करून सोडीत. ह्या नदनवनामध्ये सर्व जगास पुरे पडेल इतके धनधान्य पिकत असे. नाना-प्रकारच्या सुंदर फुलाफळानीं ही भूमि शृंगारलेली होती. गंगा, यमुना, सिंधु यांच्या पवित्र पाण्याने ही भूमि, ही फुलबाग सजवली होती. पुरातन काळापासून ही भूमि सुवर्णभूमि म्हणून प्रसिद्ध आहे. येथील भूगर्भामध्यें सोनें, रुपें इत्यादि अनेक धातु सापडत. अशा या समृद्ध, सुसंस्कृत नंदन-वनानें मुसलमानाना आणि नतर युरोपियनाना आकर्षिलें यांत आश्चर्य ते काय ?

हिंदुस्थानावर प्रथम हल्ला परकीयाकडून सातव्या शतकात झाला. रज-पूत राजाचा पाडाव करून मुसलमानानीं शक्तीच्या जोरावर आपली सत्ता हळूहळू प्रस्थापित केली. सपत्तीची लालसा आणि ईस्लामी धर्माचा प्रसार या ध्येयानें प्रेरित होऊन त्यानीं हिंदुस्थानावर स्वारी केली होती. हे ध्येय साध्य करण्यासाठीं त्यानी कित्येक लढाया केल्या, कित्येक अत्युतम मंदि-राचा नाश केला, आणि अन्यधर्मीयावर जिजिया कर लादून अन्य रीतीनें त्यांचा छळ केला. त्या काळीं मुसलमान राजांकडून प्रजेला ज्या हाल-

अपेष्टा सहन कराव्या लागल्या त्याला हिंदुस्थानच्या इतिहासात तोड नाहीं.

कत्तल व क्रौर्य यानीं भरलेल्या आठशें वर्षांच्या कारकीर्दीनंतर अकबर नांवाचा मोगल बादशहा इ. स. १५५६ मध्ये उदयास आला. स्वतःच्या कर्तृत्वाने हिंदुस्थान पादाक्रांत करणाऱ्या बाबराचा तो नातू होता. पण आपल्या बापाच्या (हुमायुनाच्या) कारकीर्दीत विस्कळित झालेले हे साम्राज्य स्वतःच्या पराक्रमाने व पुरषार्थानेंच त्याने परत मिळविले. तो धर्माने मुसलमान होता तरी त्याच्याजवळ हिंदु-मुसलमान असा भेदभाव नव्हता. तो जसा पराक्रमी व प्रजावत्सल होता तसाच तो मोठा विद्वानाचा चाहता आणि धर्मजिज्ञासु होता. आणि त्यामुळे हिंदुस्थानच्या इतिहासात अकबरास एक विशिष्ट स्थान मिळाले आहे. मुसलमानी बादशहामध्ये नव्हे तर हिंदुस्थानामध्यें जे जे पराक्रमी आणि न्यायी सम्राट् होऊन गेले त्यामध्यें अकबराची गणना प्रामुख्याने करण्यात येते.

हुमायुनानतर भारतवर्षाची स्थिति सुधारण्यासाठीं आणि प्रजेचे पुत्राप्रमाणे पालन करण्यासाठी जशी एका सम्राटाची— अकबराची— जरूरी होती तशीच जिजिया कराचे दुःख नाहीसे करण्यासाठीं, हिंदुस्थानामध्ये सुरू असलेला हिंसेचा नंगा नाच थाबविण्यासाटीं आणि जैनाना मार्गदर्शन करून त्याच्या तीर्थस्थानाचे रक्षण करण्यासाठीं एका महात्म्याची अत्यत जरूरी होती.

विधीने हे काम हीरविजयसूरींकडे सोपविले होते. त्याचा जन्म पालनपूर मुक्कामीं कुशाशाह आणि नाथीबाई याच्या पोटीं झाला. मार्गशीर्ष शुा नवमीचा तो दिवस होता. विक्रम सवत १८५३ (इ. स. १५२७) होते.

२

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो नहि सर्वत्र चन्दनं न वने वने ॥ —भर्तृहरि.

त्या वेळीं ते आठ दहा वर्षाचे असतील नसतील. त्यानीं आपल्या वडिलास विचारले, ‘बाबा, आपल्या कुळातून कोणी साधु झाला आहे का?’ कुशाशाहशेटना हीरजींच्या प्रश्नाचे जरा आश्चर्य वाटले. आपल्या प्रश्नाचे काहींच उत्तर मिळत नाहीं असें पाहून हिरजी म्हणाले, ‘बाबा, ज्या घराण्यात कोणी

साधु पुरुष अवतरला नाहीं ते घराणें कसें उच्च समजावें ? कुणीतरी साधु होऊन कुळास दिपविलें पाहिजे.'

वरील उद्गार काढणाऱ्या हीरजींचें जीवन कसें रंगविलें जाणार आहे याची कुशाशाहास कल्पनाही नसेल. आपला धाकटा मुलगा दोन हजार साधूंचा प्रमुख होईल, नुसता प्रमुख नाहीं तर अखिल जैनसमाजाची एक वदनीय विभूति म्हणून तो प्रसिद्धि पावेल, त्याची मूर्ति होऊन तो पूजला जाईल, यवन बादशहा अकबर त्याचा सन्मान करील, साधा सन्मान नाहीं तर त्याचा दिव्य उपदेश ऐकून त्यास 'जगद्गुरु' पदवी अर्पण करील आणि जीवहिंसेला प्रतिबंधक अशीं फर्मानें काढील, असें कुशाशहास स्वप्नात तरी वाटले असेल का ? पण बालहीरजींनीं आपले बोल मात्र खरे केले.

हीरजी अवघे अकरा वर्षांचे असताना त्याचे वडील कुशाशाह आणि मातोश्री नाथीबाई वारली. हीरजींच्या थोरल्या बहिणीनें— विमलबाईनें— हीरजीला आपल्या सासरीं (पाटण) नेले. पाटण येथील जैनमय वातावरणात हीरजींचे मूळचे धार्मिक संस्कार अधिक दृढ झाले. जैननगरी म्हणून प्रसिद्ध पावलेल्या पाटणमध्यें जेव्हा हीरजींनीं पाय ठेवला तेव्हा आचार्य विजयदानसूरींचें वास्तव्य तेथेच होते. सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं निरनिराळे पंथ* निघून श्वेताम्बरमताच्या साम्राज्यात जी छिन्नभिन्नता झाली होती आणि श्रावकाच्या व साधूच्या आचारांत जी शिथिलता आली होती ती नाहींशी करून समाजास पुन्हा एकत्रित करण्याचे ज्यानीं महान् काम केले अशा आनंदविमलसूरींचे ते शिष्य होते. विजयदानसूरींच्या सहवासांत जसजसे हीरजी येऊं लागले तसतसें संसारत्यागाचे विचार त्याच्या मनात येऊं लागले. खेळण्यातून त्याचे मन उडून गेले. पाठशाळेमध्यें त्याचा बराच वेळ जाऊ लागला. एखाद्या भाविक श्रावका-

---

* आनंदविमलसूरि. इ. स. १४५२ पासून इ. स. १५४६ पर्यंत श्वेताम्बर जैन समाजामध्यें पाच पंथ निघाले. ते असें : (१) लोंकाशाहाचें लोंकामत. ह्या पंथास 'स्थानकवासी' असें दुसरें नाव आहे. (२) कटुकचें कटुकमत. (३) विजयचें विजयमत. (४) पार्श्वचंद्राचें पार्श्वचंद्रमत. (५) सधर्ममत. या पाच पंथांपैकीं फक्त पहिल्या पंथाची वाढ झाली.

प्रमाणें ते सामायिक, प्रतिक्रमण आणि देवपूजा करूं लागले. संताचा सहवास, वाचनपठनाचा व्यासंग आणि अरिहंताबद्दल अंतर्यामीं असलेली आसक्ति ह्यामुळे हीरजींच्या बालमनात क्रांति घडून आली. त्यास ससार असार वाटूं लागला. तसे पाहिले तर संसार अजून त्यानीं पाहिलाही नव्हता. पण संसाराची निरर्थकता मात्र त्या भव्य आत्म्यास पटली होती.

आपल्या मनातील दीक्षेसंबधीच्या भावना त्यानीं विमलबाईपुढें प्रकट केल्या. विमलबाई रडूं लागली. आपल्या भावाच्या दीक्षेमुळे आपणास तो अंतरणार हा विचार तिला असह्य होऊं लागला. इतर वडील बहिणी-प्रमाणे पोरका झालेल्या आपल्या धाकट्या भावाविषयीं तिचे विचार होते. हीरजी मोठा होईल, विवाह करून संसार थाटील आणि व्यापारधंदा करून अगणित संपत्ति मिळवील, अशा कल्पनासाम्राज्यात विमलबाई वावरत होती. तिला बिचारीला काय माहीत कीं हीरजी हातात तराजू धरण्यास जन्मले नव्हते! अगणित पैका मिळवून शेटजी होऊं इच्छीत नव्हते! तर *राजीया, वजिया, रामजी, इंद्रजी, सोमकरण, उदयकरण-सारख्या गर्भश्रीमंत श्रावकाना पूज्य होण्यासाठीं आणि अकबराच्या सुभेदारावर प्रभाव पाडण्यासाठी ते अवतले होते! दुःखाचा वेग ओसरल्या-नंतर ती हीरजीस म्हणाली, 'ही दीक्षा हा पोरखेळ नाहीं. ती तलवारीच्या धारेवरील कसरत आहे. त्यात कायमचे घर सोडावे लागतें. पायीं प्रवास

---

* राजीया व वजिया. हे बंधुद्वय मूळचे खंबायतचे रहिवासी. पण गोव्यामध्यें व्यापारासाठीं राहत असत. त्यानीं पाच मोठालीं जिनमंदिरें बाधलीं. मोठमोठाले संघ काढले. एकदर ३३ लाख रुपये दानधर्मात खर्च केले. राजदरबारामध्यें ह्याचें चागलें वजन होतें. ते सूरीश्वराचे श्रावक होते.

रामजी व इंद्रजी दोन्ही गधारचे रहिवासी. इंद्रजीस दीक्षा घेण्याची फार इच्छा होती. पण त्याचा भाऊ नाथा यानें विरोध करून दीक्षा घेऊ दिली नाहीं इंद्रजी फार श्रीमंत होता. स्वत:च्या आयुष्यामध्यें ३६ प्रतिष्ठामहोत्सव त्यानें साजरे केले होते. रामजी हाही सूरीश्वराचा भक्त होता. त्यानें सिद्धाचलजींवर एक मंदिर बाधलें.

सोमकरण व उदयकरण. दोन्ही खबायतचे रहिवासी. उदयकरणानें सूरीश्वराच्या स्वर्गवासानंतर सिद्धाचलजींवर सूरीश्वराच्या पादुकाची स्थापना केली. तेथें सूरी-श्वराच्या अकबरास उपदेश करून केलेल्या कार्याचें थोडक्यात वर्णन दिलें आहे.

करावा लागतो. केशलोचन करावें लागते. आठ आठ दिवसाचे उपवास करावे लागतात. हे तुझ्याने कसे जुळेल? यावर हीरजी उत्तरले, 'बेन, संसारामध्ये एकदा मनुष्य अडकला म्हणजे त्याच्या हातून धर्मसाधना होत नाहीं. आणि उत्कृष्ट प्रमाणात धर्मसाधना झाली नाही म्हणजे मोक्ष लवकर मिळत नाही. अन् मला तर त्वरित मोक्ष मिळवायचा आहे. तेव्हा उत्कृष्ट प्रमाणात त्याग करण्यास मला तयार झालेच पाहिजे.' विमलबाईला हे तत्त्वज्ञान पटत होतें कारण ती एक सुसस्कृत श्राविका होती. प्रश्न होता फक्त मोह आवरण्याचा. पण हीरजीच्या निश्चयाच्या बळापुढे विमलबाईचे काहीं चालले नाहीं. शेवटी मातृप्रेमावर वीतरागावरील भक्तीनें विजय मिळविला. विवेकाने मोहास जिंकले. विमलबाईची समति मिळताच हीरजींनीं आपले हृदय गुरुमहाराजापुढे उघडे केले. त्याच्या मनाचा कल पाहून वैराग्य आणि वीतरागाचे उपासक— विजयदानसूरींनीं— त्यास आपले शिष्य करण्याचें ठरविले. दीक्षोत्सवसमारंभ मोठ्या थाटामाटात वि. सं. १५९६ मध्ये झाला.

तेरा वर्षांचे बाल हीरजी बालसाधु झाले. हीरजीचे हीरहर्ष झाले. खूप दिवस निघून गेले. हीरहर्षांनीं तारुण्यात प्रवेश केला. तारुण्य म्हणजे विकाराचे घर. हीरहर्षांनीं विकाराना वीतरागाची सेवा करण्यात वळविले. सत्ता आणि सपत्ति मिळविण्याच्या मानवी लालसेचे त्यानी अहिंसारूपी वृक्षास पाणी घालण्यात, फोफावण्यात रूपान्तर केले. हीरहर्षांचे घर आता चार भिंतींचे राहिले नाहीं. चारी दिशा जिने व्यास केल्या आहेत अशी अखिल चराचर जीवसृष्टि हीच त्यांची निवासभूमि झाली. जागा वाढली म्हणजे पसारा वाढतो. निवासभूमीचा व्याप वाढल्यावर जबाबदारी अनेक पटीने वाढते हें हीरहर्षास ठाऊक होते. जबाबदारी पार पाडण्यासाठीं जय्यत तयारी चालविली. धर्मशास्त्राचा—विशेषतः आगमाचा* आणि वाङ्मयशास्त्राचा अभ्यास त्यानी गुरूपाशीं केला होता. पण महत्त्वाकांक्षी व तरुण हीरहर्षांचे हृदय सेनापतीच्या पदाची हाव धरणाऱ्या एखाद्या सैनिकाप्रमाणे होतें. सेनापतीस रणांगणावरील डाव माहीत असतात. लष्करी

* आगम = जैनांचे धार्मिक ग्रंथ.

शिक्षण घेऊन तो तरबेज झालेला असतो. आचार्यांना साधूला शिकवावे लागते. जनसमूहावर प्रभाव पाडावा लागतो. तेव्हा शास्त्राचा सखोल अभ्यास असल्याशिवाय आपली प्रगति होणार नाही हे पाहून अवगत नसलेल्या न्यायशास्त्रामध्ये प्रभुत्व मिळविण्यासाठीं त्या वेळी नैयायिक पंडिताचे आगर असलेल्या देवगिरीस (दौलताबादेस) आपल्या दोन गुरु-बधूबरोबर जाण्याचे त्यांनीं ठरविले. देवगिरीमध्ये तर्कपरिभाषा, मित-भाषिणी, शशधर, मणिकंठ इत्यादि ग्रंथांचे त्यांनी अध्ययन केले. व्याकरण, ज्योतिष, रघुवंशादि काव्यात त्यांनी निपुणता मिळविली. देवगिरी-मध्ये विद्याभ्यासासाठीं झालेला खर्च देवगिरीच्या संघानें आणि तेथील प्रमुख शेट देवसीशाह यांनीं केला.

धर्मशास्त्र, वाङ्मय आणि न्याय यामध्ये अशा रीतीने पारंगत झाल्या-नंतर वि. स. १६०७ मध्ये हीरहर्षांस पंडितपद अर्पण करण्यात आले. तीन वर्षांनंतर त्यांचे असामान्य वैराग्य, अमोघ वक्तृत्व आणि असाधारण विद्वत्ता पाहून त्यांच्या गुरूंनी त्यांना आचार्य केले. तेव्हापासून ते हीर-विजयसूरि म्हणून ओळखण्यात येऊ लागले. आचार्यपद मिळाल्यानंतर बारा वर्षेपावेतो सूरींना विजयसेनसूरीचा सहवास लाभला. या सहवासात त्यांनी तत्कालिन धार्मिक आणि राजकीय प्रवाहाचा सूक्ष्म अभ्यास केला. गुरु स्वर्गस्थ झाल्यानंतर जैनशासनसेवेची संपूर्ण धुरा सूरीश्वरांच्या शिरावर पडली.

नंतर सूरीश्वर आपल्या शिष्यांसहित धर्मोपदेश देण्यासाठीं गुजरातमध्ये ठिकठिकाणी विहार करूं लागले. त्या वेळी अकबर बादशहाने तो सबंद प्रांत आपल्या ताब्याखाली घेऊन त्याचा राज्यकारभार करण्यासाठी ठिक-ठिकाणी सुभेदार नेमले होते. नवीन राजवट सुरू झाल्यामुळे आणि अकबराने नेमलेले सुभेदार लहरी व स्वच्छंदी असल्यामुळे सबंद प्रांतात अराजकता माजली होती. सूरीश्वरासारखे संत पुरुष या बंडाळीत होरपळून निघाले. पण संसारत्यागानंतर ज्यांनीं सुखाची लालसा सोडली होती अशा सूरीश्वरांना या दुःखद प्रसंगाबद्दल उद्वेगही वाटत नव्हता. ते स्थितप्रज्ञ झाले होते.

३

मताच्या जीवनाकडे दृष्टि फेकल्यास एक गोष्ट प्रामुख्याने आढळते. ती ही कीं सज्जनतेचा, सुसंस्कृतीचा सुगंध त्याच्यामुळे सारखा वातावरणात, लोकसमूहात दरवळत राहतो. आणि तो सारखा दरवळत राहावा हीच त्याची आत्यंतिक इच्छा असते. पण याच इच्छेसाठी लोकांचे कल्याण व्हावे याच प्रखर भावनेसाठी त्याना स्वकीयाकडून विरोध होतो. केव्हा केव्हा त्याना स्वतःच्या प्राणावरही उदार व्हावे लागते.

आपल्या सात्त्विक उपदेशासाठीं महान् तत्त्वज्ञानी सॉक्रेटीसाला विषाचा प्याला प्यावा लागलाच की नाही ? ख्रिश्चन धर्माच्या प्रणेत्याला फासावर लटकावे लागले ! तुकारामाच्या अभंगानीं आणि भक्तीने लोक वेडावले. पण तुकारामाची महत्ता मुंबाजीस आणि सालोमालोस कुठे सहन झाली ? नरसी भगतास हरिजनामध्ये मिसळल्यामुळे आपल्या सख्ख्या भावाच्या आणि भावजयीच्या व समाजाच्या शिव्या खाव्या लागल्या.

इतर संताप्रमाणे सूरीश्वरावरही कित्येक दुःखद प्रसंग त्याच्या पूर्वायुष्यात ओढवले. एकान्तवास, बादशाही शिपायाचा सतत ससेमिरा आणि सुभेदाराची करडी नजर यामध्ये त्यानीं कित्येक दिवस कठले. पण प्रत्येक ठिकाणी प्रसंगावधान राखून त्यानी आपली सुटका करून घेतली आहे.

खंबायतमध्ये ह्याचा एकदा मुक्काम असताना सकल श्रीसंघ पूजा, प्रवचन आणि प्रतिक्रमणात तन्मय झाला होता. पण रत्नपाल नावाच्या श्रावकाची परिस्थिति निराळी होती. आपल्या धाकट्या मुलाच्या (रामजीच्या) आजारामुळे रत्नपालाच्या घरातील मंडळीचे सर्व गोष्टींवरून मन उडाले होते. रामजी वाचेल की नाहीं याची शाश्वति कोणास वाटत नव्हती. पण रामजीचे नशीब पडले शिकंदर ! त्यास लवकर आराम पडल्यामुळे रत्नपाल आपल्या नियमानुसार सुरीश्वराचे प्रवचन ऐकण्यास आश्रमात जाऊं लागला. सूरीश्वराचे शैलीयुक्त प्रवचन, प्रवचनात संसाराच्या असार स्वरूपाचे केलेले विशदीकरण आणि त्यातून निघालेले साधु जीवनाचे सुंदर चित्र यामुळे हळव्या बनलेल्या रत्नपालास स्मशानवैराग्य (?) प्राप्त झाले. एकदा सूरीश्वराजवळ येऊन तो म्हणाला, 'आचार्यश्री, आपला उपदेश फार बोधक आणि कल्याणकारक असतो. ह्यामुळे वैराग्याचे विचार

माझ्या डोक्यात सारखे घोळत असतात. रामजी मोठा झाला म्हणजे त्यास दीक्षा द्यावी असे मीं ठरविले आहे.' समापण येथे संपले अन् सुरीश्वर काही दिवसाच्या वास्तव्यानतर निघून गेले. काहीं वर्षांनंतर ते परत खंबा-यतमध्ये आले असताना त्यानीं रत्नपालास आपल्या आश्वासनाची आठवण करून दिली. पण रत्नपाल आपल्या वचनास विसरला. त्याच्या घरची मडळी सूरीश्वरावर राग काढूं लागली. वारा कोणत्या दिशेने वाहतो हे पाहून सूरीश्वरानीं आपले धोरण बदलले. पण शेवटीं एक मोठा प्रसंग त्याच्यावर गुदरला. रामजीच्या नातलगाने खंबायतच्या सुभेदाराचे कान भरले. खानास त्याने सागितले, 'आठ वर्षाच्या कुमारास सूरीश्वर साधु बनवीत आहे. तेव्हा त्यास अटक होणे जरूर आहे.' हलक्या कानाच्या सुभेदाराने सूरीश्वराना पकडण्याचा हुकूम केला. त्याचा कसून तपास कर-ण्यात आला. पण ते सापडले गेले नाहींत. तेव्हा रत्नपाल व रामजीस* खानापुढे खेचण्यात आले. रामजीचे सुदर रूप आणि लहान वय पाहून खान रत्नपालास म्हणाला, 'काय रे, तूं याला फकीर बनवितोस? याद राख. माझ्याशी गाठ आहे.' रत्नपालाने मोठी काकुळत करून स्वतःची सुटका करविली. या भानगडींत सूरीश्वराना तेवीस दिवसाचा एकान्तवास सहन करावा लागला. आपल्या पाठीमागे धर्माचा दीपक कोणीतरी प्रज्वलित ठेवावा अशी सूरीश्वराची उत्कट इच्छा सुभेदाराच्या कायद्यात गुन्ह्याच्या कक्षेत येऊं लागली. त्यातून सुटका होण्यासाठीच सूरीश्वराना एकान्तवासाचा भूदंड!

दुसरे सकट उद्भवलें तें असे. सूरीश्वराबद्दल एका हितशत्रूने अमदा-बादच्या सुभेदाराचे—शिहाबखानाचे—मन कलुषित केले. सूरीश्वराना ताबड-तोब कोर्टात खेचण्यात आले. पाऊस न पाडण्याचा त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला होता. त्याबद्दल त्याना जाब विचारण्यात आला! जणू काय पाऊस पाडणे अथवा पडण्यास अटकाव करणे सूरीश्वराच्याच हाती होते! आपल्या जबानीत सूरीश्वर म्हणाले, 'आम्हीं पाऊस बद का करावा? पाऊस न पडण्याने लोक दुःखी होतील. ज्यामुळे जनता दुःखी होईल अशाने आम्हास काय लाभ होणार?' सूरीश्वराच्या सरळ उत्तराने खान

* हा रामजी पुढें सूरीश्वरापाशीं दीक्षा घेतो.

मोठ्या विचारात पडला. इकडे शहरात सूरीश्वर सुभेदाराकडे असल्याची बातमी पसरली. सुप्रसिद्ध शेट कुंवरजी यानीं सुभेदाराकडे जाऊन सूरीश्वर फकीर आहेत, गरिबाचे कैवारी आहेत, असे सागून सूरीश्वराच्या सज्जनतेबद्दल खानाची खात्री केली. निकालामध्यें सूरीश्वरांना निर्दोषी ठरविण्यात आलें. पण सूरीश्वरांवर रचलेल्या दुष्ट थट्टेचे नाटक तेथे संपले नाहीं. आचार्य महाराजावरील एक मोठे सकट टळले म्हणून अमदाबादच्या जैनानीं मोठ्या आनदानें व उत्साहाने दानधर्मास सुरवात केली. दानधर्माच्या ठिकाणीं इनाम घेण्याच्या उद्देशाने एक तुर्की शिपाई येऊन थडकला. सुरीश्वराना कोणीं सोडविले या मुद्यावर कुंवरजीची व त्याची खडाजंगी झाली. पण नाइलाज झाला म्हणून सूरीश्वर कसे अडकवले जात नाहींत हे पाहू अशी धमकी देऊन तो रागारागात निघून गेला. कोतवालापाशी त्यानें सूरीश्वराबद्दल कुरकूर केली. खानाने कोतवालावर विश्वास ठेवला. आणि ह्याचा परिणाम सूरीश्वरांना कैद करण्याचा हुकूम सोडण्यात झाला. पाशवी सत्तेचे बाहुले होऊन बसलेल्या शिपायानीं सूरीश्वराना पकडले. पण सुदैवाने त्याची विटंबना झाली नाहीं. रायबगंधर्व व सोमसागर नावाच्या दोघा वीरानी शिपायाचीं हाडे मोकळीं करून त्याना पिटाळून लावले. सूरीश्वरानी लगेच तेथून विहार केला. खानास ही हकीगत समजली. तो गुरगुरला. एक भली मोठी शिपायाची तुकडी सूरीश्वराना पकडण्यासाठीं पाठविण्यात आली. ही बातमी हा हा म्हणता गावात पसरली. घराचे दरवाजे बंद झाले. सूरीश्वराचा कसून तपास करण्यात आला. पण ते सापडले नाहीत. त्याच्याऐवजीं दोघा निरपराधी साधूना पकडण्यात आले. बिचाऱ्याना फुकट त्रास सहन करावा लागला. तपासान्तीं ते निराळेच साधु आहेत असें कळल्यानतर त्यांना सोडण्यात आलें. अशा रीतीने हे प्रकरण संपलें. या प्रसगी सूरीश्वराना पळून जाणे भाग पडले.

सत्तेनें उन्मत्त झालेल्या सुभेदाराकडून आणखी दोन वेळा असाच त्रास देण्यात आला. अर्थात् या दोन्ही प्रसंगाना दोन साधूच कारणीभूत झाले होते.

[जगमाल नावाच्या एका साधूस धर्मग्रथ वाचण्यास न मिळाल्यामुळे त्यानें सूरीश्वराकडे तक्रार नेली. पण त्याचा काहीं उपयोग झाला नाहीं.

माझ्या डोक्यात सारखे घोळत असतात. रामजी मोठा झाला म्हणजे त्यास दीक्षा द्यावी असे मीं ठरविले आहे.' संभापण येथे संपले अन् सुरीश्वर काही दिवसाच्या वास्तव्यानंतर निघून गेले. काहीं वर्षानंतर ते परत खंबा-यतमध्ये आले असताना त्यानीं रत्नपालास आपल्या आश्वासनाची आठवण करून दिली. पण रत्नपाल आपल्या वचनास विसरला. त्याच्या घरची मंडळी सूरीश्वरावर राग काढूं लागली. वारा कोणत्या दिशेने वाहतो हे पाहून सूरीश्वरानी आपले धोरण बदलले. पण शेवटीं एक मोठा प्रसंग त्याच्यावर गुदरला. रामजीच्या नातलगाने खंबायतच्या सुभेदाराचे कान भरले. खानास त्याने सांगितले, 'आठ वर्षांच्या कुमारास सूरीश्वर साधु बनवीत आहे. तेव्हा त्यास अटक होणे जरूर आहे.' हलक्या कानाच्या सुभेदाराने सूरीश्वराना पकडण्याचा हुकूम केला. त्याचा कसून तपास करण्यात आला. पण ते सापडले गेले नाहींत. तेव्हा रत्नपाल व रामजीस खानापुढे खेचण्यात आले. रामजीचे सुदर रूप आणि लहान वय पाहून खान रत्नपालास म्हणाला, 'काय रे, तूं याला फकीर बनवितोस? याद राख. माझ्याशी गाठ आहे.' रत्नपालाने मोठी काकुळत करून स्वतःची सुटका करविली. या भानगडींत सूरीश्वराना तेवीस दिवसाचा एकान्तवास सहन करावा लागला. आपल्या पाठीमागे धर्माचा दीपक कोणीतरी प्रज्वलित ठेवावा अशी सूरीश्वराची उत्कट इच्छा सुभेदाराच्या कायद्यात गुन्ह्याच्या कक्षेत येऊं लागली. त्यातून सुटका होण्यासाठीच सूरीश्वराना एकान्तवासाचा भूर्दंड!

दुसरे सकट उद्भवलें तें असे. सूरीश्वराबद्दल एका हितशत्रूने अमदाबादच्या सुभेदाराचे— शिहाबखानाचे— मन कलुषित केले. सूरीश्वराना ताबडतोब कोर्टात खेचण्यात आले. पाऊस न पाडण्याचा त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला होता. त्याबद्दल त्याना जाब विचारण्यात आला! जणू काय पाऊस पाडणे अथवा पडण्यास अटकाव करणे सूरीश्वराच्याच हाती होते! आपल्या जबानीत सूरीश्वर म्हणाले, 'आम्ही पाऊस बद का करावा? पाऊस न पडण्याने लोक दुःखी होतील. ज्यामुळे जनता दुःखी होईल अशाने आम्हास काय लाभ होणार?' सूरीश्वराच्या सरळ उत्तराने खान

* हा रामजी पुढें सूरीश्वरापाशीं दीक्षा घेतो.

मोठ्या विस्तारात पडला. इकडे शहरात सूरीश्वर सुभेदाराकडे असल्याची बातमी पसरली. सुप्रसिद्ध शेट कुंवरजी यानीं सुभेदाराकडे जाऊन सूरीश्वर फकीर आहेत, गरिबाचे कैवारी आहेत, असे सागून सूरीश्वराच्या सज्जनतेबद्दल खानाची खात्री केली. निकालामध्ये सूरीश्वराना निर्दोषी ठरविण्यात आले. पण सूरीश्वरावर रचलेल्या दुष्ट थट्टेचे नाटक तेथे सपले नाही. आचार्य महाराजावरील एक मोठे संकट टळले म्हणून अमदाबादच्या जैनानीं मोठ्या आनदाने व उत्साहाने दानधर्मास सुरवात केली. दानधर्माच्या ठिकाणीं इनाम घेण्याच्या उद्देशाने एक तुर्की शिपाई येऊन थडकला. सुरीश्वराना कोणीं सोडविलें या मुद्यावर कुंवरजीची व त्याची खडाजंगी झाली. पण नाइलाज झाला म्हणून सूरीश्वर कसे अडकवले जात नाहींत हे पाहू अशी धमकी देऊन तो रागारागात निघून गेला. कोतवालापाशी त्याने सूरीश्वराबद्दल कुरकूर केली. खानाने कोतवालावर विश्वास ठेवला. आणि ह्याचा परिणाम सूरीश्वराना कैद करण्याचा हुकूम सोडण्यात झाला. पाशवी सत्तेचे बाहुले होऊन बसलेल्या शिपायानीं सूरीश्वराना पकडले. पण सुदैवाने त्याची विटंबना झाली नाहीं. राघवगंधर्व व सोमसागर नावाच्या दोघा वीरानी शिपायाचीं हाडे मोकळी करून त्याना पिटाळून लावले. सूरीश्वरानी लगेच तेथून विहार केला. खानास ही हकीगत समजली. तो गुरगुरला. एक भली मोठी शियायाची तुकडी सूरीश्वराना पकण्यासाठीं पाठविण्यात आली. ही बातमी हा हा म्हणता गावात पसरली. घराचे दरवाजे बंद झाले. सूरीश्वराचा कसून तपास करण्यात आला. पण ते सापडले नाहीत. त्याच्याऐवजीं दोघा निरपराधी साधूना पकडण्यात आले. बिचाऱ्याना फुकट त्रास सहन करावा लागला. तपासान्तीं ते निराळेच साधु आहेत असे कळल्यानंतर त्याना सोडण्यात आले. अशा रीतीने हे प्रकरण संपले. या प्रसंगी सूरीश्वराना पळून जाणे भाग पडले.

सत्तेने उन्मत्त झालेल्या सुभेदाराकडून आणखी दोन वेळा असाच त्रास देण्यात आला. अर्थात् या दोन्ही प्रसंगाना दोन साधूच कारणीभूत झाले होते.

[जगमाल नावाच्या एका साधूस धर्मग्रथ वाचण्यास न मिळाल्यामुळे त्याने सूरीश्वराकडे तक्रार नेली. पण त्याचा काहीं उपयोग झाला नाही.

नतर त्यास संघाबाहेर टाकण्यात आले. त्यामुळे जगमालने बोरसदच्या हाकिमाकडे फिर्याद नेली. सूरीश्वराना बोरसद सोडणे भाग पडले. त्याच्या पाठीमागे घोडेस्वार आले. पण जैन श्रावकानी त्या घोडेस्वाराची समजूत घालून त्याना मागे फिरविले. सं. १६३४ मध्ये सूरींनी पाटणचे जवळ असलेल्या कुणघेर येथे सोमसुदर नावाच्या आचार्यास वंदन करण्याचे नाकबूल केल्यामुळे त्याने ईर्ष्येने पाटणच्या सुभेदाराचे सूरीश्वराविरुद्ध मन वळविले. सूरीश्वरानी रातोरात वडावली येथे प्रयाण केले. तेथे एका घराच्या भुयारात काहीं वेळ काढल्यानतर तीन महिने त्याना गुप्तपणे राहावे लागले.]

या प्रत्येक प्रसगातून सुटण्याची सूरीश्वरानी शिकस्त केली आहे. संकटामागून संकटे येताना सूरीश्वरानीं समयसूचकता राखली नसती तर कदाचित् त्याना अकबराच्या कारागृहवासात एक गुन्हेगार कैदी म्हणून खितपत पडावे लागले असते. लहरी आणि जुलमी अधिकाऱ्याकडून त्याना न्याय मिळण्याची आशा नव्हती. सूरीश्वर भ्याले असा जर कोणी त्याच्यावर आरोप ठेवील तर त्या थोर पुरुषाची किमत कमी करण्यासारखे आहे. असा त्यानीं काय गुन्हा केला होता की त्यानीं क्रूर कायद्याच्या कचाटींत सापडावे ? पुन्हा त्याची कारागृहकैद ही लहानसहान गोष्ट नव्हती. सबंद जैनसमाजाच्या इभ्रतीचा तो प्रश्न होता. आणि म्हणूनच कित्येक श्रावक त्याच्या मदतीला धावून आले.

इकडे सूरीश्वराना सुभेदारापासून उपद्रव होत असताना स्वतः बादशहा अकबर सूरीश्वराना पहाण्यास उत्सुक झाला होता.

४

चंपा अकबरास म्हणते– 'ज्याचे ध्यान करून आम्हास सिद्धि मिळते असे आमचे देव आहेत, तसेच आमचे गुरु सुसाधूंमध्ये श्रेष्ठ असे हीरविजयसूरि आहेत.'

दुपारचा समय होता. बादशहा अकबर आपल्या महालाच्या झरोख्यात बसला होता. त्या समयी राजमार्गावरून एक मोठी मिरवणूक वाजत गाजत चालली होती. मिरवणुकीच्या मध्यमार्गी एक पालखी दिसत होती. परिचारक चवऱ्या ढाळीत होते. मधून मधून 'जिन शासन की जय' असा

जयध्वनि ऐकूं येत होता. वाजत्रीच्या मधुर आवाजाकडे अकबराचे लक्ष वेधले गेले. तेव्हा त्याने आपल्या एकनिष्ठ सेवकाकडे पाहून म्हटले, 'टोडरमल्ल, आज ही शहरात काय धामधूम आहे?'

'जहापनाह, जैन लोकाची ही मिरवणूक आहे. चंपा नावाच्या एका श्राविकेने सहा महिन्याचा केलेला उपवास आज समाप्त होत आहे. आणि म्हणून चपाच्या सन्मानार्थ ही मिरवणूक काढली आहे.'

'सहा महिन्याचा उपवास? काय म्हणता टोडरमल्ल? हे दिव्य साहस करणारी स्त्री या मिरवणुकीत असेल तर तिला राजवाड्यामध्ये आणण्याची व्यवस्था ताबडतोब करा.'

बादशहाचा हुकूम! मिरवणूक तात्काळ थाबविण्यात आली. पालखीला राजवाड्याच्या प्रवेशद्वारानजीक नेण्यात आले. पाढरे वस्त्र परिधान केलेली व कडक उपवासामुळे कृश झालेली चपा पालखींतून हळूच खाली उतरली. दिवाणखान्यात प्रवेश केल्याबरोबर बादशहाने तिचे स्वागत केले आणि आपल्या समोरच्या आसनावर बसण्यास सागून तो म्हणाला, 'चपाबाई, आपण किती दिवसाचा उपवास केला?'

'खाविंद! मी सहा महिने अन्नग्रहण केले नाही. गरम करून थड केलेलें पाणी मात्र केव्हा केव्हा दिवसा घेत असे. अशा रीतीने केलेला उपवास आज मी सोडला आहे.'

'अशी उग्र तपचर्या कोणत्या दिव्य शक्तीच्या आधारे तूं करू शकलीस?''

'माझ्या उपवासाच्या पाठीमागे परम तीर्थंकर ऋषभदेव यात्रील अढळ श्रद्धा आणि गुरु हीरविजयसूरि याचा शुभाशीर्वाद होता.'

'हीरविजयसूरींचा मुक्काम हल्लीं कोठे आहे?'

'त्याचा मुक्काम हल्लीं गुजरातमधील गंधार बंदरामध्ये आहे.'

विचारात मग्न झालेल्या बादशहाने सोन्याच्या बागड्या चंपास अर्पण केल्या-नंतर मिरवणूक पुन्हा सुरू झाली. चपा गेली पण चंपामुळे निर्माण झालेले विचारतरंग मात्र बादशहाच्या मनातून कमी होईनात. दिवसा उपवास करून रात्री अन्नसेवन करण्याच्या उपवासाची पद्धत जाणणाऱ्या अकबराला सहा महिन्याचा उपवास हे एक मोठें गूढ वाटलें. हीरविजयसूरीबद्दल त्यास अत्यंत जिव्हाळा वाटू लागून त्याचे दर्शन घेण्यास तो अत्यंत उत्सुक

झाला. नामांकित धर्मपंडितांकडून त्यानें कित्येक वेळा धर्मरहस्ये जाणू घेण्याचा प्रयत्न केला होता. व कित्येक विद्वानाना आपल्या दरबारीं ठेवू त्याचा मानसन्मानही केला होता. पण अशा असाध्य व्रताची त्यास कोणी माहिती करून दिली नव्हती. सूरीश्वराची कीर्ति मात्र त्याने ऐकली होती धर्मसभेमध्ये, शास्त्रचर्चा करीत असतांना, 'माझ्या राज्यात सर्व दर्शना मध्ये असा कोणी महात्मा आहे कीं जो सदैव निष्पाप मार्गाची आराधन करीत असतो ? 'अशा त्याच्या प्रश्नाला उत्तर देताना एका सभासदाने हीर विजयसूरींचे नाव सुचविले होते. पुन्हा चंपाकडून हीरविजयसूरींची स्तुति ऐकली तेव्हा मात्र त्यास धीर निघेना. गुजरातशी परिचित असलेल्या इतिमादखानास आणि आपल्या दरबारीं असलेल्या थानसिंह* व मानुकल्याण या श्रावकाना त्यानें ताबडतोब भेटीस बोलाविले.

'इतिमादखान, गुजरातमध्ये हीरविजयसूरि नावाचे कोणी जैन साधु आहेत का ?'

'अहापनाह, त्या महात्म्याची थोरवी मी कोणत्या शब्दानीं वर्णन करूं ? ते एक सच्चे फकीर आहेत. गाडी, घोडा, एक्का इत्यादि वाहनाचा सुद्धा उपयोग करीत नाहींत. कंचन-कामिनीचे ते त्यागी आहेतच. अहोरात्र ईश्वराची सेवा करून लोकाना उपदेश देण्यात ते कालव्यय करतात.'

इतिमादखानाच्या भाषणाने बादशहा अधिक उत्कंठित झाला. इतक्यात थानसिह व मानुकल्याण येऊन पोहोचले.

'थानसिह, जैन धर्माची मुख्य तत्त्वे काय आहेत हे तूं सागूं शकशील काय ?' बादशहाने त्याच्याकडे दृष्टि रोखून विचारले.

'धर्माची तत्त्वे यःकश्चित् असा मी काय सागूं शकणार ? एखादा धर्म-गुरु त्याचे चागले विवेचन करील. मात्र आमच्या धर्मासबधीं थोडक्यात सागावयाचे झाल्यास 'अहिंसा परमो धर्मः' अर्थात् अहिंसा हाच खरा धर्म असे आम्ही मानतों.

* थानसिह हा सूरीश्वराचा शिष्य. यानें फत्तेपूरमध्यें मोठ्या उत्साहानें जिन-बिंबाची प्रतिष्ठा सूरीश्वरांच्या हातून केली होती. त्याच वेळीं शातिचद्रजींना उपा-ध्यायपद देण्यात आलें. या थानसिहानें आग्र्यास चिंतामणि पार्श्वनाथाचें मंदिर

'बरें, माझ्या डोक्यात एक नवीन कल्पना आली आहे. हीरविजयसूरींना भेटण्यासाठीं माझे मन फार उत्सुक झाले आहे. गुजरातच्या सुभेदारास ह्याबद्दल मी पत्र लिहितों आणि आपण हीरविजयसूरींना येथें येण्याबद्दल एक विनंतिपत्र लिहा.'

नंतर बादशहाचे पत्र घेऊन मौदी आणि कमाल नावाचे दोन दरबारी साडणीस्वार गुजरातकडे रवाना झाले. हत्ती, घोडे, पालखी याच्यासह मोठ्या थाटामाटात हीरविजयसूरींना पाठवा असा बादशहाचा हुकूम वाचल्याबरोबर शिहाबखान आश्चर्यचकित झाला. पाऊस न पाडण्या-संबंधीं सूरीश्वराना जो त्रास त्याने दिला होता त्याबद्दल त्यास लाज वाटूं लागली. ज्या फकिरास आपण पकडण्याची शिकस्त केली त्याच्यावर खुद्द बादशहाची इतकी मर्जी बसली हें पाहून त्यास नवल वाटले. शेवटीं गतं न शोच्यं या न्यायाने मागील प्रकरण विसरून जाऊन बादशहाचे फर्मान तडीस नेण्यासाठीं त्याने अमदाबादच्या जैन नागरिकाना एकत्र केले. बादशहाचा हुकूम वाचवून दाखविल्यानंतर त्याने एक भाषण केले. त्यात त्याने सागितले कीं, बादशहा स्वतः आमंत्रण देत आहे. तेव्हा आपण हीरविजयसूरींना जरूर फत्तेपूरशिक्रीस पाठवा. प्रवासामध्यें त्याना काहीं अडचण पडणार नाहीं याची खात्री असू द्या.

खानाच्या सरळ भाषणाने जैन पुढाऱ्याना भीति वाटली. त्यानी खानास सागितले की सूरीश्वर सध्या गंधार बंदरामध्ये आहेत. आम्ही त्याना भेटू आणि बादशहास भेटण्याची विनंति करूं.

५

खंबायत शहराजवळ आज जेथे काही पुरातन अवशेष आणि अरण्य आहे तेथे पूर्वी गंधार नावाचे सुंदर बेट होतें. सूरीश्वराना भेटण्याची जेव्हा बादशहास इच्छा झाली त्या वेळीं त्याचा मुक्काम या बेटामध्येच होता. तेथे दररोज सकाळीं धार्मिक विषयावर ते प्रवचन करीत. त्याची मधुर वाणी व अगाध ज्ञान यामुळे कित्येक स्त्रीपुरुष मुग्ध होऊन जात. गुजरातच्या सुभेदारास कबूल केल्याप्रमाणे सूरीश्वराना भेटण्यासाठीं अमदाबादचे एक महाजनमडळ एके दिवशी सकाळीं गंधार बंदरीं येऊन पोहोचले. देवपूजा केल्यानंतर

सूरीश्वराना वंदन करण्यासाठी ते उपाश्रयात गेले. उपाश्रय त्या वेळीं स्त्री-पुरुषानीं गच्च भरले होते. श्रोतृवर्ग आचार्यांचे प्रवचन ऐकण्यात इतका गुंग होऊन गेला होता कीं पाहुण्याचे आगमन झालेले त्यास कळूनसुद्धा आले नाही. सूरीश्वरानीं मात्र त्यास वदन करताना पाहिले होते. व्याख्यान संपले. अमदाबादच्या मडळीकडे पाहताच सघपतीने त्याचे स्वागत केले. नतर सर्व मंडळी आचार्य महाराजाकडे गेली. अमदाबादच्या नगरशेटने सूरीश्वराना भेटण्याची बादशहाची इच्छा आणि गुजरातच्या सुभेदारास आलेला हुकूम वगैरे माहिती सूरीश्वराना करून दिली.

जमलेल्या मडळींत निरनिराळे तर्कवितर्क सुरू झाले. उलटसुलट विचार माडण्यात येऊं लागले. एक गृहस्थ उठला व म्हणाला, 'बधूंनो, सूरीश्वराना सम्राट्कडून भेटीचे आमत्रण आले आहे हे खरे पण आचार्य-श्रीनीं स्वतः जावे हे योग्य दिसत नाहीं. बादशहास धर्म ऐकण्याची गरज असेल तर तो स्वय सूरीश्वराकडे येईल.'

त्याचे भाषण संपण्याचे अगोदरच 'बरोबर बरोबर' असे एकजण पुटपुटला.

काहींचे म्हणणे पडले कीं बादशहा म्लेच्छ आहे, दुष्ट आहे, म्हणून सूरीश्वरानी न गेलेले बरे आणि येथे सुद्धा न राहता दीव बेटात गुप्तपणे राहावे. अनेक स्त्रियाच्या गराड्यात सापडलेल्या बादशहास सूरीश्वराशी धर्मचर्चा करण्यास सवड सापडणार नाही म्हणून आचार्यश्रींनीं जाण्याचे टाळावे असे एक जणाने आपले मत ठोकले! पण एक समजस श्रावक म्हणाला, 'आपण आपले विचार माडीत आहात पण आचार्यश्रींचे या बाबतींत काय म्हणणे पडते हे पाहाणें योग्य होईल.'

सर्वांचें म्हणणे शातपणाने ऐकून घेतल्यानतर सूरीश्वर म्हणाले, 'देवानुप्रिय हो, आपण जर जैन साधूची परपरा पाहाल तर आपणास आढळून येईल की जैनशासनाच्या सेवेसाठीं मानापमान सहन करून त्यानीं अनेक राजाना सन्मार्ग दाखविला आहे. आर्य महागिरीनें राजा संप्रतीला, बप्पभट्ट-सूरींनी आमराजाला, सिद्धसेन दिवाकरानीं विक्रमादित्याला व कलिकाल-सर्वज्ञ हेमचद्राचार्यानीं राजा कुमारपालास उपदेश केला आहे. या थोर साधूंचा कित्ता गिरविणे माझे कर्तव्य आहे. महावीर स्वामींच्या सिद्धान्ताचा

घरोघरी प्रचार झाला पाहिजे अशी माझी इच्छा आहे. 'सवि जीव करू शासनरसी' या भावनेचा मूळ उद्देश समजला पाहिजे. खुद्द बादशहानें आमंत्रण दिले आहे तेव्हा मानापमानाचा प्रश्न उद्भवत नाही. हजारो लोकांना उपदेश करण्याने जे कार्य होते ते एकट्या राजास उपदेश करून होण्यासारखे आहे. पुन्हा अकबर अविचारी, स्वच्छंदी आणि दुष्ट आहे असे मला वाटत नाहीं. तो मोठा धर्मजिज्ञासू आहे असे मी ऐकतो. त्यास जैन तत्त्वज्ञानाची ओळख करून देऊन त्याच्यामार्फत काही लोकोपयोगी धार्मिक कार्यें करवून घ्यावी अशी माझी उत्कट इच्छा आहे. तिकडे विहार करण्याचे ठरले म्हणजे बऱ्याच धर्मतीर्थांचे दर्शन मला आपोआप घडेल.'

सूरीश्वराच्या व्याख्यानाने यक्षिणीच्या कांडीप्रमाणे चमत्कार घडवून आणला. सूरीश्वर-सम्राट्भेटीबद्दल आता मंडळी उत्सुक झाली. सर्वांची संमति मिळताच सूरीश्वरांनीं अमदाबादकडे विहार करण्याचे ठरविले. सूरीश्वरांनीं जेव्हा गंधार बंदर सोडले त्या वेळचा प्रसंग फार गंभीर होता. श्रावक-श्राविकांच्या डोळ्यांतून सूरीश्वराच्या विहारामुळे अश्रु वाहूं लागले. अमदाबादमध्ये सूरीश्वराचे भव्य स्वागत करण्यात आले. या स्वागत-समारंभात खुद्द सुभेदाराने भाग घेतला होता. त्याने मागील प्रसंगाबद्दल सूरिजींची माफी मागितली व बादशहा अकबराकडे जाण्याची विनंति केली. नंतर हिरे, माणिक इत्यादि वस्तु बादशहाचे आज्ञेप्रमाणे नजराणा म्हणून पुढे ठेविल्या व हत्ती, घोडा, गाडी, पालखी इत्यादिकांचा प्रवासासाठीं उपयोग करण्याबद्दल विनंति केली. सूरीश्वरांनीं नजराणा आणि हीं प्रवासाचीं साधने यांचा अव्हेर केला व बादशहाचे भेटीसाठी ते नेहमीप्रमाणे पायीं निघाले.

अमदाबाद ते उसमानपूर, सोहला, हाजीपूर, बोरीसाणा, कडी, वीस-नगर, मेहसाणा वगैरे गावांवरून ते पाटणाला आले. पाटणहून वडली येथे गेले. तेथे त्यांनीं आपले गुरु विजयदानसूरि यांच्या स्तूपास (पादुकास) वंदन केले. वडली सिद्धपूरहून ते पुढे आबू पर्वतावर यात्रेस आले. आबूहून सिरोहीला आले. सिरोहीचा सुरत्राण याने सूरिजींचा सत्कार केला व मदिरापान, शिकार, मांसाहार व परस्त्रीसेवन या गोष्टी न करण्याची प्रतिज्ञा केली. तेथून ते सादडीवरून राणकपूरला यात्रेस गेले. तेथून ते मेडते येथे

आले. मेडत्याचा सुलतान साहीम यांनें त्याचा आदरसत्कार केला. मेडत्याहून फलोधी येथें ते यात्रेस गेले. व तेथून परत मेडत्यास येऊन सागानेरहून फत्तेपूरशिक्रीस आले.

गुजरात, जोधपूर व जयपूर राज्यातून प्रवास करीत असताना त्यांनीं ठिकठिकाणीं उपदेशामृत पाजलें व आबू, राणकपूर व फलोधी या तीन यात्रा केल्या.

ते सागानेर येथे असताना त्याचे शिष्य विमलहर्ष उपाध्याय, सिंह विमलपन्यास, धर्मसीऋषी व गुणसागर यानीं पुढे जाऊन अगोदर बादशहाची मुलाखत अबुलफाजलच्या मध्यस्थीने घेतली. भेट घेण्याचा उद्देश बादशहाच्या स्वभावाचें निरीक्षण करण्याचा होता.

या भेटीमध्ये विमलहर्ष उपाध्यायानीं बादशहावर उत्तम प्रभाव पाडला. अकबरास वाटले ज्याचा शिष्य इतका विद्वान् आहे तो स्वतः किती विद्वान् साधुश्रेष्ठ असेल !

६

कित्येक दिवसांपासून चातकासारखी वाट पहात बसलेल्या फत्तेपूरशिक्रीमधील जैन श्रावक-श्राविकाना हरिविजयसूरींचें आगमन हा मोठा हर्षाचा व समाधानाचा विषय होऊन बसला होता. फत्तेपूरशिक्रीमध्ये सूरीश्वराना वाजत गाजत तेथील श्रावक मडळी आणीत असताना सूरीश्वराच्या मुखावर देखील समाधानाच्या छटा दिसूं लागल्या. कारण गंधारपासून शिक्रीपर्यंतचा लाबच्या टापूचा प्रवास दीड वर्षाने सूरीश्वर आणि त्याच्या शिष्यानीं सुखरूपपणे सपविला होता. साधूप्रमाणे कित्येक श्रावकाच्या मनात सूरीश्वर-सम्राट्भेटीबद्दल किंचित् भीतियुक्त उत्कंठा वसत होती. कारण असे कीं सूरीश्वराच्या चार उपदेशाच्या गोष्टी जर बादशहास रुचल्या तर त्यायोगे जैन धर्माचा केशरी झेंडा मानाने साम्राज्यात फडकत राहील. आणि हे रम्य दृश्य पहाण्यास सर्व उत्कंठित झाले होते. पण त्याबरोबरच थोडी भीतीही त्याच्या मनास शिवत होती. कारण अकबराकडून सूरीश्वराचा मानमरातब ठेवण्यात आला नाहीं तर तो अखिल जैनसमाजाचा अपमान होईल असे त्याना वाटत होतें. पण अशुभ घडण्याचा संभव कमी होता. अकबर

ाप्यार, िं
न अगोद
ड घेण्याचा

पाडला.
किती

भिक्री-
र्पाचा
राना
ावर
क्री-
च्या
नात
असे
ायोगें
इ रम्य
ीतीही
मगतव
होईल
अकबर

बादशहानें सूरीश्वराना सामोरें जाऊन त्याचें स्वागत केले. (पृ.४५)

[देवचंद लालभाई पुस्तक भांडार, सुरत, यांचे कृपेनें.

सूरीश्वराच्या पहिल्या भेटींतच आकर्षिला गेला.

तो संवत् १६३९ ज्येष्ठ वद्य १३ चा शुभ दिवस होता आणि सूरीश्वर धरून एकूण तेरा साधु होते. त्याच्यापैकी कोणी सिद्धान्तशिरोमणि, कोणी शतावधानी, कोणी कवि, कोणी पंडित होते. श्वेतवस्त्र परिधान करून जमिनीवर नजर टाकीत ते राजवाड्याकडे जात होते. त्याच्या तोंडावर अहिंसा, संयम व तपाचे चंद्रासारखे शांत तेज चमकत होते. राजवाड्याजवळ ते येतांच बादशहाचे लक्ष्य त्याच्याकडे गेले. तो तात्काळ उठला. त्याच्या मागोमाग बादशहाचे सेलीमादि पुत्र आणि थानसिंह वगैरे दरबारी मंडळी राजवाड्याबाहेर आली. नंतर बादशहाने सूरीश्वराच्या सामोरे जाऊन त्याचे स्वागत केले राजवाड्याच्या आवारात ही सर्व मंडळी उभी असता सूरीश्वर-सम्राटामध्ये खालील भाषण झाले:—

अकबर — माझ्यासारख्या परधर्मीय मनुष्यावर उपकार करण्याच्या हेतूने जे आपण श्रम घेतले त्याबद्दल मी आपली माफी मागतो.

सूरीश्वर— राजन्, कसली क्षमा मागता ? धर्माचा उपदेश करणे हे आमचे कर्तव्य आहे. ते करीत असताना आम्हास ठिकठिकाणीं हिंडावे लागते. आणि प्रवासात थोडा त्रास हा होणारच.

अकबर— आपण इतक्या लांबचा प्रवास का पायीं केला ? काय माझ्या गुजरातच्या सुभेदाराने आपणाकरिता गाडी, घोडे, पालखी वगैरेची व्यवस्था केली नाहीं !

सूरीश्वर— राजन्, आपल्या सुभेदाराने तशी सर्व व्यवस्था केली होती. पण आम्हीं सर्व प्रवास पायींच केला पाहिजे अशी आम्हास शास्त्राज्ञा आहे. ज्या दिवशीं आम्ही फकिरी पत्करली त्या दिवसापासून आम्ही कोणत्याही गोष्टींचा संग्रह करीत नाहीं आणि कोणतेही वाहन वापरीत नाही.

हे ऐकून अकबरास किंचित् आश्चर्य वाटले. पण थानसिंहाकडे दृष्टिक्षेप करून तो म्हणाला, 'थानसिंह, मला जर ह्या साधुजीवनाची पूर्वींच कल्पना असती तर मी सुरीश्वराना भेटीचे आमंत्रणच धाडले नसते. पण कां रे, तूं तर मला सांगायचे ना ?'

थानसिंहानें बादशहाकडे पाहिलें. बादशहास काय उत्तर द्यावे या विचारात तो होता. इतक्यात अकबर म्हणाला, 'ठीक आहे. समजला

तुझा कावा. तुझा मतलब साधण्यासाठी तूं मला अज्ञानात ठेवलेस अं ? सूरीश्वराचे ह्या भागामध्ये कधी आगमन झाले नव्हते तेव्हा त्याच्या दर्शनासाठी तू मला विरोध केला नाहीस. किती झाले तरी तू बनिया ना !'

बादशहाच्या ह्या विनोदाने मुनिमडळ व इतर मडळी खुप झाली.

नंतर सुरीश्वराकडे दृष्टिक्षेप करून बादशहा म्हणाला, 'आपण सध्या कोठे वास्तव्य केले आहे ?

'आम्ही सर्वजण जगन्माल कच्छवाहाच्या महालामध्ये तूर्त राहात आहोत.' सूरीश्वरानी उत्तर दिले.

वेळ बराच झाल्यामुळे आणि सूरीश्वराना जास्त वेळ खोळबून ठेवू नये म्हणून बादशहा थानसिहास म्हणाला, 'थानसिहा, आचार्य महाराजाची राहाण्याची व्यवस्था शहरात प्रशस्त ठिकाणी करा आणि उद्या त्याना मोठ्या थाटामाटात चित्रशाळेत घेऊन या. तेथे उद्या सूरीश्वराचे प्रवचन व्हावे अशी माझी इच्छा आहे.'

पण स्वतःची खास व्यवस्था व्हावी असे सूरीश्वराना वाटत नव्हते. पुन्हा फत्तेपूरशिक्रीत उपाश्रय असल्यामुळे आपण दुसरीकडे राहू शकत नाही असे मोठ्या प्रेमळ शब्दात बादशहास सागितल्यानतर त्यानी स्वस्थळी प्रयाण केले.

७

'राजन्, ह्या गालीच्यावर पाय ठेवून आम्हास चित्रशाळेत प्रवेश करता येत नाही.' सूरीश्वराचे निश्चयाचे बोल ऐकून बादशहा किंचित् विचारात पडला. पण प्रसगाची कल्पना करून तो म्हणाला, 'आपण दिवाणखान्यात प्रवेश करण्याचे का टाळीत आहात ? गालीचा स्वच्छ आहे आणि त्यावर काही जीवजतु असल्याचे देखील दिसत नाही. तेव्हा त्यावरून जाण्यास हरकत ती कोणती ?'

गभीर मुद्रा करून सूरीश्वर म्हणाले, 'आम्हा जैनाना सर्व प्राणी सारखे आहेत. बुद्धिवान् असे जे मानव त्याना जितका ह्या जगात राहण्याचा अधिकार आहे तितकाच जीवजतूनाहि आहे. आणि म्हणून आमच्या ह्यातून मुग्या, किडे इत्यादि बारीक प्राण्याचा घात होऊ नये याबद्दल शक्य

र्ती काळजी आम्ही घेतो. आपण म्हणता त्याप्रमाणे गालिचावर जीवजंतु नसतील पण हे बारीक जीव गालिच्याखाली वावरत नसतील हे कशा-वरून ? आणि मी जे हे सागत आहे ते फक्त आम्हा जैनानाच लागू आहे असे नाही. मनुस्मृतीमध्ये म्हटले आहे—दृष्टिपूतं न्यसेत् पाद वस्त्रपूतं पिबेज्जलम् । सत्यपूत वदेद्वाक्यं मनःपूतं समाचरेत् ॥

कोणत्याही विज्ञानशास्त्रामध्ये एखादा नवीन शोध लागला म्हणजे जसे आश्चर्य वाटते तसे अहिंसेसंबधी इतका खोल विचार केलेला पाहून अक-बराला नवल वाटले. त्याने नोकराना गालीचा दूर करण्याबद्दल नेत्रसकेत केला. तात्काळ मुग्याची राग बादशहास जमिनीवर दिसली. तो चकित झाला. बारीक वस्त्राने मुग्याना दूर केल्यानतर सूरीश्वरानी चित्रशाळेत प्रवेश केला. ह्या एकाच प्रसगाने बादशहाची सूरीश्वरावर श्रद्धा बसली.

ज्याच्या साम्राज्याने भारतातील अर्ध्या भागापेक्षा अधिक प्रदेश व्याप्त केला आहे त्याच्या चित्रशाळेचे जितके वर्णन करावे तितके थोडे आहे. आज सूरीश्वराचे प्रवचन होणार म्हणून ती चित्रशाळा सजविण्यात आली होती. सूरीश्वरासाठी एक व्यासपीठ आणि त्याच्या शिष्यवर्गासाठी एका भव्य बैठकीची व्यवस्था करण्यात आली होती. ह्या चित्रशाळेमध्ये प्रवेश केल्यानंतर सूरीश्वर, बादशहा आणि इतर मडळी आपापल्या जागी विराज-मान झाली.

आपल्या प्रास्ताविक भाषणात बादशहा म्हणाला, 'माझ्या प्रजेचे मी दोन विभाग करतो—एक हिंदु प्रजा आणि दुसरी मुसलमान प्रजा. या दोन्ही प्रजाना मी माझ्या दोन नेत्राप्रमाणे मानतो. दोन्ही प्रजा आनदात, सुखासमाधानात राहाव्या अशी माझी उत्कट इच्छा आहे. मी जरी जन्माने मुसलमान असलो तरी माझी प्रवृत्ति प्रजेमध्ये भेदभाव कर-ण्याची नाही. माझी धर्मावर श्रद्धा आहे. निरनिराळ्या धर्मगुरूंची प्रवचने ऐकण्याची मला आवड आहे. पूज्य सूरीश्वराचे स्तुतिगान मी दीड वर्षा-पूर्वी ऐकले होते. नतर मी त्याना येथे येण्याचे आमत्रण दिले. त्यांनी ते स्वीकारले. आणि अनेक कष्ट सहन करून ते गुजरातहून येथे पायी

* दृष्टीने पवित्र झालेल्या जमिनीवर पाय ठेवा, वस्त्रगाळ करून पाणी प्या, सत्य कथन करा आणि पवित्र आचरण ठेवा.

आले आहेत. कोणत्या शब्दात मी त्याचे आभार मानूं हे मला कळत नाहीं.'

नंतर सूरीश्वरानीं प्रवचनास सुरवात केली. ते म्हणाले— 'नामवर बादशहा, हिंदु-मुसलमान प्रजेबद्दल आपली समानता पाहून माझे अंतःकरण उचंबळून येत आहे. पूर्वपुण्याईमुळे आपणास मिळालेल्या या राजपदाचा आपण जनताजनार्दनाची सेवा करण्यात उपयोग करता हें प्रशंसनीय आहे. आपली धर्मजिज्ञासु वृत्ति व सहिष्णुता या दोन गुणामुळेंच मी येथपर्यंत आलो आहे.

'ज्या नियमावर समाजाची धारणा झाली आहे तो धर्म. पाण्याशिवाय मासा जगू शकत नाहीं तद्वत् धर्माशिवाय आत्मा पवित्र होऊं शकत नाही. हे स्थूल शरीर नश्वर असल्याकारणाने त्याबद्दल चिंता करण्याची जरूरी नाही. आत्मशुद्धि व धर्म याचा असा निकटचा संबंध असल्यामुळे धर्म म्हणजे काय हे पाहू.

'आमच्या शास्त्रात म्हटले आहे— अन्तःकरणशुद्धित्व धर्मत्वम् । धम्मो मगल मुक्कट्ठ अहिसा सजमो तवो । अर्थात् धर्म म्हणजे अहिसा, सयम आणि तप. दुसऱ्या शब्दात सागावयाचे झाल्यास प्राणिमात्रावर दया करणे, पवित्र जीवन ठेवणे आणि पूर्वकर्मांचा नाश करण्यासाठीं तपश्चर्या करणे. आमच्या धर्मामध्ये जे सागितले आहे तेच काही प्रमाणात कुराणशरिफमध्ये लिहिले आहे. धर्मांच्या तत्त्वासबंधी मतभेद कोठेच नाहीं. मग धर्मांच्या नावाखालीं रक्तसिंचन का?

'देवासंबंधी मात्र आमच्या कल्पना निराळ्या आहेत. सृष्टि कोणी एका ईश्वराने निर्माण केली असे आम्ही मानत नाहीं. पृथ्वीला जन्म नाहीं आणि लयहि नाहीं. सृष्टीचा निर्माता ईश्वर नसला तरी युगप्रवर्तक महात्मे वेळोवेळी जन्म घेतातच. त्याना आम्ही तीर्थंकर म्हणतो. या तीर्थंकरानीं सर्व पापे धुवून काढल्यामुळे ते मुक्त झाले आहेत, अर्थात् शाश्वत सुखाचे मालक झाले आहेत, म्हणजे जन्ममरणादींच्या फेऱ्यातून त्याची कायमची सुटका झाली आहे. प्रत्येक मानव असा मुक्त होऊं शकतो; नव्हे केव्हा तरी तो झालाच पाहिजे. जो धर्माप्रमाणे वागतो तो लवकर मुक्त होतो. जे मुक्त झाले नाहींत ते देव, मनुष्य, तिर्यंच व नारकी यापैकीं कोणत्या तरी योनीमध्ये फिरून अनेक कष्ट सहन करतात.'

कधीं ऐकण्यास न मिळालेले असे देवाचे सत्यस्वरूप ऐकण्यास मिळाल्यानंतर बादशहा सूरीश्वराना म्हणाला,

'गुरूची व्याख्या आपण कशी करता ?'

'परमार्थकल्याण हे ज्यानीं आपलें जीवनध्येय ठरविले आहे ते धर्मगुरु होत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या पाच महाव्रताचे ते पालन करतील. जरूरीपुरत्या अन्नवस्त्राचा स्वीकार करून धर्माचा उपदेश करण्यात सर्व जीवन वेचतील.'

देव, गुरु आणि धर्म याचे सुदर विवेचन केल्यानंतर सूरीश्वरानी आपले प्रवचन संपविले. सूरीश्वराच्या विद्वत्तेबद्दल आता बादशहाची पूर्ण खात्री झाली.

नतर त्याने सूरीश्वरास स्वतःची जन्मकुडली दाखवून काही ज्योतिषविषयक प्रश्न विचारले. सूरीश्वरानीं तात्काळ आपण ज्योतिषी नसल्याचे सागून धर्मबोध देण्याशिवाय कोणतेहि कार्य आपल्या कक्षेत येऊ शकत नाही असा जबाब दिला.

भेट म्हणून काही मौल्यवान् जिनसा सूरीश्वराना देण्याचा बादशहाचा विचार होता. पण सूरीश्वराच्या वर्तनावरून ते शक्य होईल असे न वाटल्यामुळे त्याने आपल्याजवळ असलेला ग्रथसंग्रह स्वतःपाशीं मागवून घेतल्यानंतर तो सूरीश्वराना म्हणाला, 'महाराज, आपल्या उपदेशामुळे मला फार आनद झाला आहे. आपण करीत असलेल्या उपकाराची फेड कशी करावी हे मला समजत नाही. आपण ज्ञानी आहात. तेव्हा हा ग्रंथसग्रह मी आपणास अर्पण करीत आहे. पद्मसागर नावाच्या एका यतीकडून तो मला मिळालेला आहे.

प्रचंड ग्रंथसंग्रह आणि त्यात जैनसाहित्य पाहून सूरीश्वराना आश्चर्य वाटले, पण बादशहाच्या विनतीस मान देणे शक्य नसल्यामुळे ते म्हणाले, 'राजन् आम्ही कोणत्याही गोष्टीचा संग्रह करीत नाहीं. जरूरीपुरते ग्रथ आम्ही आमच्याजवळ ठेवतो. हा ग्रंथसंग्रह आपणापाशींच राहू द्या. माझे येथे (फत्तेपूरशिक्री) वास्तव्य असेपर्यंत मी त्याचा अवश्य उपयोग करीन.'

सूरीश्वराच्या उत्तरानें बादशहास संतोष झाला नाहीं. त्या वेळीं चित्रशाळेमध्ये अब्बुल फजल हजर होता. मध्यस्थी करण्याच्या हेतुने तो

म्हणाला, 'सूरीमहाराज, हा ग्रंथसंग्रह निव्वळ पडून राहिला तर काय उपयोग ? आपल्यासारख्याच्याजवळ तो असला म्हणजे पुष्कळाना तो लाभदायक होईल. पुन्हा बादशहास त्यामुळे सतोष होईल.'

शेवटीं सूरीश्वरानी तो ग्रंथसग्रह आग्र्यास बादशहाच्या नावाने उघडला आणि त्याची थानसिंहावर व्यवस्था ठेवण्याची कामगिरी सोपविली. सूरीश्वराच्या या निःस्वार्थीपणामुळे त्याची प्रशसा सर्वजण करूं लागले.

सूरीश्वरांनीं अनेक प्रवचने करून अकबरास अहिंसक बनविले होते. एके वेळीं बादशहा सूरीश्वराना म्हणाला, 'महाराज, कित्येक लोक म्हणतात, हस्तिना ताड्यमानोऽपि न गच्छेत् जिनमदिरम्— हत्तीकडून मरण आले तरी हरकत नाही पण जैनमंदिरामध्ये कधीं प्रवेश करू नये. याचे कारण काय ?'

या प्रश्नास उत्तर देताना सूरीश्वर म्हणाले, 'राजन्, प्रत्येक मनुष्यास आपला धर्म श्रेष्ठ आहे असे वाटते. शुद्ध दृष्टीने परधर्माकडे पाहाण्याची वृत्ति सहसा माणसात आढळून येत नाहीं. याचा परिणाम वैरभाव व क ह यामध्ये होतो. यामुळेच हिंदूंनी जैनाना नास्तिक म्हटले, मुसलमानांनी हिंदूना काफीर सबोधिले व हिंदूनी मुसलमानाना म्लेच्छ म्हणून च्छ लेखिले.'

सूरीश्वराची ही तटस्थता, हृदयाची विशालता व मी म्हणतो तेच खरे यापेक्षा 'सत्य तेच माझे' ही वृत्ति पाहून अकबराने सूरीश्वराच्या चरणकमलावर डोके ठेवले असेल यात आश्चर्य ते काय ? आपल्या कडक आचरणाने, गाढ विद्वत्तेने, स्पष्टवक्तेपणाने आणि विशाल हृदयाने सूरीश्वरानी अकबरास आकर्षून टाकले होते. अकबरास आपल्या बाजूला अनुकूल करून अहिंसातत्त्वाला शोभणारीं अशी अनेक सत्कृत्ये त्यानी त्याच्याकडून करवून घेतली.

सूरीश्वर चार वर्षे शिक्रीत राहिले असतील. या चार वर्षांमध्ये त्यानी अकबरास जैनधर्मरूपी भव्य प्रासादाचे मनोहर स्वरूप दाखविले. या प्रासादातील सुंदर सुदर दालने पाहिल्यानतर अकबराने सूरीश्वराच्या व त्यांच्यामागून त्याच्या शिष्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानून त्याची अम्मलबजावणी केली आहे. अकबराने केलेली ही जीवदयेची व लोकोपयोगी कृत्ये जैनाच्या अहिंसातत्त्वाला पोषक असल्यामुळे अकबरानें जैनधर्माची मोठी

सेवा केली आहे. नुसती सेवा करून तो थाबला नाही. शेवटी शेवटी जैन धर्माचा त्याच्यावर इतका पगडा बसला की तो जैनधर्मी आहे असे पिनहरो नावाच्या एका पोर्तुगीज पाद्रीने आपल्या पत्रात* नमूद केले आहे. पांचशे पाचशे चिमण्याच्या जीभा कापून स्वतःच्या जिभेचे चोचले पुरविणारा; हरीण, ससे इत्यादि निरुपद्रवी जीवाची शिकार करणारा; चितोडचा किल्ला सर करताना स्त्री, पुरुष, हत्ती एवढेच काय पण कुत्र्याचा देखील प्राण घेण्याचा आपल्या शिपायाना हुकूम सोडणारा हा सम्राट् सूरीश्वराच्या सान्निध्यात आल्यानतर मासाहाराबद्दल§ तीव्र नापसंती, शिकारीब्रद्दल उदासीनता

---

* अकबराच्या जैनत्वाबद्दल काही उल्लेख.——

(अ) पोर्तुगीज पाद्री पिनहरो यानीं लाहोर येथून ता ३।९।१५९५रोजी आपल्या देशामध्यें जें पत्र पाठविलें त्यात ते म्हणतातः-—

'राजा अकबर ईश्वर व सूर्य याचा उपासक आहे तो हिंदु असून व्रतिसंप्रदायाचा (जैन धर्माचा) अनुयायी आहे. व्रतिसप्रदायचे लोक मठवासी ऋषींप्रमाणें जनतेमध्यें वस्ती करून उग्र तपश्चर्या करतात. ते कोणतीही सजीव वस्तु खात नाहीत आणि जमिनीवर बसण्यापूर्वी ओघ्यानें जागा साफ करतात. हेतु हा कीं त्याच्या बसण्यामुळें जमिनीवर असलेल्या जीवजंतूंचा नाश होऊ नये....'

(ब) सुप्रसिद्ध इतिहासकार डॉ स्मिथ आपल्या अकबर या पुस्तकात म्हणतातः—

'..परतु जैन साधूनीं निःसशय अनेक वर्षेपर्यंत अकबरास उपदेश केला त्याचा उत्तम प्रभाव बादशहाच्या जीवनावर पडला. या जैन साधूनी आपले सिद्धान्त इतक्या प्रमाणात बादशहाकडून मान्य करवून घेतले कीं तो जैनधर्मी झाला अशी लोकाची समजूत झाली.
''

§ मासाहाराबद्दल अकबराची तीव्र नापसंती दाखविणारे पुरावे:—

(अ) डॉ स्मिथ- 'मासाहाराची बादशहाची बिलकुल आवड नव्हती. जीवनाच्या शेवटच्या काळात तो जैन साधूच्या समागमात आला आणि तेव्हापासून मासाहारी भोजन करण्याचें त्यानें सोडून दिलें.

(ब) 'ऐने अकबरी'च्या पहिल्या भागात अब्बुल फजल म्हणतो- बादशहास मांसाबद्दल कमी आवड आहे आणि पुष्कळ वेळा त्याबद्दल त्यानें स्वतःचे मत जाहीर केले आहे : 'निरनिराळ्या प्रकारचे खाद्यपदार्थ मिळत असतांना देखील जिवत प्राण्यांना

व्यक्त करतो,* सहा सहा महिनेपावेतो स्वतः मास खाण्याचे वर्ज्य करतो आणि सबद राज्यातून कित्येक महिने पशुहिंसा बंद करण्याचे हुकूम सोडतो याचा अर्थ काय ?

दुःख देण्यास लोक मागेंपुढें पाहत नाहींत. आणि त्याची कत्तल करून भक्षण करण्यास उत्सुकता दाखवितात. यास लोकाची अज्ञानता व निर्दयता हीच कारणीभूत आहेत. कोणताही मनुष्य निर्दयतेचा प्रतिबंध करण्यात जो एक नैसर्गिक सुंदरता आहे ती पारखू शकत नाहीं आणि स्वतः कित्येक प्राण्याचें कबरस्थान बनतो (म्ह. पशूंची हत्या मास खाण्यासाठीं करतो.) जर बादशहाच्या अंगावर राज्यकारभाराची जोखीम नसती तर तो सदैव मासाहारापासून अलिप्त राहिला असता.'

(क) अकबर नेहमीं सांगत असे की मासाहारी लोक माझ्या शरिरावर संतुष्ट होऊन दुसऱ्या जीवाच्या भक्षणापासून दूर राहते तर किती चांगलें झालें असतें ! याकरिता माझें शरीर अवाढव्य झालें असतें तरी मी सुखी झालों असतों. अथवा माझ्या शरीराचा एक भाग कापून मासाहारींना संतुष्ट केल्यानंतर कापलेला भाग मला पुन्हा मिळण्याची एखादी योजना निघाली असती तरी मी प्रसन्न झालों असतों. मी माझ्या शरीरद्वारा मासाहारींना तृप्त केलें असतें.

(ड) डॉ. स्मिथ– 'लोकांना मास खाण्याची इतकी सवय पडली आहे कीं जर त्यांना दुःख झालें नसतें तर त्यानीं स्वतःच्या शरीरास खाऊन टाकलें असतें हें निःसंशय.'

लहानपणीं माझ्याकरिता मासभोजन तयार करण्याचा जेंव्हा मी हुकूम करीत असे तेंव्हा तें भोजन मला नीरस लागत असे. आणि म्हणून त्या आहाराकडे मी दुर्लक्ष करी. ह्या वृत्तीमुळेच पशुरक्षणाच्या आवश्यकतेकडे माझी दृष्टि गेली आणि मासभोजनापासून मी दूर राहिलों.

माझ्या राज्याभिषेकाच्या वाढदिवशीं प्रतिवर्षीं ईश्वराचे आभार मानण्यासाठीं कोणींही मास खाऊ नये. त्यामुळें सबंद वर्ष भरभराटींत जाईल.

कसाई, कोळी आणि ज्याचा धंदा निव्वळ हिंसा करण्याचा आहे त्याच्यासाठीं राहण्याचीं ठिकाणें निराळीं असलीं पाहिजेत आणि दुसऱ्याच्या सहवासात ते जर आले तर दंड करण्याची योजना अमलात आणली पाहिजे.

*राज्याच्या नियमाप्रमाणें शिकार खेळणें वाईट नाहीं. तथापि प्रथम जीवरक्षा करण्याची आवश्यकता आहे.

८

श्रीकृष्ण आणि श्रीनेमीनाथ हे दोन बंधु होते. एक कर्मवीर तर दुसरे धर्मवीर. हिंदूना जसे श्रीकृष्ण तसे जैनाना श्रीनेमीनाथ. श्रीनेमीनाथ आणि राजिमती ही जोडी अजरामर झालेली आहे. शौरीपूर हे श्रीनेमीनाथाचे जन्मस्थान. आग्र्याच्या चातुर्मासानंतर सूरीश्वर शौरीपुरास गेले. ह्या पवित्र भूमीमध्ये प्रवेश करताना सूरीश्वराना अत्यानंद झाला. त्या नगरात असताना श्रीनेमीनाथाचा हजारो वर्षांपूर्वीचा इतिहास सूरीश्वराच्या डोळ्यापुढे ताजा झाला. ते शौरीपुरास आणि आग्र्यास निरानिराळ्या मंदिराची प्रतिष्ठा करण्यात गुंग झाले.

पण इकडे सूरीश्वराशिवाय अब्बुल फजलला चैन पडेना. सूरीश्वर-सम्राट्-भेटीच्या अगोदर फजल आणि सूरीश्वर याची ओळख झाली होती. आणि या ओळखीचे मैत्रींत रूपान्तर झाले होते. फजल मंत्री होता. सूरीश्वर साधु होते. पण दोन्ही विद्वान् होते. आणि म्हणूनच त्याचीं मैत्री शेवट-पर्यंत टिकली.

अब्बुल फजलच्या आमंत्रणामुळे सूरीश्वर जेव्हा परत फत्तेपूरशिक्रीस आले तेव्हा फजल त्याना आपल्या निवासस्थानीं घेऊन गेला.

योगायोग असा कीं ह्याच वेळी बादशहा फजलकडे आला होता. सूरीश्वराना तेथे पाहिल्याने तो फार खूप झाला पण सूरीश्वर केव्हा फत्तेपूर-शिक्रीस परत आले हे त्यास माहीत नसल्यामुळे तो अब्बुल फजलला म्हणाला, ‘फजल, सूरीश्वराचा मुक्काम येथे असताना आपण मला तसे का कळविले नाहीं ?’

‘जहापनाह, सूरीश्वराचे आजच आग्र्याहून आगमन झाले आहे. आणि ही खबर मी स्वतः आपणास कळविणार होतो पण त्याच्याशी झालेल्या वादविवादात वेळ केव्हा निघून गेला हे कळले सुद्धा नाहीं. त्याबद्दल मला दुःख होते.’

‘तुला दुःखी होण्याचे कारण काय ? सूरीश्वराचे प्रवचन ऐकावे, त्याच्याबरोबर काहीं धर्मचर्चा करावी असे मला नेहमी वाटतें. आणि ते देखील मोठ्या उदार मनाने माझ्या मनाची ही भूक शमवीत असतात. त्याचे ऋण मी केव्हा फेडीन असे मला होऊन गेले आहे. कित्येक दिवसा-

पासून मला वाटते कीं अश्व, हत्ती आणि काहीं जडजवाहीर देऊन त्याचा सन्मान करावा. पण ते शक्य होईल का?'

बादशहाचे विचार ऐकून सूरीश्वर गहिवरून म्हणाले, 'राजन्, हा डामडौल आम्हास कशाला हवा? ह्या गोष्टींचा संग्रह हा मोठ्या सरदाराचा आपल्यासारख्या बादशहाचा अलकार आहे. आमची गोष्ट निराळी आहे. श्रावकाची साधीं धातुपात्रेही आम्हास वापरण्याची मनाई आहे. श्रावकाचे जेवण झाल्यानतर राहिलेल्या स्वयपाकावर आम्ही आमची उपजीविका करतो. त्यानीं टाकून दिलेलीं वस्त्रे आम्ही परिधान करतो. स्नान, शृंगार आदि क्रिया आम्हास निरर्थक वाटतात. तेव्हा आपण सागत असलेल्या वस्तूचा स्वीकार करून मायाजजाळामध्ये सापडण्याची गोष्ट कशाला? या मायाजजाळामध्ये जे सापडले आहेत त्याना जागृत करण्याची कामगिरी आमच्यावर आहे. आम्हास हिसा, असत्य भाषण, चौर्य, मैथुन आणि संग्रह यापासून अलिप्त राहावयाचे आहे. आणि अगदीं सूक्ष्म जीवानाही आमच्याकडून उपद्रव होणार नाहीं असे वागावयाचे आहे.'

'सूरीश्वर, मनुष्यावर प्रेम करावे हे मला पटते पण आपण मानवानीं हरीण, ससे, बकऱ्या इत्यादि क्षुद्र जीवाबद्दल का पर्वा करावी हे मला समजत नाही. हे सर्व जीव मानवाच्या सुखाकरिता ईश्वराने निर्माण केले आहेत असे नाही आपणास वाटत?'

'राजन्, या जगामध्ये एक काळ असा होता कीं मनुष्य नरमासभक्षण करीत होता. आता त्याला सकल प्राणिमात्र मानवसुखासाठीं निर्माण झाले आहेत असे वाटते. ज्या हरिणाची केवळ हौसेखातर आपण शिकार करता त्यास स्वतःचा जीव प्यारा नाहीं का? मनुष्यावर जशी कट्यार चालविली असता तो घायाळ होतो तद्वत् पारध्याच्या बाणापासून त्याचा जीव कासावीस होत नसेल का? आणि म्हणून स्वतःचा प्राण वाचविण्यासाठी तो इकडे तिकडे भरधाव पळत नाहीं का? मानवाच्या खाद्यासाठीं बकऱ्याच्या मानेवर कसायाकडून सुरी फिरवण्यात येते त्या वेळीं जोरे बे असा आवाज निघतो त्याचा अर्थ काय? ज्या बुद्धीची मनुष्य शेखी मिरवितो त्यास हा अर्थ समजूं नये का? या जनावराची मूक वाणी मानवाने ऐकली नाही हे दुर्दैव होय. आमच्यात हरीण, बकरीं, ससा इत्यादि

प्राण्याचाच काय पण झाड, वनस्पति याच्याही जीवनाचा विचार केलेला आहे. या सर्व जीवाना आपल्या प्रेमळ छत्राखाली नादवून आमच्या पैगबरानी– तीर्थंकरानी– आम्हास आज्ञा केली आहे– सव्वे वि इच्छन्ति जीविऊ न मरिज्जिऊं। तुम्हा पाग वह घोरं निग्गन्था वज्जयन्तिगं।'*

'आचार्यमहाराज, आपल्या उपदेशानें माझा बुद्धिपालट झाला आहे. अधःकारांत खितपत पडणाऱ्या अशा मला आपण जो प्रकाश दाखविला त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. या माझ्या हातून कित्येक निरापराधी जीवाची हिसा झाली असेल. मासाहार केल्यामुळे कित्येक जीवाची कबर-स्थाने माझ्या पोटात सापडतील. या सर्वांचा जबाब अल्लाच्या दरबारामध्ये मी कसा देऊं ?'

'राजन्, आपणास झालेला पश्चात्ताप हा आपण केलेल्या अपराधाचे प्रायश्चित्त आहे. अजून आपण आपल्या संवयी बदलू शकता. विलासाना योग्य वळण लावू शकता. शेकडो प्राण्याना जीवदान देऊन आपण आपल्या चुकाचे परिमार्जन करू शकता. आग्र्याहून मी पाठविलेल्या सदेशास मान देऊन आपण पर्युषणपर्वाच्या सणात† बारा दिवस जीवहिंसा बद करण्याचा हुकूम दिला होता. त्यामुळे शेकडो प्राण्याचे जीव वाचले असतील. अशा रीतीने तुमच्या एका आज्ञेत लाखो जीवाचे रक्षण करण्याचे बळ आहे. डाबर तलावात§ जी हिंसा होते तिचा आपण एका क्षणात प्रतिबंध करू शकता.'

'अब्बुल फजल, सूरीश्वराच्या या उपदेशामुळे माझे पाप धुऊन काढण्याचे मी ठरविले आहे. ह्या दयाळू फकीराचा उपकार मी ह्याच रीतीने फेडू शकेन. डाबर तलावात होत असलेली हिंसा आणि माझ्या सबंद राज्यात पर्युषणपर्वाच्या वेळेस बारा दिवस जीवहिंसा होणार नाहीं अशी फर्मानें आता काढण्याचा माझा विचार आहे. माझ्या प्रजेजवळ धनधान्य भरपूर

---

* सर्व जीव जगण्याची इच्छा धरतात, मरण्याची नाहीं, आणि म्हणून ह निर्ग्रन्थ साधु ! हें घोर पाप करण्याचें वर्ज्य कर

† परिशिष्ट २ पहा.

§ डावर तलाव– बारा मैल लांबीचें सरोवर आग्र्यापाशीं अकबरानें खोदविलें होतें आणि त्यास डावर नाव दिलें होतें.

आहे. तेव्हा जिभेच्या लालसेकरिता दुसऱ्या जीवाचे प्राणहरण करणे पाप आहे असें मला वाटते. आणि म्हणून अशा प्रकारची हिंसा सत्वर बंद झाली पाहिजे.'

बादशहा अकबर पुढे पुढे सूरीश्वराच्या शिष्याच्या उपदेशाने इतका अहिंसाप्रेमी झाला कीं त्यानें वर्षाच्या कित्येक महिन्यात आपल्या सबंद राज्यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवहिंसा करण्यास बंदी करणारीं अशीं फर्माने काढली.

काबूल-कंदाहारपासून अमदनगरपर्यंत आणि कराचीहून कलकत्त्या-पर्यंत पसरलेल्या आणि ज्यात हिंदु, मुसलमान, पठाण, गुरखे, ख्रिश्चन इत्यादि निरनिराळ्या धर्मांच्या लोकाचा भरणा आहे, ज्यात मासाहारास चटावलेल्या एखाद्या सैनिकापासून थेट विलासी सरदार राहतात अशा आवाढव्य साम्राज्यामध्ये कित्येक महिने जीवहिंसा बंद करण्याचीं कडक फर्माने काढणे हे अकबराचे दिव्य साहस नाहीं का ?

९

फत्तेपूरशिक्रींत व आसमंतात् सूरीश्वरानी तीन वर्षे काढलीं. आता सूरीश्वराचा सहवास मिळण्यासाठी गुजरातमधील त्याचा शिष्यवृंद फार उत्सुक झाला होता. अकबराच्या दरबारी येण्याचा सूरीश्वराचा हेतु देखील आता सफल झाला होता पुन्हा जैन साधूना एके ठिकाणी फार काल वास्तव्य करता येत नसल्यामुळे सूरीश्वरानीं गुजरातमध्ये विहार करण्याचे ठरविले.

सूरीश्वराचा विहार करण्याचा मानस जैताशाह व थानसिंह याना कळला. तात्काळ दोघेजण उपाश्रयात गेले आणि त्यानीं सूरीश्वराना काही महिने विहार करण्याचे तहकूब करण्यास सागितले. जैताशहाची इच्छा सूरीश्वराच्या हातून दीक्षा घेण्याची होती, आणि यास खुद्द बादशहाचे अनुमोदन होते. तेव्हा सूरीश्वरानीं विहार करण्याचे रद्द करून जैताशहाच्या दीक्षामहोत्सवा-साठीं एक शुभ दिवस नक्की केला.

उपाश्रयामध्ये या वाटाघाटी चालत असताना अब्बुल फजल आला. फत्तेपूरशिक्रीमध्ये सूरीश्वराचा मुक्काम तीन महिन्यानीं वाढलेला पाहून त्यास फार आनंद झाला. नंतर त्याने सूरीश्वराना बादशहास भेटण्यासाठीं

आमंत्रण दिले. सूरीश्वरानीं ते मोठ्या आनंदाने स्वीकारून दुसऱ्या दिवशीं सकाळीं भेट घेण्याचे ठरविले.

फजलने भेटीची वेळ बादशहास कळवून तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं सूरीश्वराना घेऊन राजमहालात आला. बादशहा त्या दोघांची वाटच पाहात होता. सूरीश्वराचे आगमनवेळीं बादशहाने त्याचे स्वागत केले. नंतर ते तिघेजण आपापल्या जागी स्थानापन्न होताच फजलने बोलण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, 'जहापनाह, आपल्या शहरामध्ये जैताशाहशेट सूरीश्वराजवळ दीक्षा घेणार आहेत, आणि त्यासाठीं येथे सूरिजीमहाराज तीन महिने मुक्काम करणार आहेत.'

'अहाहा ! सूरीश्वराचा सहवास आपणास जितका लाभेल तितका हवाच.' असे उद्गार काढल्यानंतर सूरीश्वराकडे वळून तो म्हणाला,

'पण आपण येथून गुजरातकडेच विहार करणार आहात ना?'

'राजन्, आज तसा विचार आहे. तीन महिन्यानंतर जी परिस्थिति उत्पन्न होईल त्यावर विहाराचे अवलंबून राहील.'

'इतक्या उतारवयामध्ये आपण लाबचा प्रवास करण्यापेक्षा आपण येथे वास्तव्य करून आपल्या शिष्यावर आता सर्व कामगिरी सोपवाल तर बरे होईल.'

'राजन्, आम्हास एका ठिकाणीं जास्त काल राहण्याची मनाई आहे. प्रवासामध्ये होणाऱ्या कष्टाची आम्ही पर्वा करीत नाही. कारण हा देह पडला क्षणभंगुर.'

'महाराज, प्रवासामध्ये होणाऱ्या कष्टाबद्दल व गैरसोयीबद्दल आपणास काहीं वाटत नसेल पण आम्हास तो एक चिंतेचा विषय होईल. पुन्हा मला धर्मबोध मिळण्याचे त्यामुळे बद होईल. तेव्हा आपण येथे स्थिरता करावी.'

सूरीश्वर बादशहास काहीं उत्तर देणार इतक्यात फजल म्हणाला, 'सूरीमहाराज, आपल्या सहवासामुळे बादशहास आनद होतो. आपल्या सान्निध्यामुळे त्याचे विचार जैन धर्माकडे वळले जातात.'

फजलला उत्तर देताना सूरीश्वर म्हणाले, 'शेखमहाराज, आपले म्हणणे ठीक आहे. परंतु जगामध्ये जेथे जेथे दया, सत्य, प्रामाणिकता आणि मनोनिग्रह वास करतात तेथे तेथे जैनत्वच आहे अशी माझी समजूत

आहे. मला जर येथे राहता येणे शक्य असते तर मी इतका आग्रह घेतलाच नसता. बादशहास बोध देण्याविषयी मी एक योजना ठरविली आहे. माझ्यामागून शांतिचंद्रजी बादशहास धर्मबोध देण्याचे कार्य करतील आणि गुजरातमध्ये पोहोचल्यावर माझे पट्टशिष्य विजयसेनसूरींना शक्यतोवर लवकर पाठविण्याचे मी करीन.'

सूरीश्वरांच्या या उत्तरामुळे बादशहास संतोष वाटला. नंतर त्याने अब्बुल फजलला विचारले, 'अब्बुल फजल, उद्या सूरीश्वरांना 'जगत्‌गुरु' पदवी देण्यासाठी दरबार भरविण्याची व्यवस्था झाली आहे ना?'

'होय महाराज. काल रात्रीं राजा मानसिंग आणि बिरबल भेटले होते. आणि ते दोघे या तयारीतच आहेत असे ते म्हणाले' अब्बुल फजलने खुलासा केला.

नंतर बादशहाने सूरीश्वरांना पदवीदानसमारंभास आपल्या शिष्यांसह हजर राहण्याचे आमंत्रण दिले.

त्या वेळी सूरीश्वरांनी बादशहास फार मननीय उत्तर दिले. ते म्हणाले, 'राजन्, माझ्यावर असलेल्या प्रेमामुळे आपण जो माझा सन्मान करण्यास प्रवृत्त झाला त्यास मी लायक नाहीं. जगामध्ये मैत्रीभावना राखून सकल प्राणिमात्रांचे हित इच्छिणे हे आमचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य करीत असतांना आम्ही फलाची, कीर्तीची हाव धरता कामा नये. यास्तव आपण आपली पदवीदानाची योजना मागे घ्यावी अशी माझी आग्रहाची विनंति आहे.'

सूरीश्वरांच्या या विनंतीस उत्तरादाखल बादशहा म्हणाला, 'आपले म्हणणे सामान्य माणसास लागू आहे, तुमच्यासारख्या धर्मात्म्यास नव्हे. आमच्या पदवीने आपला मान वाढणार नसून आमच्या पदवीचीच किंमत वाढणार आहे!'

सम्राट् अकबराच्या आग्रहास मान देणे सूरीश्वरांना भाग पडले. सूरीश्वरांनीं कबूल केल्यानंतर बादशहा त्यांना म्हणाला, 'महाराज, आतां आपण लवकर विहार कराल. तेव्हा आपली काही इच्छा असल्यास मला कळवा.'

'राजन्, आपण जीवदयेचीं आणि लोकोपयोगी कार्ये करीत आहांत ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. माझी इच्छा आहे कीं आपण आमच्या

तीर्थस्थानाचे रक्षण करण्याची जबाबदारी घ्यावी व तेथे यात्रेकरूकडून जो कर घेण्यात येतो तो माफ केला जावा.'

'अरेरे ! अल्लाच्या दरबारामध्ये जाणाऱ्यापासून कर घेणे हे तर जिजिया करापेक्षा अधिक दुष्ट आहे. या गोष्टीची आपण मला माहिती देऊन सावध केले हे योग्य झाले. दुसरे, आपली हीं जीं तीर्थस्थाने आहेत तीं आपल्या स्वाधीन केलीं तर काही हरकत नाहीं ना ? आज मीं एक फर्मान काढून या तीर्थस्थानाचा अधिकार आपणाकडे सोपवितो.'*

यानतर सूरीश्वर स्वस्थळी निघून गेले. दुसऱ्या दिवशीं पदवीअर्पणा-साठीं खास दरबार भरविण्यात आला. अकबराच्या पदरीं असलेले मोठ-मोठे सरदार आणि विद्वान् या समारंभास हजर होते. त्यात सूरीश्वराना 'जगदगुरु' ही पदवी अर्पण करण्यात आली. ह्या पदवीदानावरून बाद-शहाच्या मनाचे पृथक्करण करता येईल. त्याची खात्री झाली असावी कीं सूरीश्वर हे एक असाधारण विद्वान् साधु आहेत. आणि त्याच्या विद्वत्तेवरून आणि उच्च चारित्र्यावरून ते जैनाचेच नव्हे तर जगाचेही गुरु होण्यास लायक आहेत. ह्या पदवीदानसमारंभाची शोभा काय वर्णावी ? त्या वेळीं कित्येक कैद्याना सोडण्यात आले. पाजरपोळमधील कित्येक पक्ष्याची सुटका करण्यात आली. फत्तेपूरशिक्रीमधील श्रावकाना तर अत्यानद झाला. या आनदी वातावरणात सूरीश्वराच्या हातून जैताशाहाचा दीक्षामहोत्सव ठरलेल्या वेळी उरकण्यात आला. प्रत्यक्ष बादशहानें या समारभाला द्रव्याची मदत केली. पण हे आज कित्येकाना खरे वाटेल का ?

१०

लक्ष्मी चंचल आणि वैभव ऊन-सावलीप्रमाणे आहे. असे नसते तर अवाढव्य मोगल साम्राज्य का कोसळावे ? अथवा एके काळीं अकबराची प्रसिद्धि पावलेल्या फत्तेपूरशिक्रीसारख्या सुदर शहराची केविलवाणी स्थिति का

---

* हें फर्मान दोन फूट लाव आणि दीड फूट रुंद अशा पाढऱ्या वस्त्रावर सोनेरी अक्षरांनीं लिहिलेलें आहे आणि तें बादशहा मोहोर, सिक्का, सहीसहित अमदाबाद-मध्यें अजून उत्तम स्थितींत आहे.

व्हावी ? अकबराच्या वेळच्या त्या विराट आणि वैभवशाली शहराकडे पाहिलें म्हणजे कफल्लक झालेल्या एका श्रीमंताची आठवण होते. हजारो हत्ती, घोडे इत्यदि प्राणी असलेल्या सरकारी पागेमुळे हे शहर शोभिवंत झाले होते. शेकडों स्त्रिया असलेल्या अंतर्गृहामुळे हे शहर अकबराचें आणि जळत्या चेंडूच्या साह्याने रात्री पोलो खेळ खेळणाऱ्या तरुण आणि रंगेल सरदाराचे ते एक विलासस्थान होते. हिंदी आणि पर्शियन चित्र-कला याचा सुदर समन्वय करणाऱ्या कलावताचे ते माहेरघर होते आणि दिने-इ-इलाई (ईश्वराचा धर्म) नावाच्या अकबराने स्थापन केलेल्या धर्माचे तेच जन्मस्थान होते. पण आज आपणास तेथे काय दिसेल ? काहीं पडलेल्या लाल रंगाच्या भिंती आणि काहीं नयनमनोहर राजवाड्याचा अवशेष. पण हे अवशेष देखील आज आशिया खडात एक आश्चर्य म्हणून प्रसिद्ध आहेत. दिवान-इ-खास मधील कोरीव कामाबद्दल प्रसिद्ध असलेला खाब पंचमहाल आणि राजवाड्यापेक्षाही सुंदर असे थडगे फत्तेपूरशिक्रींत पाहिल्यानतर मन क्षणभर गुग होते.

अकबराचा सुरवातीचा बराच काल निरनिराळे देश जिकण्यात आणि स्थिरस्थावर करण्यात गेला. त्याच्या राज्यात शातता प्रस्थापित झाल्यानतर त्याने फत्तेपूरशिक्री हे शहर बाधले. याच सुमारास अब्बुल फैजी आणि फजल या बधुद्वयाबरोबर त्याची ओळख झाली. त्या दोघाच्या स्वतंत्र विचारसरणीचा अकबराच्या मनावर फार परिणाम झाला. आणि त्याने ‘इबादतखाना’ (धर्मसभा) फत्तेपूरशिक्रीमध्ये बाधून त्यात धार्मिक प्रश्नावर वादविवाद करण्याच्या प्रथेस सुरवात केली. प्रथम काही मौलवी मडळी (सुन्नी उलेमा) एकत्र येऊन वादविवाद करीत. या मडळीमध्ये होत असलेली चर्चा ऐकण्यासाठीं अकबर दर शुक्रवारी नियामितपणे येत असे. पण ‘वादे वादे जायते तत्त्वबोधः’ या म्हणीला अनुसरून काही तत्त्वबोध मिळण्याच्या ऐवजी मौलवींच्या भाडणाची विल्हेवाट लावण्याचे कंटाळवाणे काम अकबरावर पडूं लागले. याच सुमारास अकबराची मुसलमानी धर्मावरील श्रद्धा कमी झाली. मशिदीमध्ये जाण्याचे त्याने सोडून देऊन निरनिराळ्या धर्मपडिताना धर्मसभेत चर्चा करण्यास त्याने पाचारण केले. अब्बुल फजलच्या लिखाणावरून मुसलमान, पारशी, जैन, हिंदु, नास्तिक इ० पथीय धर्म-

गुरु, कायदेशास्त्री, मोठमोठाले वक्ते इबादतखान्यामध्ये चर्चा करीत आणि आनद मिळवीत. या चर्चेमुळे मुसलमान धर्मावरील अकबराचा विश्वास पूर्णपणे नाहींसा होऊन त्याचे मन पारशी, जैन आणि हिंदु या धर्मोकडे ओढले गेले.

अकबराच्या दरबारीं जे विद्वान् गृहस्थ आले त्याची संख्या एकशे-चाळीस पर्यंत होती.* सूरीश्वरानतर जैन धर्माचा उपदेश करण्याचे कार्य उपाध्याय श्रीशातिचद्र,§ आचार्य विजयसेनसूरि,। श्रीभानुचंद्र आणि श्रीसिद्धि-चद्र यानी केले आहे. सूरीश्वरावरील बादशहाचे प्रेम हे सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट होते आणि सूरीश्वरांच्या शिष्यावरही हे प्रेम त्याने कायम ठेवले. शाति-चद्राच्या शतावधानाने आणि काव्यशक्तीने तो मोहित झाला होता. आचार्य विजयसेनसूरीच्या वादविवादकुशलतेमुळे आणि विद्वत्तेमुळे प्रसन्न होऊन 'सवाई विजयसेन' नावाची पदवी त्याने त्याना अर्पण केली होती. दर रविवारी सूर्यसहस्रनामाचे श्लोक तो भानुचद्राकडून ऐकत असे आणि फारसी भाषा व वाङ्मय एखाद्या मौलवीकडून न शिकता भानुचंद्राकडून तो शिकला होता. हे सर्व प्रसंग काय दर्शवितात? या सर्व जैन साधूंचे अकबरावर अत्यत वजन होते हेच यावरून सिद्ध होत नाही काय? अकबराच्या दरबारी असलेल्या कट्टर इस्लामी इतिहासकार बदाउनीने‡

* ह्या एकशेंचाळीस सभासदांचे पाच वर्ग पाडण्यात आले होते ह्यात सूरि-श्वराचें नाव (हीरजीसूर) पहिल्या वर्गात आणि विजयसेनसूरि व सिद्धिचद्राचें नाव पाचव्या वर्गात आढळून येतें.

§ श्रीशातिचद्रजी:— कृपारस काव्याचे कर्ते

। श्रीविजयसेनसूरिः— प्रखर विद्वान् होते. हेमचद्राचार्यकृत योगशास्त्राच्या पहिल्या श्लोकाचे यानीं सातशे अर्थ केले होते. असें सांगण्यात येते कीं ह्यानीं लाखों जिनबिंबाची प्रतिष्ठा केली होती. वयाच्या ५८ व्या वर्षी हे स्वर्गवासी झाले. बादशहा जहांगिरानें ह्यांच्या स्तूपाकरिता दहा बिघे जमीन इनाम दिली. तीन दिवस निर-निराळे बाजार बद करण्यात आले.

‡ बदाऊनीः— इतिहासलेखक. कट्टा सुनीपंथी असल्यामुळें याला अकबराचें धार्मिक धोरण पसंत नव्हतें. फजलच्या लेखात अकबराची स्तुतिच मुख्यतः असल्यामुळें विरुद्ध बाजू समजण्याच्या दृष्टीनें याच्या लिखाणाचा फार उपयोग होतो.

ही गोष्ट कबूल केली आहे. तो म्हणतो, 'सम्राटाने इस्लाम धर्माचा त्याग केला होता त्यास अनेक कारणे होती. मुख्य कारण असे होते की निरनिराळ्या देशाचे व निरनिराळ्या धर्माचे अनेक विद्वान् निर्भयपणाने दरबारामध्ये येत आणि बादशहाबरोबर प्रत्यक्ष वार्तालाप सहृदयपूर्वक करीत. रात्रदिन तो धर्मासंबधी विचार करी. आणि त्याचे यथार्थ मूळ काढल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही कार्याकडे तो लक्ष देत नसे. सम्राट् विशेषेकरून मुसलमानेतराचे विचार जाणून घेई. ज्या ज्या गोष्टी त्यास पटत त्याचा तो स्वीकार करी.

'विशेषतः अन्य संप्रदायाच्या विद्वानापेक्षा श्रमणसाधु आणि ब्राह्मण पंडित ह्यांची तो एकान्तात भेट घेई आणि चर्चा करी. हे साधु आणि पडित धर्मतत्त्व आणि नीतिशास्त्र यामध्ये दुसऱ्या धर्मांच्या विद्वानापेक्षा अधिक प्रवीण होते आणि त्यामुळे स्वतःच्या अभिप्रायाना प्रामाणिक ठरविण्यासाठी युक्ति आणि प्रमाणावर आधारभूत झालेल्या गोष्टी ते त्यास निवेदन करीत. आणि ते आपल्या धर्माचे समर्थन इतक्या दृढतेने करीत की त्याच्याविरुद्ध सम्राटाच्या मनात संशय उत्पन्न करण्याची कोणाची छाती नसे.'

सूरीश्वरानी अकबरास जो अहिंसाधर्म शिकविला त्याचे पालन त्याने आपल्या मृत्यूपर्यंत केले आहे. सूरीश्वराच्या शिष्याच्या उपदेशाने अकबराने जिजिया कर, निर्वंश्याची मिळकत जप्त करण्याची सरकारी प्रथा आणि कित्येक महिनेपर्यंत कत्तलखाने बंद करण्याचे कायदे जारीने अमलात आणले.

जैन, हिंदु अथवा पार्शी या धर्मांवर अकबराचे प्रेम होते तरी अकबर कोणत्याही एका सप्रदायामध्ये स्थिर होईल ही गोष्ट अशक्य होती. त्याचे मन मधमाशीप्रमाणे होते. सुगधित फुलातून रस चोखल्यानंतर मधमाशी दुसऱ्या फुलावर बसते तसे जैनाच्या उत्कृष्ट तत्त्वाचा स्वीकार केल्यानतर अकबराचे मन हिंदूच्या तत्त्वाकडे आकर्षिले गेले असावे. तेथून ते उडून पारश्याच्या सूर्योपासनेकडे वळले असावे. तो सर्व धर्माचा उपासक होता आणि कोणत्याही एका धर्मावर आसक्त नव्हता. सत्याचा तो सहृदयक शोधक होता. संकुचिततेचा तो तीव्र विरोधक होता.

पण या सत्यशोधकास फजलच्या सगतीमुळे धर्मसस्थापक होण्याची लालसा उत्पन्न झाली. 'दिने-इ-इलाई' ह्या लालसेचाच परिपाक आहे. टोडरमल, मानसिघ, फजल, फैजी इत्यादि मडळी या नवीन धर्मात सामील झाली. पण ह्याने काढलेला धर्म अल्पजीवी राहिला. तो अल्पजीवी राहिला हे उत्तम झाले. ज्याच्या ठिकाणी नीतिमत्तेचे भरपूर भाडवल नव्हते, ज्याने स्वतःसबधी भ्रामक कल्पना केल्या होत्या, अशा अविवेकी अकबराचे धर्म स्थापण्याचे साहस सुदर ठरलें नाही यात वावगे ते काय ?

११

सुरीश्वर हे एक जैन आचार्य होते. जैन आचार्यांच्या जीवनचरित्रात प्रेमाचे वर्णन, पराक्रमाची प्रशसा थोडीच आढळणार. कोणत्याही निग्रथ साधूच्या सहवासात या. काय आढळेल ? विद्या, वीतरागता आणि वैराग्य या रत्नत्रयीची उत्कृष्ट उपासना. ही उपासना ते अखंड आणि अत्यत उत्साहानें करीत राहतात. 'वैरागी राजा' भर्तृहरि म्हणतो— ज्याने विद्या सपादन केली नाहीं, उत्तम तपश्चर्या केली नाही, ज्याच्याजवळ नितिमत्तेचे बळ नाहीं अथवा ज्याने सद्धर्माचे पालन केले नाही, तो मानव नसून पशु आहे. पण जो या सर्व गुणाचा समुच्चय आहे, सागर आहे, असा जैन साधु खरोखर देवदूत नाहीं का ?

सूरीश्वराच्या डोक्यात जिनशासनाचे विचार अहोरात्र घोळत होते. जिनशासनाचा डका मारतात गाजावा, जिनवाणीचे श्रवण करून आणि त्याप्रमाणे वर्तन करून श्रावकानीं गुण्यागोविदाने राहावे, जैन तीर्थाचें परकीयापासून सरक्षण व्हावे आणि जीवदयेची व भूतदयेचीं कार्ये सतत साम्राज्यात चालू असावी याव्यतिरिक्त कोणते विचार त्याच्या हृदयाला स्पर्श करू शकले असतील ?

फत्तेपूरशिक्रीस वास्तव्य करण्यास हेच विचार कारणीभूत झाले. आणि याच विचारामुळे सूरीश्वराचा सम्राटाच्या कित्येक सुभेदार-सरदाराबरोबर परिचय झाला आणि ह्या सर्वांना प्रतिबोधण्याचे सुभाग्य सूरीश्वरांना लाभले. पण या अन्यायी आणि अनियंत्रित सुभेदारावर छाप पाडणे हे विचारी आणि विद्याप्रेमी अकबरास उपदेश करण्यापेक्षा अवघड होतें. हे सुभेदार-

सरदार मुसलमानी धर्माचे असल्यामुळे त्याच्यामध्ये व सूरीश्वरामध्ये धार्मिक प्रश्नावर चर्चा हटकून होत असे. आणि या चर्चेमध्ये सूरीश्वराचा हमखास विजय होत असे.

पाटणमध्ये सूरीश्वराची होत असलेली प्रशंसा ऐकून त्याना भेटण्याची सुभेदार कलाखानाने इच्छा प्रकट केली. भेटीमध्ये निरनिराळ्या विषयावर बोलणे झाल्यावर चद्र उच की सूर्य उच या विषयावर वादविवाद सुरू झाला. चंद्र उंच आहे असे सूरीश्वरानी प्रतिपादन केले. पण कलाखानास ते पटले नाहीं. कारण त्याच्या धर्मामध्ये याच्या अगदीं उलट लिहिले होते. ही वस्तुस्थिति पाहून सूरीश्वर म्हणाले, 'मी काहीं सर्वज्ञ नाही अथवा माझ्या चर्मचक्षूनीं उंच कोण हे पाहिले नाहीं. माझ्या गुरूंकडून जे मला समजले आणि माझ्या शास्त्रात जे मीं वाचले ते मीं निवेदन केले. तुमच्या कुराणामध्ये तुम्ही सागता त्याप्रमाणे लिहिले असेल तर तुम्ही त्यावर विश्वास ठेवा. काहीं हरकत नाहीं.'

सूरीश्वराचे सरळ उत्तर ऐकून कलाखान संतुष्ट झाला. अदृश्य गोष्टीवर हट्टास पेटणे व त्यावर भाडणे मूर्खपणाचे आहे हे त्याने ओळखले आणि देहान्त शिक्षा झालेल्या कैद्याना जीवदान दिले व सबद महिनाभर जीवहिंसाप्रतिबंधक हुकूम काढला. हा सूरीश्वरांच्या वाणीचा परिणाम.

अमदाबादच्या आझमखानास सूरीश्वराच्या सम्राट्वर असलेल्या वजनाची जाणीव होती. म्हणून त्याने सूरीश्वराची भेट घेण्याची इच्छा दर्शविली. सूरीश्वराना देखील आझमखानास भेटण्याची जरूरी होती. कारण अकबराकडून मिळालेल्या जैन तीर्थावर जैनाच्या मालकी हक्कासबंधींचे जे फर्मान निघाले होते त्याची अम्मलबजावणी बरोबर होत नव्हती.

भेटीमध्ये आझमखानाने तीर्थंकराची माहिती मिळविली. नंतर तो सूरीश्वराना म्हणाला, 'आपण कित्येक वर्षांपासून फकिरी पत्करली आहे. ह्या दीर्घ कालामध्ये काहीं चमत्कार उत्पन्न करणारी विद्या आपण अवगत केली का ? अथवा अल्लाशीं आपली भेट झाली का ?'

खानाच्या प्रश्नास उत्तर देताना सूरीश्वर म्हणाले, 'खानसाब, अल्लासंबंधीं आमच्या कल्पना निराळ्या आहेत. सृष्टि उत्पन्न करणारा कोणी अल्ला असेल असे आम्ही मानीत नाहीं. तेव्हा त्याची व माझी भेट कशी

होणार? पुन्हा कंचन व कामिनी याचा त्याग करून आम्ही साधु होतो. तेव्हा नवीन चमत्कार दाखवून जगास चमत्कृत करण्याची आम्हास जरूरी का वाटावी? मात्र चमत्कारिक विद्या पूर्वी होत्या आणि काही महात्म्याना त्या अवगतही होत्या. पण आज ते थोर पुरुष राहिले नाहीत. पण त्यामुळे आम्ही वाईट वाटून घेत नाही. कारण आम्हा साधूंजवळ चारित्र्यरुपी किमया असली म्हणजे त्या द्वारे आम्ही पुष्कळ चमत्कार दाखवू शकतो.'

नतर मुसलमानानाच ईश्वरप्राप्ति मिळते, हिंदूंना मिळत नाही, हे तत्त्व सिद्ध करण्यासाठीं आझमखानाने जी हास्यकारक गोष्ट* सागितली तीतील चुका सूरीश्वरानी दाखविल्या आणि जो धर्माने वागतो त्यास मुक्ति मिळते हे त्यानीं आझमखानास पटवून दिले. या प्रसंगानतर सूरीश्वराना भेटण्याची कोणतीही सधि तो गमवीत नसे.

याप्रमाणे सूरीश्वरानीं अकबरपुत्र मुराद, कासिमखान, खानखानान, मीर्जा अब्दूल, रहीम, सुलतान हबीब्बुलाह इ० अनेक सुभेदारावर आपली छाप पाडली.* आणि त्याच्यापैकीं बहुतेकाकडून अनेक कार्ये करवून घेतली. त्यात जीवहिंसाबंदी, कारागृहातून कैद्याची सुटका हीं प्रमुख आहेत. जैन श्रावकावर अन्याय होत असताना ते झगडले आहेत. त्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठीं त्यानी आपल्या वजनाचा सदुपयोग केला आहे; उदा० रायकल्याण नावाचा सरकारी अमलदार खंबायतच्या जैन श्रावकाना फार उपद्रव देत असे. त्याच्या जुलमामुळे कित्येक श्रावकानी प्राण वाचविण्यासाठीं धर्मांतर केले होते. श्रावकाना उपद्रव करून तो थाबला नाही: त्याने एका जैन मदिराची विटबना केली. या प्रकरणामुळे सबद गुजरातमध्ये हाहाःकार माजला. सूरीश्वरानीं बादशहा अकबर आणि सुभेदार मिर्झाखान याच्या मदतीने रायकल्याणाचा योग्य बदोबस्त करविला आणि धर्मान्तर केलेल्या श्रावकाचे आणि जैन मदिराचे शुद्धीकरण केले.

सूरीश्वरानीं आपल्या वाणीने आणि विद्वत्तेने जिनशासनाची महान् सेवा केली आहे आणि म्हणून श्रेष्ठ जैनाचार्यांच्या नामावलीत त्याचे नाव गोवण्यात येते.

---

* विशेष माहितीसाठीं श्रीविद्याविजयजीकृत सूरीश्वर सम्राट् ग्रथ पान १७९ पहा.

१२

कल्पना करा. सूरीश्वरकालीन एक जैन श्रावक दोन चार महिने भारतात येऊन राहिला. त्यानें निरनिराळ्या जैन तीर्थस्थानाचीं दर्शनें घेतलीं. जैनान्या निरनिराळया आचार्यमहाराजाचीं व्याख्याने त्याने ऐकलीं. एखादा दीक्षामहोत्सव त्याच्या पाहण्यात आला. ठिकठिकाणीं निर्माण झालेलीं जैन विद्यालयें, आश्रम, वसतिगृहे याना भेटी दिल्या. त्याच्या मनावर काय परिणाम होईल ? जैनसमाजाबद्दल त्यास काय वाटेल ?

रस्त्यामध्ये भरधाव पळणाऱ्या मोटारी, आगगाड्या, पोस्ट ऑफिस, आपलीं घरे, आपले कपडे, भाषा इ० पाहून आपण आपल्या समकालीन श्रावकाच्या वशजात राहात आहोत हे त्यास कळणार सुद्धा नाहीं. इतका बदल आपणामध्ये झाला आहे. हा काळाचा महिमा. दुसरे काय ?

सूरीश्वरकाळीं प्रवास पायीं अथवा बैलगाडीने करावा लागे. यामुळें एका शत्रुजयची यात्रा करण्यास कित्येक महिने सूरीश्वरकालीन श्रावकास लागत असतील. आज तीच यात्रा एक आठवड्यात करून मनुष्य घरीं येऊं शकतो. म्हणून प्रत्येक वर्षी शत्रुंजयची यात्रा करणारे आज कित्येक सापडतील. सूरीश्वरकालीन सबद आयुष्यामध्ये एक दोन यात्रा मोठ्या कष्टाने होत असतील. पण पूर्वीच्या यात्रा, यात्रा करण्यासाठीं होत्या; उन्हाळ्यामध्ये हवा खाण्यासाठीं अथवा व्यापारधंद्यास कटाळून तीर्थ-स्थानाच्या केलेल्या सफरी त्या नव्हत्या. शेकडो साधु आणि हजारो श्रावका-बरोबर सूरीश्वरानीं केलेल्या सिद्धाचलयात्रेचे वर्णन वाचल्यानंतर असे आढळून येतें कीं त्या वेळीं फार थोडीं मंदिरे शत्रुजय पर्वतावर असावींत. पण आज तेथे हजारो मूर्ति आढळतील. आज एखादा श्रावक दीक्षा घेत असला तर समाजामध्ये निरनिराळे विचारतरग उत्पन्न होतात. साधु आणि श्रावकामध्ये तटे होण्यापर्यंत पाळी येते. सूरीश्वरकाळीं अशा प्रकारचे तटे होत पण त्या वेळी एकाच्या संसारत्यागामुळे दुसऱ्यास उत्तेजन मिळे आणि अशा रीतीने कित्येक, केव्हा केव्हा सबंद घरच्या घर, दीक्षा* घेत

---

* सूरीश्वर सम्राट् पान २११, २१५–२१७.

असे. आज ती स्थिति नाहीं. स्याद्वादवादी सूरीश्वरानीं स्वतःच्या आयुष्यात पन्नास प्रतिष्ठामहोत्सव उजविले. त्याच्या उपदेशामुळे पाचशे मंदिरे बाधण्यात आलीं. पण त्या वेळीं मंदिराची आवश्यकता होती म्हणून ती बाधण्यात आलीं. पूर्वी मुसलमानी जुलमामुळें कित्येक मंदिरे नष्ट झालीं होतीं. भ्रष्टाकाराच्या भयामुळे कित्येक मूर्ति गुप्तस्थळी ठेवण्यात आल्या होत्या.

सूरीश्वरकाळच्या आणि सध्याच्या समाजप्रवृत्तीमध्ये फार तफावत पडली आहे. सूरीश्वरकाळामध्ये धनिकाच्या सपत्तीचा ओघ प्रतिष्ठामहोत्सव साजरा करण्यात, सघ काढण्यात आणि मदिरे बाधण्यात झालेला होता. आजही काहीं प्रमाणात हीं प्रवृत्ति आढळून येते. पण जेव्हा सूरीश्वरकाळामध्ये मूर्तिपूजेला फारसा विरोध नव्हता तेव्हा आज श्वेताबरपंथीय अर्धा समाज मूर्तिविरोधक झाला आहे. समाजास उपयोगी पडतील अशा संस्था– विद्यालये, वसतिगृहे, दवाखाने इत्यादि– उघडण्याची तळमळ सर्वत्र आढळून येत आहे थोडक्यात, सूरीश्वरकालीन समाज जास्त धार्मिक प्रवृत्तीचा होता, आजच्या समाजाचा कल बुद्धिवादाकडे आहे.

जग पालटत असताना जैनसमाज जागच्या जागी राहूं शकत नाहीं. जुनी व्यवस्था अथवा घडी बदलून समाज नवीन कल्पना, नवीन विचार ग्रहण करण्यास उत्सुक आहे. पण या नवीन कल्पनामुळे, नवीन विचारामुळे, भगवान् महावीराने प्रवर्तिलेल्या शिकवणुकीचा आणि तत्त्वज्ञानाचा लय होणार नाही. कारण ती शिकवणूक आणि ते तत्त्वज्ञान शाश्वत सत्यावर उभारलेले आहे.

१३

सिद्धाचलयात्रा करण्यासाठीं सूरीश्वराबरोबर कित्येक ठिकाणचे सघ आले होते. त्यातील ऊना येथील श्रीसघाने फार आग्रह केला म्हणून सूरीश्वरानीं ऊना येथे चातुर्मास घालविले. विहार करण्याची वेळ जवळ येऊं लागली. सूरीश्वर तयारी करू लागले. पण त्याची प्रकृति चागली नसल्यामुळे श्रीसंघ विहार करण्यास परवानगी देत नव्हता, पण विहार रद्द केला

तरी सूरीश्वराना शांति मिळेना. त्याच्या रोगाचे स्वरूप दिवसेंदिवस उग्र होऊं लागले. सूरीश्वराना औषधोपचार करण्यासाठीं श्रावकानी फार खटपट केली. पण औषध घेण्यास ते तयार होईनात. स्वतःच्या आत्म्यासाठी आणि परोपकारासाठीं हे शरीर टिकविणे जोपर्यंत आवश्यक होते तोपर्यंत अन्नपाणी ग्रहण करून सूरीश्वरानी ते टिकविले. तसे ते टिकविणे हे पुण्यकर्म होते. पण वार्धक्याने आणि रोगाने जर्जर झालेल्या शरीरावरून ममत्व कमी करणे हेही धर्माचे अंग आहे अशी सूरीश्वराची भावना होती. सूरीश्वराना वाटत होते की जगण्यासाठीं जगावयाचे नाही, तर आत्मोद्धारासाठी, परोपकारासाठीं, जगावयाचे.

पण सूरीश्वरासारखे संत थोडेच असतात. सूरीश्वराच्या औषध घेण्याच्या नकारामुळे श्रावकाना वाईट वाटूं लागले. त्यानी सूरीश्वराना फार आग्रह केला. शेवटीं अन्नपाणी घेण्याचे त्यानी सोडून दिले. ही परिस्थिति पाहून सोमविजय नावाच्या एका साधूंनी सूरीश्वराची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. रोगनिवारणार्थ मोठमोठ्या आचार्यांनीं औषध घेतल्याचीं जुनी उदाहरणे दाखविलीं आणि संघाचा मान ठेवण्यासाठीं शुद्ध औषध घेण्याचे सुचविले.

शेवटीं आपल्या इच्छेविरुद्ध सूरीश्वरानी औषध घेण्याचे ठरविले. तज्ज्ञ वैद्यानी काळजीपूर्वक त्याची प्रकृति तपासली. पण औषधामुळे ज्ञानध्यानक्रिया यामध्ये पूर्वीप्रमाणे तत्पर राहण्याइतकी शक्ति सूरीश्वराना शेवटी आली नाहीं. सूरीश्वराचा आपल्या जीवनावरील विश्वास उडाला. पण मृत्यूचे दुःख सूरीश्वराना होत नव्हते, दुःख वाटत होते ते निराळ्या कारणामुळें. आपल्या अंतकाळीं आपले पट्टशिष्य– विजयसेनसूरि– आपल्याजवळ नाहीत यामुळे सूरीश्वराना वारंवार गहिवरून येई. कित्येक दिवसापासून अंथरुणावर खिळलेल्या म्हाताऱ्यास अंतकाळीं आपल्या कर्त्या मुलास भेटण्याच्या इच्छेइतकीच आपल्या पट्टशिष्यास पाहण्याची सूरीश्वराची नैसर्गिक इच्छा होती. सूरीश्वर सांसारिक नव्हते. पण सूरीश्वर फार मोठ्या व निराळ्या संसाराची काळजी वाहत होते. तपागच्छाच्या काहीं प्रश्नाचा पट्टशिष्यास खुलासा करण्यासाठीं त्याचे मन उत्सुक होतें. पण भविष्यात काहीं निराळेच लिहिले होते.

सूरीश्वराचे दुखणे, सूरीश्वराची उत्कट इच्छा विजयसेनसूरींना कळविण्यासाठीं धनविजय नावाचे साधु लाहोरकडे रवाना झाले. लाहोरास विजयसेनसूरीना भेटून त्यानी सूरींसबंधी सर्व समाचार सांगितले हे समाचार ऐकताच विजनसेनसूरीना जबर धक्का बसला. त्याच्या शरिरात एकाएकीं शिथिलता आली. पण त्यानी धीर धरला आणि बादशहाची परवानगी घेऊन ते ऊनाकडे जलद विहार करू लागले.

पायी विहार विजयसेनसूरि किती जलद करणार? त्या वेळी आगगाड्या किंवा मोटारगाड्या नव्हत्या. पण बादशहाच्या पवनवेगी घोड्यावर स्वार होऊन सूरीश्वराना भेटण्याचे विजयसेनसूरींना विशेप अवघड नव्हते. पण विजयसेनसूरि पडले जैन साधु. जैन साधूना प्रवासासाठी कोणत्याही साधनाचा उपयोग करण्यास प्रतिबध आहे. तेव्हा सूरीश्वराना भेटण्याची उत्कट इच्छा असली तरी पायीं विहार करण्याशिवाय मार्ग नव्हता.

कित्येक महिने निघून गेले पण विजयसेनसूरि येण्याचे चिन्ह दिसेना. पुन्हा चातुर्मासास सुरुवात झाली. सूरीश्वर निराश झाले. त्याचे शिष्य व श्रावक त्याची समजूत करूं लागले.

पर्युषणपर्वास सुरुवात झाली. रोगाने जर्जर झालेल्या आणि अशक्त बनलेल्या सूरीश्वरानी स्वत: कल्पसूत्र वाचले. सर्व धार्मिक क्रिया केल्या. पण त्या परिश्रमामुळे मात्र शरीर जास्त शिथिल झाले.

पर्युषणानंतर तीन आठवड्यानीं भाद्रपद वद्य १० वि. सं. १६५२ च्या मध्यरात्रीस सूरीश्वरानी विमलहर्ष आदि सर्व साधूना एकत्र केले आणि त्याना उद्देशून ते म्हणाले, 'साधूनो, जगण्याची आशा मी सोडली आहे. एकदा जो जीव जन्मला तो एके दिवशीं मरणार हें ठरलेले आहे. प्रत्यक्ष तीर्थंकराना मरण चुकले नाहीं. मरण जसे कोणी टाळू शकत नाही तसें आयुष्य एका क्षणमात्रानेही वाढविण्यास कोणी समर्थ नाहीं. म्हणून आपण वृथा शोक करू नका. विजयसेनसूरि येथे हजर नाहींत. कल्याणविजय भेटले नाहींत. ठीक आहे. आता मी आपणास इतकेच सागू शकतो कीं तुम्ही कोणत्याही प्रकारची चिता करू नका. सत्यवादी आणि शासनप्रेमी असे विजयसेनसूरि तुमच्या सर्व आशा पूर्ण करतील. तुम्ही ज्याप्रमाणे मला मानता त्याप्रमाणे यापुढे तुम्ही त्याना मान द्या. पुत्राप्रमाणे ते तुमचें

पालन करतील. संघ करून रहा आणि जिनशासनाची शोभा वाढेल असेच वागा.'

साधूंना याप्रमाणे बोध केल्यानंतर सूरीश्वर समस्त जीवांची क्षमा याचूं लागले. आपल्या शिष्यांची क्षमापना करीत असताना सर्व साधूंचे हृदय भरून आले आणि त्यांच्या डोळयातून अश्रुधारा वाहू लागल्या. अशा गंभीर स्थितीमध्ये सोमविजय सूरीश्वराना म्हणाले, 'गुरुदेव, आम्हा बालकांची आपण क्षमा मागावी? आमच्या प्रत्यक्ष पित्याने जितके प्रेम केलें नसेल तितकें आपण आमच्यावर प्रेम केले आहे. अज्ञानरूपी अंधःकारात आम्ही खितपत पडलो होतो. तुम्ही आम्हास प्रकाश दाखविला. आम्ही लहान आहोत. पुन्हा अज्ञानामुळे आमच्या हातून आपली योग्य सेवा झाली नसेल म्हणून आम्ही सर्वजण आपली क्षमा मागतो.'

यावर सूरीश्वर म्हणाले, 'आपले म्हणणे ठीक आहे. पण माझ्याकडून आपल्यापैकी कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील म्हणून आपली क्षमायाचना करावी हे मी माझे कर्तव्य समजतो.'

नंतर गतजीवनाकडे दृष्टि फेकून भरत, बाहुबली, अभयकुमार, शालिभद्र, मेघकुमार वगैरे गतकालातील ऋषींची तपश्चर्या आणि शक्तीचे स्मरण करूं लागले. नवकारमंत्राचे ध्यानास सुरवात केली. दुसऱ्या दिवसाच्या सायंकाळपर्यंत सूरीश्वर ध्यानस्त राहिले.

नंतर सावध होऊन दुसऱ्या साधूंना स्वतःच्याजवळ बसवून स्वतः प्रतिक्रमण केले. प्रतिक्रमण झाल्यानंतर सूरीश्वरानीं शेवटचे उद्गार काढले—

'बंधूंनो, आता मी तुमचा शेवटचा निरोप घेतो. आपण व्याकुळ होऊं नका. धर्मकार्य करण्यात ढिलाई करू नका.' इतके उद्गार काढल्यानंतर त्यानीं डोळे मिटून 'माझे कोणी नाही, मी कोणाचा नाही. माझा आत्मा ज्ञानदर्शन-चारित्र्यमय आहे, सच्चिदानंदमय आहे, शाश्वत आहे. माझ्या तुच्छमय शरिराचा त्याग करून मी शाश्वत सुखाचा मालक होत आहे' असे उद्गार त्यानीं काढले. जपमाळ घेऊन ती जपण्यास त्यानी सुरवात केली. पांचवी माळ जपत असता माळ हातातून पडून गेली. लोकामध्ये हाहाःकार माजला. सूरीश्वराची जीवनज्योत मानवी देहास सोडून निघून गेली.

मखमल व मशरु यानी मढवलेल्या, चामर, तोरण, घंटा आणि चारी बाजूंनीं फिरत्या पुतळ्या यानीं शृंगारलेल्या, पालखीमध्ये सूरीश्वराचे शव वाजत्रींच्या गोड आवाजात आणि पुष्प व पैसे याच्या वर्षावात गावाबाहेरील एका बगिच्यात नेण्यात आले.

पालखीमध्ये ठेवलेल्या आणि चंदनाच्या लाकडानीं वेढलेल्या सूरीश्वराच्या शवास दुःखी अंतःकरणानें आणि जड मनाने अग्नि दिला गेला. कापूर, कस्तुरी आणि केशर यानीं ती पवित्र चिता सुगंधित करण्यात आली.

अग्निसंस्कार झाल्यानतर श्रावकानीं मंदिरामध्ये येऊन देववंदन केले. नंतर उपाश्रयामध्ये जाऊन साधूंच्या मुखातून वैराग्यमय उपदेश ऐकिला. गुरुविरहाने दुःखित झालेल्या साधूनीं तीन दिवसाचें उपोषण केले.

सूरीश्वराचा मानवी देह नष्ट झाला पण कीर्तिरूपानें ते अजरामर झाले आहेत.

१४

सूरीश्वराच्या मृत्यूसबंधी एका चमत्काराचे वर्णन त्याच्या समकालीन कवी(ऋषभदास)कडून करण्यात आले आहे. सूरीश्वर ज्या दिवशीं निर्वाण पावले त्या दिवशी रात्रीं अग्निसंस्कार जेथे झाला त्या स्थळी नाटक व नृत्याचा कार्यक्रम होत असलेला एका नागर वाण्याने पाहिला. ही हकीगत गावातील लोकाना कळाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं बरेच लोक त्या बगीच्याकडे गेले. तेथे त्याना नाटारंगासारखे काहीं दृष्टीस पडले नाहीं. पण वाझ आंब्याच्या झाडाना लहान लहान कैऱ्या, पाड आणि पिकलेले आंबे लागलेले दिसले. ज्या झाडाना मोहर फुटत नव्हता त्याना भाद्रपद महिन्यात आंबे लागावे ही मोठी नावीन्यपूर्ण आणि आश्चर्यकारक घटना होती. पुन्हा एका जैन कवीनेच ह्या घटनेचें वर्णन केलें आहे असे नसून काहीं मुसलमान लेखकाकडून याबद्दल उल्लेख करण्यात येतो.

पुष्कळ भाविक जैनाचा या गोष्टीवर विश्वास असेल. उलटपक्षीं या प्रसंगाची बुवाबाजीच्या सौम्य प्रकारात बुद्धिवादी गणना करतील. ते काहीं असो, एक गोष्ट मात्र सत्य आहे: ह्या प्रसगावरून जैन आणि जैनेतर जनतेत सूरीश्वर किती प्रिय होते हे निदर्शनास येते.

सूरीश्वराच्या स्वर्गवासामुळे अकबर व अब्बुल फजल याना फार वाईट वाटले. लाहोरहून सूरीश्वराना भेटण्याकरिता निघालेल्या विजयसेनसूरींना सूरीश्वराच्या स्वर्गवासाची दुःखद वार्ता ते पाटणमध्ये आल्यावर कळली. त्या वेळी त्याना जबर धक्का बसला. वाचा बंद झाली आणि ते मूर्च्छित होऊन जमिनीवर पडले. थोड्या वेळाने ते शुद्धीवर आले. पण मन फार अस्वस्थ आणि कष्टी झाले होते. अन्न गोड लागेना. त्याच्या मनामध्ये वारवार विचार येत. आता मी कोणास वदन करू? जिनशासनाचे कसे होईल? अशा रीतीने विजयसेनसूरि हताश झाले होते. सूरीश्वर हयात होते तोपर्यंत विशेष जबाबदारी विजयसेनसूरींवर पडली नव्हती. आता सबद बोजा त्याच्यावर येऊन पडला. पण त्या धीरपुरुषाने आपल्या गुरूप्रमाणे जिनशासनाची सेवा केली आहे.

१५

'ह्या गच्छामध्ये सुंदर असे हीरविजयसूरि आहेत की ज्याना भट्टारकपणाचा मान मिळाला आहे. ते दोन हजार निग्गन्थ साधूना शिक्षण देतात आणि आपल्या हृदयरुचिर, हितकर आणि जिनवाणीप्रमाणे गोड भाषणाने त्याचे चारित्र्य घडवितात .. ज्या ज्या देशात आणि शहरात या साधूने विहार केला तेथे तेथे श्रीमतानीं सात क्षेत्रामध्ये धनाचा व्यय केला आणि जीवदया, व्रतग्रहण आणि दीनाचा उद्धार अशीं कार्यें करविलीं....हे असे साधु आहेत कीं संयम हेच त्याचे धन आहे. स्वकीय आणि परकीय या भेदभावापासून ते पर असून मित्र आणि शत्रु, दगड आणि रत्न व स्त्री आणि गवत यावर त्याची समदृष्टि असते.' —पद्मसागर.

जगत्गुरु काव्याचे कर्ते पद्मसागर याच्याप्रमाणे कित्येक कवींनीं सूरीश्वरावर स्तुतिसुमने वाहिली असतील. जगत्गुरु हे मोठे युगप्रधान साधु झाले आहेत. त्याचा शिष्यवृंद फार मोठा होता. तो जितका सख्येने मोठा होता तितका प्रभावशालीही होता. सस्कृत आणि गुजराती साहित्यामध्ये त्यानीं भरीव कामागिरी केली आहे. या शिष्यापैकीं कित्येकाना सूरीश्वराकडून स्फूर्ति मिळाली आहे

सूरीश्वर आदर्श जैनसाधु म्हणून प्रसिद्ध आहेत. कित्येक साधु काव्य

करण्यात कुशल असतात. व्याकरणामध्यें कित्येक हुशार असतात. अक्षर-शास्त्र आणि ज्योतिष जाणणाऱ्याची संख्या काही कमी नसते. पण चारित्र्य हेच ज्याच्या विलासाचे वसतिस्थान असते असे सूरीश्वरासारखे साधु सापडणे कठीण. आगमाच्या प्रत्येक ओळीवर त्यांची श्रद्धा होती. वीत-रागाचे ते कट्टे उपासक होते. स्वतःची जीवनबाग फुलविणारे ते एक कुशल माळी होते. मोहविकाररूपी जनावराकडून आपल्या जीवनबागेचा विध्वंस होऊ नये म्हणून वैराग्यदंड घेऊन ते सज्ज झाले. आपल्या बागेतील द्वेषमत्सररूपी दगडाना फेकून देऊन त्यानीं तेथे प्रेमाचे वृक्ष वाढविले आणि त्या वृक्षावर शांतीचे वेल चढविले. या बागेमध्ये जिन-भक्तीचे आणि सम्यक्त्वाचे सुंदर ताटवे ठिकठिकाणी लावले. या बागेमध्ये उत्पन्न होणारी घाण उपवासरूपी अग्नीमध्ये वारवार जाळून टाकली. स्वतःची बागच ते फुलवीत बसले नाहींत तर कित्येकाच्या जीवनबागा त्यानीं फुलविल्या. त्यानी हे सर्व कष्ट का केले ? साधा माळी आपल्या बागेची जोपासना करतो फुलाफळासाठी, हौशी असला तर सौंदर्याच्या वाढीसाठीं. सूरीश्वरांनीं जीवनबागा फुलविल्या केवळ सिद्धशिलेसाठीं.

साधे साधु असताना ते आदर्श शिष्य होते, आणि आदर्श शिष्यानंतर ते आदर्श गुरु झाले. साधूंचे पंचमहाव्रताचे कडक पालन त्यानीं केले. त्या व्रताचे बारीकसारीक नियम त्यानीं पाळले. संन्यास घेतल्यानतर स्वाद ही काय वस्तु आहे हे त्याना ठाऊक नव्हते.* इतर मानवाप्रमाणे खाण्यासाठीं ते जगत नव्हते, जगण्यासाठीं ते खात होते. आणि कर्मक्षय करून आत्म्याचा उद्धार करण्यासाठी ते जगत होते. स्वतःसाठीं निर्माण केलेल्या कोणत्याही वस्तूचा† ते उपयोग करीत नसत. आणि अशा प्रकारे सूक्ष्म गोष्टींकडे लक्ष

* एकदा सूरीश्वराच्या वाट्यास खारट खिचडी आली. त्यानीं तोंड वेडेंवाकडें न करता तिचें सेवन केलें. ज्या गृहस्थाच्या घरून ही खिचडी गोचरीमध्यें आली होती तो उपाश्रयात आला व सूरीश्वरांच्या शिष्यास म्हणाला, 'आमची खिचडी फार खारट झाली आहे. ती आपण खाऊं नये. म्हणून मी मुद्दाम पळत आलों आहें.' हा गृहस्थ येण्याचे अगोदर सूरीश्वराचे जेवण झालें होतें.

† अमदावादमध्यें असताना एक भव्य आसन सूरीश्वरासाठीं तयार करण्यात आले होतें त्यावर ते कधीं बसले नाहींत.

ठेवून कडक आचार पाळण्यात ते कसूर करीत नसत. या नश्वर शरिरावर त्यानीं कधीं मोह ठेवला नाही. वयाच्या साठाव्या वर्षी त्यानीं फत्तेपूर-शिक्रीहून गुजरातकडे विहार केला. वेळोवेळीं ज्या शारीरिक पीडा त्याना होत त्यानीं ते कधीं वैतागून गेले नाहींत तर समभावपूर्वक सर्व दुःखें त्यानी सहन केलीं. गुरूच्या आज्ञेप्रमाणे ते वागत आणि स्वतः गुरु झाल्या-नंतर शिष्यावरहि ते प्रेम करीत.*

अकबराचे मन अहिंसाधर्माकडे वळविण्यात त्यानी जे सुयश मिळविले त्यामुळे ते आज इतके प्रसिद्धि पावले आहेत. श्रीहेमचंद्राचार्या-प्रमाणे ते मोठे व्याकरणकार नव्हते अथवा सिद्धसेन दिवाकराप्रमाणे प्रखर कवि नव्हते. या दोघाच्या मानाने त्याची ग्रंथसख्या फारच लहान होती. तरी पण या दोन साधूप्रमाणे ते विद्वान् होते हे खास. त्याची विद्वत्ता मोज-ण्याचे माप त्याची ग्रथसख्या हे नसून त्यानीं मोठमोठ्या लोकावर पाडलेला

* गुरूविषयीं सूरीश्वराच्या मनात नितान्त आदर होता. एकदा त्याच्या गुरूंनीं त्याना भेटण्यासाठीं लवकर बोलाविलें. सूरीश्वरानीं दोन दिवसाचा उपवास केलेला होता. तरीपण पारण्याच्याच दिवशीं अन्नसेवन करण्याच्या अगोदरच त्यानी गुरूंचा मुक्काम असलेल्या गावीं प्रयाण केलें. श्रावकानीं त्याना फार विनविलें. पण त्या विनत्याचा उपयोग झाला नाहीं.

गुरूपेक्षा शिष्य सवाई अशा अर्थाचा किताब अकबरानें सूरीश्वराच्या पट्टशिष्यास-विजयसेनसूरींस- दिला हीं बातमी सूरीश्वराना समजताच त्याना उचबळून आलें. आपल्यापेक्षा आपला शिष्य सवाई निघावा अशीच कोणत्याही प्रेमळ गुरूची इच्छा असणार. सूरीश्वराच्या गुणग्राहकतेची काही उदाहरणें सागण्यात येतात. अमरविजय नावाचे त्याचे एक शिष्य होते. निर्दोष आहार घेण्याच्या बाबतीत त्याचा फार कटाक्ष होता. त्याना तसा आहार मिळाला नाहीं तर ते चार चार दिवसाचे उप-वास करीत. या साधूच्या हातानें आहार घेतल्यानंतर सूरीश्वराना फार आनंद होत असे. गुणी पुरुषांबद्दल त्याच्या मनांत किती प्रेम होतें हें यावरून सिद्ध होतें सूरी-श्वराच्या विहारामध्यें त्यांनीं अकबराच्या दरबारीं केलेल्या कार्याबद्दल त्याची वार-वार प्रशंसा होई. आणि वस्तुतः त्यांत बराच सत्याश होता. पण निरभिमानी सूरीश्वर विजयसेनसूरि, शांतिचंद्र आणि भानुसिंघ याच्या कार्याची प्रशंसा करीत आणि अकबराच्या मोठेपणाशिवाय हें कार्य अशक्य होतें असें स्पष्ट सागत असत.

प्रभाव हे आहे. अकबरास अहिंसक बनविणे, लहरी सुभेदाराना आपल्या बाजूला वळविणे हीं कार्यें लहान आहेत का? दिवाकराची स्तुति आणि सिद्धहेम व्याकरणाप्रमाणे सूरीश्वरानी अकबराकडून करवून घेतलेल्या 'अमारी घोषणा' जैनाच्या इतिहासात अमर राहतील.

जैनाचा इतिहास म्हणजे नररत्नाच्या खाणीचा इतिहास. या संपन्न खाणीतून कित्येक रत्ने बाहेर पडलीं असतील, आणि पुढें पडतील. त्याच्या स्तुतिपर केलेलीं काव्ये कोणी गात नसतील; मत्सरी इतिहासकारानीं त्याना उजेडात आणले नसेल; पण त्यामुळे त्याचे व्यक्तित्व नाहीसे होत नाहीं. त्याच्या कार्यावर बोळा फिरविला जात नाहीं. त्यानीं हिंदुस्थानचा इतिहास काही प्रमाणात घडाविला आहे; आर्याच्या तत्त्वज्ञानात मौलिक भर टाकली आहे हे निःसशय. जैन राजे, जैन मत्री, जैन साहित्यिक अथवा जैन व्यापाऱ्यापेक्षा जैनाच्या सतवर्गाकडून हे कार्य प्रामुख्याने झाले आहे आणि या जैनसतामध्ये सूरीश्वराचे स्थान मोठे आहे.

त्याचा जन्म ओसवाल कुलामध्ये झाला पण आज ते फक्त ओसवाल-समाजाचे राहिले नाहींत. तपागच्छाचे ते आचार्य होते. मूर्तिपूजा मानणारे ते होते. दिगबराचा आणि त्याचा काहींही सबंध नव्हता. इतके असूनही अखिल जैन जनतेचे ते आज भूषण होऊन बसले आहेत. सद्धर्माची शिकवण दिल्यामुळे कित्येक आर्येतरावर त्याचे ऋण आहे. त्याच्यावर आपला हक्क प्रस्थापित करणारा वर्ग मानवसमाजापेक्षाही मोठा आहे. पाण्यातील मासे, पाजरपोळामधील पशु आणि पिजऱ्यातील पक्षी या सर्वांना सूरीश्वर प्रिय होऊन बसले आहेत. आपणास परिचित नसलेल्या भाषेंत ते त्याचे स्तुतिगान गात आहेत! मानवाच्या मगरमिठीतून सुटका करण्यासाठीं अनेक सूरीश्वर पृथ्वीतलावर उत्पन्न होवोत अशी ते मूकप्रार्थना करीत आहेत!

परिशिष्ट १

बादशाह अकबराचें फर्मान १ लें

अल्ला हु अकबर

जलालुद्दीन महंमद अकबर बादशहा गाजीचे फर्मान. महान् राज्यास मदत करणार, उत्तम स्वभावी आणि गुणवान्, उत्कृष्ट खानाचे नमुन्यासमान अशा मुबारिज्जुद्दीन (धर्मवीर) आझमखानाने जाणावे—

निरनिराळे रीतभातवाले, भिन्न धर्मवाले, विशेष मतवाले आणि भिन्न पंथवाले, सभ्य अथवा असभ्य, लहान किंवा मोटे, राजा अथवा रंक ज्ञानी किंवा अज्ञानी अशा सर्व लोकानीं—ज्याच्यावर परमेश्वराची कृपा होण्याचा संभव आहे. आपली नित्य क्रिया करीत असताना आणि आम्हास दीर्घ आयुष्य मिळण्यासाठी आणि सत्कृत्य करण्यास प्रेरणा मिळण्यासाटी ईश्वराची प्रार्थना करावी. कारण मनुष्यजातीमधून एकास राजपदावर चढविण्याचा आणि सरदारी पेहरवेष अर्पण करण्यात शहाणपणा हा आहे कीं त्या राजाने पोटात दया ठेवून लोकाशीं मित्रता जरी ठेवता आली नाही तरी त्याच्याशीं प्रेमाने वागावे आणि ईश्वराने उत्पन्न केलेल्या प्राणिवर्गावर दया ठेवावी.

यावरून योगाभ्यास करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असे हीरविजयसूरि सेवडा आणि त्याचे धर्म पाळणारे शिष्य, ज्याना आमच्या दरबारामध्ये हजर राहण्याचा मान मिळाला आहे आणि जे आमच्या दरबाराचे हितेच्छु आहेत, त्याच्या योगाभ्यासाचा खरेपणा आणि परमेश्वरशोधाविषयीं त्याची नजर पाहून हुकूम केला आहे की ह्या शहराच्या रहिवासियानीं त्याना अडचण करूं नये, त्याच्या मंदिरात अथवा उपाश्रयात उतारा देऊं नये, त्याचा तिरस्कार करू नये आणि त्याच्या (मंदिराचा अथवा उपाश्रयाचा) काहीं भाग पडला असल्यास कोणत्याही अज्ञानीने अथवा धर्मान्धाने त्याना मानणाऱ्यास अथवा त्याचा पाया टाकणाऱ्यास अडथळा करूं नये आणि पाऊस न पाडणे ही गोष्ट ईश्वराच्या अधिकारातील आहे ती त्याच्यासारख्या ईश्वरास मानणाऱ्यावर लादतात आणि त्याना अनेक प्रकारचे कष्ट देतात अशी गोष्ट यापुढे होऊं नये. आणखी असे पण ऐक-

ण्यात येते कीं हाजी हबीबुल्लाह जे आमची सत्याच्या शोधासंबंधी आणि ईश्वराच्या ओळखीसंबंधीं जाणतात, त्यानी याना (सूरीश्वराना) इजा केली आहे. यामुळे आमच्या पवित्र मनास, कीं जे जगाचा बदोबस्त करणारे आहे, फार वाईट वाटते म्हणून आपण आपल्या राज्यात खबरदारी घ्यावी कीं कोणीं कोणावर जुलूम करणार नाही. त्या बाजूचे हल्लींचे आणि भविष्यकाळचे हाकिम, नबाब आणि राज्याचा संबंध अथवा काहीं भागाचा कारभार पाहणाऱ्या मुत्सद्याचा हा नियम असावा की राजाचा हुकूम जो परमेश्वराच्या हुकूमाचे रूपान्तर आहे — त्यानी त्या हुकूमाच्या विरुद्ध जाऊं नये. हे फर्मान वाचून याची नक्कल ठेवावी, ज्यामुळे ती कायमची सनद होऊन बसेल. इल्लाहि सन ३५ चे अझार महिन्याच्या सहाव्या तारखेचा खूरदाद नावाचा दिवस. मुताबिक २८ माहे मुहरम सन ९९९ हिजरी.

परिशिष्ट २

बादशाह अकबराचें फर्मान २ रें

अल्ला हु अकबर

अबु अल मुजफर सुलतान ...... चा हुकूम उच्च दर्जाच्या निशानीची नक्कल अस्सलप्रमाणे.

या वेळी उच्च दर्जाच्या निशाणीला बादशाहाच्या मेहेरबानींचा सन्मान प्राप्त झाला की सध्याचे आणि भाविष्याचे राज्याधिकारी, जहागीरदार, कोट्यधीश, गुजरातच्या सुभ्यावरील आणि सौराष्ट्र सरकारच्या मुत्सद्यानीं सेवडा लोकानजीक गाय, बैल, म्हैस, रेडा मारण्याच्या आणि चामडें उतरविण्याच्या मनाईबाबत श्रेष्ठ आणि सुखाच्या चिन्हांकित फर्मान आहे. त्या श्रेष्ठ फर्मानात मागील बाजूस लिहिले आहे की—'प्रत्येक महिन्यातील काहीं विवक्षित दिवस तें (मास) खाण्याची इच्छा करूं नये. ते कर्तव्य आणि उचित मानावे. त्याचप्रमाणे ज्या प्राण्यानीं घरांत किंवा झाडावर घरटीं बाधलीं असतील त्याची शिकार करण्यापासून त्याना पिंजऱ्यांत कोंडण्यापासून अलिप्त राहण्याची पूर्ण काळजी घ्यावी.'

त्या माननीय फर्मानात लिहिलेले आहे की— 'योगाभ्यासींमध्यें श्रेष्ठ हीरविजयसूरींचे शिष्य विजयसेनसूरि सेवडा आणि त्याचा धर्म पाळणारे की ज्याना आमच्या दरबारात हजर राहाण्याचा मान मिळाला आहे आणि जे आमच्या दरबारचे खास हितचिंतक आहेत त्याच्या योगाभ्यासाची सत्यता, विशेषता आणि परमेश्वराच्या संशोधनाकडे दृष्टि देऊन (हुकूम झाला) की त्यांच्या देवालयात वा उपाश्रयात कोणीही मुक्काम करू नये. त्याना तिरस्कारू नये. तीं जीर्ण झालीं असतील आणि त्यास मानणारा, चाहाणारा किंवा दानधर्म करणारा यापैकीं कोणी जर त्याची दुरुस्ती करतील किंवा त्याचा पाया घालतील तर अर्धवट ज्ञानी अथवा धर्मान्ध असणाऱ्याने त्याना अटकाव करूं नये. आणि ज्याप्रमाणे परमेश्वराला न ओळखणारे पाऊस अडविणे आणि याप्रमाणे अन्य कामे की जीं पूजनीय जातीचीं (ईश्वराची) कामे आहेत त्याचा आरोप मूर्खपणा आणि बेवकूबीमुळे इंद्रजाल समजून त्या बिचाऱ्या परमेश्वरास मानणाऱ्यावर ठेवितात आणि त्याना नानाप्रकारे त्रास देतात. त्याचप्रमाणे ते ज्या धर्मक्रिया आचरतात त्यामध्ये विघ्ने आणतात. अशा कृत्याचा आरोप ह्या बिचाऱ्यावर न ठेविता त्याना आपल्या स्थानी सुखाने भक्ति करूं द्यावी. त्याचप्रमाणे धर्मक्रियाही करूं द्याव्यात.'

त्यामुळे (त्या) श्रेष्ठ फर्मानाबरहुकूम अंमल करून अशी ताकीद दिली पाहिजे की ह्या फर्मानाची सक्त अंमलबजावणी व्हावी. त्याविरुद्ध कोणीही हुकूम करू नये. स्वतःचे कर्तव्य जाणून ह्या फर्मानाची हेळसाड करूं नये. ता. १ शहर्युर महिना इलाही सन ४६ मुवाफिक ता. २५ महिना सफर १०१० हिजरी.

पेट्याचें वर्णन

फरवरदीन महिना ज्या दिवसात सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशींत संक्रमण करतो. ते दिवस ईद, मेहरचा दिवस, प्रत्येक महिन्यातील रविवार, ते दिवस की जे दोन सुफियाच्या मध्ये येतात; रजब महिन्यातील सोमवार, आबान महिना कीं जो बादशहाच्या जन्माचा महिना आहे. प्रत्येक शमशी महिन्याचा पहिला दिवस, ज्याचें नाव ओमंझ आहे. आणि

बारा पवित्र दिवस की जे श्रावण महिन्यातील शेवटचे सहा आणि भाद्रपद महिन्याचे प्रथमचे सहा मिळून होतात. (पर्युषण)

नशाने आलिशानची नकल अस्सलबरहुकूम.

शिक्का

ह्या शिक्क्यात फक्त खान महम्मुदचे नाव वाचले जाते.

शिक्का

ह्या शिक्क्यात अकबरशाह मुरीरजादा दाराब असे लिहिलेले आहे.

वरील दोन सनदांशिवाय

१ इलाही सन ३५ अझार महिना ६ तारीख खुरदाद २८ मोहरम ९९९ हिजरी.

२ शहर्युर महिना इलाही सन ४६ महिना सफर १०१० हिजरी.

३ फरवरदीन सन ५.

४ शहेरीवर महिना सने इलाही ५५.

५ १९ शहाबान १०२७.

६ ता. २१ अमरदाद इलाही वर्ष १० रजबुल मुरज्जब हिजरी सन १०२४ १७ वी तारीख गुरुवार.

ह्या जहागीर-शहाजहानादीच्या सनदांच्या मूळ नकलाचे अनुवाद व अस्सल फर्माने मिळण्यासारखीं असूनही केवळ विस्तारभयाने दिलीं नाहीत. पोर्तुगीज पाद्री पिनहरोच्या दोन्ही पत्राचे इंग्रजी अनुवाद सुप्रसिद्ध पाश्चात्य इतिहासकार विन्सेंट स्मिथ यांनीं स्वतः श्रीविजयधर्मसूरि यांना पाठविले होते.

भगवान् पार्श्वनाथ

१

फार प्राचीन काळापासून भरतभू ही उच्च संस्काराची खाण म्हणून सुप्रसिद्ध आहे. कारण जगाला तिने अनेक मौल्यवान् रत्ने दिली आहेत. दीन आणि दुःखी प्राण्यानाच नव्हे तर रंकापासून रावापर्यंत सर्वांना सुखा-समाधानाने रहाता येईल, ऐहिक व पारलौकिक कर्तव्ये पार पाडता येतील, असे आर्यसंस्कृतीचे दिव्य तत्त्वज्ञान जगाला देणाऱ्या महापुरुषाचे भरत-वर्ष हे जन्मस्थान आहे.

जीवमात्राच्या आर्तनादाने ह्या विभूतीचे चित्त द्रवले, आणि म्हणून कौटुंबिक स्वार्थ सोडून विश्वकुटुंबाशी ते एकरूप झाले. त्यानीं अमोघ ज्ञान-भांडार उघडून जगाला इष्ट वळण दिले. स्वानुभवाने प्राप्त केलेल्या अमर ज्ञानाची ज्योत तेवत ठेवून जनतेला सत्य, अहिंसा, प्रेम, त्याग, सेवा आणि समतेचे पाठ दिले. अशा प्रकारे त्यानी जगाला विश्वबंधुत्वाचे उच्च कौटुंबिक जीवन शिकविले. विश्वबंधुत्वाचा हा उज्ज्वल प्रवाह हिंसक वृत्तीच्या वणव्यातून, ईर्षा-द्वेषाच्या वावटळीतून आणि विषमतेच्या विस्तीर्ण दरीतून त्यानीं अविरतपणे वाहविला: 'जगा आणि जगू द्या'च्या सुवासाने सारें जग प्रमोदित केले.

प्राणिमात्राचे कल्याण साधणारे तत्त्वज्ञान म्हणजेच धर्म. जगाचे पालन-पोषण आणि विकास करणारी ही दिव्य औषधि आहे. कालान्तराने इन्द्रिय-लोलुपतेमुळे जेव्हा ह्या तत्त्वात स्वार्थाची विकृति शिरते त्या वेळी उज्ज्वल अशा धर्मतत्त्वाला खग्रास ग्रहण लागते. इतकेच नव्हे तर मूलधर्मतत्त्वाला बाजूला सारून त्याची विकृति हाच धर्म होऊन बसतो. अशा वेळी जगाची शांतता डळमळते, लुप्त होऊं पहाणाऱ्या सत्यातूनच महापुरुषाच्या रूपाने दिव्य शक्ति प्रकट होते.

याप्रमाणे इ. स. पूर्वीच्या ८ व्या शतकात परिस्थिति निर्माण झाली होती. श्रमविभागणीच्या हितकारी तत्त्वावर आरूढ झालेला वर्णाश्रमधर्म

उच्चनीचतेच्या भावनेला बळी पडला गेला. आणि त्यातूनच विषमतेची विषारी वेल फोफावली. त्यामुळे चराचरसृष्टीत व्यापलेले परमेश्वराचे स्वरूप शूद्राच्या आणि निरपराध प्राण्याच्या बाबतीत मारक बनले. स्त्रीला मोक्षासाठी अनधिकारी ठरवून विलासाचें साधन बनविण्यात आले. सार्वजनिक आणि वैयक्तिक सुखशातीसाठी गरीब बिचाऱ्या रेड्याला महिषासुर बनवून त्याचा बलि देण्याची अघोरी प्रवृत्ति निर्माण केली गेली. सर्वत्र रक्ताचे पाट वाहू लागले. अशा प्रकारच्या हिसाकाडामुळे देशातील पशुधनाला ओहोटी लागली व यज्ञयागादि कर्मकाडाचे स्तोम अवास्तव माजले.

अशा प्रकारे आत्मविकासाचे तेजस्वी तत्त्व क्रियाकाडाच्या अतिरेकाच्या दडपणाखाली दडपले गेले. म्हणून हिसक वृत्ति आणि विषयलोलुपतापोषक क्रियाकाडाचे जाळे धर्माच्या नावावर विणले जाऊन त्यात जनसमूह माशाप्रमाणें आकर्षिला गेला : बाह्य तप आणि चमत्काराचे अत्यत प्रस्थ माजले.

अशा परिस्थितीत इ. स. पूर्वी ८७७ त अेक महान् विभूति निर्माण झाली. तिनें आपल्या अलौकिक ज्ञानाने ह्या सर्व अधार्मिक आणि अहितकर अशा अज्ञानी क्रियाकाडावर झगझगीत प्रकाश पाडून जनतेला पुन्हा सत्य आणि अहिंसेच्या मार्गाकडे प्रवृत्त केले. आज जवळ जवळ तीन हजार वर्षे होत आलीं परतु त्याचे नाव आणि त्याची शिकवण जनतेच्या अतःकरणात जशीच्या तशीच स्थिर आहे. ती विभूति म्हणजेच भगवान् पार्श्वनाथ होय.

इ.स.पूर्वी ८७७ वे ते वर्ष होते. हिमालयाच्या मानसकन्येने पवित्र केलेल्या वाराणसी नगरीत सुप्रसिद्ध ईक्ष्वाकुवंशीय अश्वसेन नावाचा राजा राज्य करीत होता. तो न्यायी, पराक्रमी व प्रजेचे हित करण्यात तत्पर असे. वामादेवी नामक त्याची सुशील व सुस्वरूप स्त्री होती. 'शुद्ध बीजापोटीं फळे रसाळ गोमटीं' हा निसर्गनियमच आहे. ह्या राणीला एके दिवशी अद्‌भूत स्वप्न पडले. त्यात मंगलसूचक अशा चौदा वस्तु तिला दिसल्या.* एक शुभ्र

---

* चैत्र वा॥ ४ ला मध्यरात्रीं प्राणत देवलोकातून वामादेवीच्या गर्भात एक भाग्यवान् जीवाचें आगमन झालें. पूर्वजन्माच्या तीर्थंकर नामकर्माच्या विशुद्धतेमुळें मति, श्रुत आणि अवधि ह्या तीन ज्ञानानीं तो परिपूर्ण होता.

वर्णाचा सुंदर हत्ती आकाशातून खालीं उतरून आपल्या मुखात प्रवेश करीत असल्याचे पाहून ती जागी झाली. असली मंगलकारी स्वप्नें पाहून तिला आनंद झाला. सुशिक्षित आणि सुसंस्कृत असल्याकारणाने त्यावरून त्रिभुवनीं झेंडा फडकविणारे बालक आपल्या पोटीं येईल असें तिला वाटू लागलें. नऊ मास पूर्ण झाल्यावर पौष शुद्ध १० ला विशाखा नक्षत्रात एका सुलक्षणी पुत्राला तिनें जन्म दिला.* ते तेजस्वी व गोजिरवाणे बाल-स्वरूप पाहून मातापित्याचा हर्ष गगनात मावेना. नामांकित ज्योतिर्विदाच्या संमतीने मुलाचे पार्श्वकुमार असे नाव ठेवले.

प्राचीन काळीं राजा प्रजेच्या सुख-दुःखाशीं समरस होत असल्याने राजाच्या सुखात प्रजाही वाटेकरी होई. त्यामुळें राज्यात चोहोंकडे आनंदी-आनंद पसरला. राजाने बंदीजन मुक्त केले. याचकाना दाने वाटलीं. प्रजेने गुढ्या-तोरणे उभारून नगर सुशोभित केले आणि मोठा उत्सव केला. प्रतिदिनीं राजकुमार चंद्राच्या कलेप्रमाणे वाढत होता. जन्मतः असलेले त्याचे गुण हळू हळू प्रकट होत चालले. बालसुलभ सौजन्याने व प्रेमळतेने तो सर्वांचा आवडता झाला. वामादेवीला तर त्याला कोठे ठेवूं आणि कोठे नको असे झाले असल्यास त्यात नवल कसले ? युवराजाला अनुरूप अशा प्रकारचे शिक्षण देण्यात आले. त्यात आपल्या शौर्याने आणि कुशाग्र बुद्धीने त्याने नाव कमाविले. सर्व प्रकारच्या शिक्षणात पारंगत होऊनही कुमार असंतुष्ट होता व तो पुष्कळ वेळा एकटाच कसल्यातरी चिंतनात तासन् तास निमग्न होई. अशा वेळीं त्याच्या चेहऱ्यावर अपूर्व तेज विलसत असे. कारण ती चिंता मनास पीडा देणारी व्याधि नसून आत्म्यास उन्नत करणारी तन्मयता होती.

२

कालचक्र वेगाने फिरत होते. बाल्यावस्था संपून कुमाराने तारुण्या-वस्थेत पदार्पण केले. राजकार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेण्यास तो

* इन्द्रादि देवांनीं त्याचा जन्मोत्सव अत्यंत थाटानें उजविल्याचें प्राचीन ग्रंथात अतिशय बहारीचें वर्णन आहे

समर्थ बनला. कुमाराच्या पराक्रमाची यशोगाथा सर्वत्र पसरली. परतु पित्याच्या प्रेमळ नजरेला तो अजून बालकच दिसत होता.

एकदा पार्श्वकुमार आपल्या महालात आत्मचिंतनात निमग्न असता अचानक रणभेरीचा नाद त्याच्या कानी पडला. तद्रीभग होऊन कुमार एकदम चमकले आणि पित्याच्या निवासाकडे गेले. पित्याच्या चरणी त्यानी मस्तक ठेवताच शतायु होण्याचा आशीर्वाद देऊन राजा अश्वसेनाने वत्सलतेने त्याच्या पाठीवरून हात फिरविला.

'ही रणभेरी कसली, पिताजी ?' कुमारानी प्रश्न केला.

'कुशस्थलीकडे प्रयाण करतो आहोत आम्ही, कुमार !' राजा अश्वसेन चिलखत चढवीत बोलला.

'इतक्या घाईनें ?' कुमारानी जिज्ञासेने विचारले.

'कर्तव्यपालनासाठी इतकी घाई जरूरीचीच आहे.' राजा बोलला.

'मग आपण स्वतःच कशाला जावयाला पाहिजे ? मी स्वारीवर जातो.' कुमार उत्तरले.

'नाही बाळ. राजकन्येची इभ्रत राखण्यासाठी मला स्वतःलाच गेले पाहिजे.' अश्वसेनाने कारण दाखविले.

'पण पिताजी, मी असताना आपणास रणसग्रामाची चिंता का ? आपण मला आज्ञा द्या. आपल्या आशीर्वादाने मी विजयी होऊनच येईन.' कुमार निश्चयाने बोलले.

'बेटा, तूं लहान आहेस. कलिंग देशाच्या यवनराजाशी हा सामना आहे. कुशस्थलीच्या राजकन्येचे हरण करण्यासाठीं यवनराज चालून गेला आहे. कुशस्थली नगराला वेढून त्याने त्याचा बाह्य जगाशी असलेला सबंध तोडून टाकला आहे. मोठ्या शिकस्तीने त्यातून निसटून मंत्रिपुत्राने कुशस्थलीनरेश प्रसेनजित याचा निरोप आणला आहे. राजकन्या आणि राजघराण्याची अब्रू वाचविण्यासाठी त्याने मदतीची याचना केली असता त्याच्या हाकेला ओ देऊन जुलमाने राजकन्येशीं लग्न लावूं पहाणाऱ्या कलिंगाधिपतीला शासन करण्यास आपण गेलेच पाहिजे.' राजाने खुलासा केला.

'असे ! मग तर ह्या स्वारीवर जाण्यास मीच योग्य आहे. पिताजी, आपण आज्ञा द्या. प्रत्येक पिता आपल्या पुत्राला लहानच समजतो. परंतु छोटासा केसरी प्रचंड हत्तीचें गंडस्थळ नाहीं का फोडीत ?' राजकुमार बाणेदारपणाने बोलले.

पार्श्वकुमाराचा निश्चय पाहून राजा विचारात पडला.

'माझ्या शौर्याविषयीं आपणास शंका तर वाटत नाहीं ना ?' कुमारांनीं विचारले.

'छे छे, बेटा. त्यात कसली शंका ? तुझा पराक्रम सर्वत्र गाजत असता कोण बरे शंका घेईल ? जा. आनंदाने जा आणि विजयी हो. माझा तुला आशीर्वाद आहे.' अश्वसेनानें कुमारास परवानगी दिली.

वडिलाची आज्ञा मिळताच पार्श्वकुमार मातेच्या सदनी गेले. वंदन करून त्यानीं युद्धासाठी तिची अनुज्ञा मागितली. मातृसुलभ वात्सल्यामुळे क्षत्रियाणी असूनही वामादेवीच्या नेत्रात अश्रु चमकूं लागले. व पार्श्व-कुमाराने वामादेवीस तिच्या कर्तव्याचे भान करून दिले नसते तर तिने आपल्या अश्रूंनी त्याना न्हाऊंच घातले असते.

पार्श्वकुमाराचा तो वीरोचित उत्साह जाणून तिनें त्यांच्या कपाळीं कुकुमतिलक लाविला. आशीर्वाद घेऊन त्यानी वंदनपूर्वक मातेचा निरोप घेतला.

मातापित्यानीं आज्ञा दिल्यामुळे कुमाराचा उत्साह फारच वाढला. लाबलाबच्या मजला मारीत सैन्यासह ते कुशस्थलीसमीपच्या जंगलात शिरले आणि मोठ्या शिताफीने त्यानीं कलिंग सेनेला वेढले.

अशा प्रकारे पार्श्वकुमारानीं अचानक वेढल्याचे समजताच यवनराज चपापला. वैयक्तिक विषयलालसेच्या पूर्तीसाठी असंख्य वीराचे बलिदान व्हावे ह्याचे कुमाराना वैषम्य वाटले. अन्याय व जुलमाना प्रतिकार झाला नाही तर प्राणिमात्राची सुखशांति धोक्यात येईल हे ते जाणून होते. म्हणून शक्यतोवर रक्तपात न होता हे प्रकरण मिटविता आले तर पहावे या उद्देशाने त्यानी आपला प्रतिनिधि राजनीतीप्रमाणे कलिंगाधिपतीकडे पाठविला. त्यास यवनराजाने मोठ्या सन्मानाने वागविले.

छावणींतील एका प्रशस्त तंबूत उच्चासनीं यवनराज बसला असून बाजूला त्याचे मंत्री होते. एका प्रशस्त आसनावर वाराणसीचा प्रतिनिधि बसला होता. 'राजन्, राजकुमारीचा विवाह हा तिच्या इच्छेचा प्रश्न आहे. जोरजुलमाने तिच्याशी लग्न करण्याचा प्रयत्न आपल्यासारख्या वीरश्रेष्ठाला शोभत नाही. आपल्या वैयक्तिक लालसेसाठीं शेकडो स्त्रिया विधवा बनाव्यात, अनेक माता विह्वल व्हाव्यात आणि शेकडो वीराचे रक्त सांडले जावे हे योग्य नव्हे. आपण हा अविचार सोडून आपले परंपरागत संबंध कायम ठेवावेत अशी आमच्या महाराजानी इच्छा प्रकट केली आहे. नाही तर एरव्ही स्त्रियाच्या अब्रुरक्षणासाठीं आमच्या तरवारी नेहमी परजलेल्या असतात हे खूप समजावे.' वाराणसीच्या प्रतिनिधीने स्पष्ट शब्दात बजावले.

आवेशात आला कीं मनुष्य विवेकाला तिलांजली देतो परतु अभिनिवेश नाहीसा झाला म्हणजे अविचाराबद्दल तो पश्चात्ताप करतो. राजकन्या प्रभावतीच्या सौंदर्याने यवनराज बेहोष झाल्यामुळे त्याला राजकन्येशिवाय काही सुचत नव्हते. म्हणून त्यानें प्रसेनजिताकडे तिची मागणी घातली. पण प्रसेनजितानें त्यास नकार दिला. त्यामुळे चिडून जाऊन यवनराजाने कुशस्थळीवरही स्वारी केली होती. पार्श्वकुमाराच्या चरचरीत अजनानें त्याच्या डोळ्यावरील विषयाची धुंदी खाडकन् उतरली. वाराणसीच्या आणि कुशस्थळीच्या सैन्याच्या मध्ये आपला चक्काचूर होण्यास वेळ लागणार नाही हें त्यानें ओळखले. कारण पार्श्वकुमाराचा पराक्रम तो जाणून होता. त्याच्या मंत्र्यानींही संधीचा हात स्वीकारण्याबद्दल सल्ला दिली. स्वतः कलिंगराज मंत्र्यासह कुमाराच्या छावणींत गेला. आपणास दुष्कृत्यापासून परावृत्त केल्याबद्दल त्याने कुमाराचे आभार मानले आणि वेढा उठवून तो कलिंगला निघून गेला.

कुशस्थळीचा वेढा उठताच नगराचे दरवाजे उघडले गेले. आपल्या सर्व लवाजम्यासह प्रसेनजित राजा कुमाराचे स्वागत करण्यासाठी त्याच्या छावणींत आला आणि त्याने कुमाराना सैन्यासह मोठ्या सन्मानानें नगरात नेले. मोठा दरबार भरविला. तेव्हा वाराणसीकडून मिळालेल्या या अपूर्व मदतीविषयीं प्रसेनजित राजानें कृतज्ञता व्यक्त केली आणि गहिंवरून प्रेमभराने कुमारास गाढ आलिंगन दिले. नगरात चोहींकडे

कुमारानी दाखविलेल्या उदारतेचे, कर्तव्यनिष्ठा, शौर्य आणि समयज्ञता याचे गुणगान सुरू होते. ते राजकन्या प्रभावतीच्या कानीं पडताच तिच्या हृदयमंदिरातही कुमाराचा प्रवेश झाला. कुमाराच्या पराक्रमाचे यशोगान ह्यापूर्वीच तिच्या कानावर अनेकदा पडल्यामुळे त्याच्याविषयी तिच्या मनात अनुराग उत्पन्न झाला होता. त्यातच ह्या विजयप्रसंगाची भर पडल्यामुळे तिने पार्श्वकुमाराशींच विवाह करण्याचा निर्धार केला व तो सखीकडून मातापित्याला कळविला.त्यामुळे त्या दरबारात राजकन्येचे पाणिग्रहण करण्याची राजाने कुमाराना विनति केली. कुमार दचकले.

'राजन्, राजघराण्याची इभ्रत राखण्यासाठी वडिलाच्या आज्ञेने आपल्या हाकेला ओ देऊन मी आलो. ह्या प्रलोभनाने मी निघालो नव्हतो.' कुमारानी जबाब दिला.

'हे प्रलोभन नव्हे, कुमार. राजकन्येने तसा निश्चय केला आहे. आणि म्हणूनच तिला पदरात घेण्याची आपणास विनंति केली आहे.' राजा बोलला.

राजाचा हा खुलासा ऐकून कुमार निरुत्तर झाले. त्यानीं राजा प्रसेनजिताचा निरोप घेतला आणि दरबार संपला. विजयी पार्श्वकुमारानीं वाराणसीत प्रवेश केला. आपल्या आवडत्या कुमाराचे स्वागत करण्यासाठीं प्रजा अत्यंत उत्सुक झालेली होती. सर्व नगर चित्रविचित्र ध्वजापताकानीं सुशोभित करण्यात आले होते. सडासंमार्जन करून सुवासिनी आरत्या घेऊन उभ्या होत्या. धीर व गंभीरपणे कुमारानी नगरात प्रवेश केला. कुमारिका आणि सुवासिनींनी कुंकुमतिलकाने कुमाराचे कपाळ सुशोभित केले. वृद्ध स्त्रियानीं बोटाचा कडका मोडून कुमाराची दृष्ट काढली. कुमारानी माता-पित्याच्या चरणीं मस्तक नमविले. त्यानाही कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. रक्ताचा एकही थेंब न सांडता विजय प्राप्त करणाऱ्या त्या वीरपुत्राला जन्म दिल्याच्या मातेच्या आनंदाचे कोण बरे वर्णन करूं शकेल ?

थोड्याच दिवसानीं कुशस्थळीहून प्रसेनजित राजा प्रभावतीसह वाराणसीत आला. त्याने प्रभावतीचा निर्धार राजा अश्वसेन व वामादेवी याना कळविला. वामादेवीला सून म्हणून प्रभावती फार आवडली. कुमाराचा स्वाभाविक कल निवृत्तिमार्गाकडेच होता. तरीसुद्धा कुमाराचे मन वळविण्याचा त्यानी बराच प्रयत्न केला. मातापित्याच्या विशेष आग्रहाला मान

देऊन कुमारानीं लग्नास संमति दिली. इ. स. पूर्वी ८५७ त राजघराण्यास साजेशा दरबारी थाटाने पार्श्वकुमाराचा राजकन्या प्रभावतीशी विवाह लावण्यात आला.

३

एकदा राजवाड्याच्या मनोऱ्यावरून पार्श्वकुमार नगरशोभा पहात होते. जगातील वैचित्र्य व प्राणिमात्राची सुखासाठीं चाललेली धडपड ह्याचा त्याच्या मनात विचार चालला होता. स्वार्थ, कपट, इंद्रियलोलुपता इत्यादिकाच्या जाळ्यात स्वतःला गुरफटून घेऊन प्राणी आत्मघात करून घेतो. ह्या मोहपाशातून सुटण्याचा मार्ग प्राचीन मुमुक्षूनी अवलंबलेला आहे. तो प्राप्त करण्यासाठीं ह्या सुखोपभोगापासून अलिप्त व्हावे, त्या मार्गाचे स्वानुभवाने संशोधन करून आपण जगाला मार्गदर्शक व्हावे, असे विचारतरंग त्याच्या हृदयसागरात उसळत होते. परमशांतीच्या या मार्गात विकृति शिरल्यामुळे भेसूर बनलेल्या धर्माचे चित्र डोळ्यापुढे येताच त्याच्या अंगावर शहारे आले.

वाराणसीसमीपच्या जंगलात एक तपस्वी होता. त्याच्या तपस्तेजाविषयीं नगरात अनेक आख्यायिका पसरल्या होत्या. त्यामुळे त्याच्या दर्शनास जाणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस सारखी वाढत होती. आज राजरस्त्यावरील दर्शनोत्सुक लोकाचा कोलाहल जास्त वाढलेला असल्यामुळे पार्श्वकुमाराचे लक्ष तिकडे वेधले गेले. चौकातून स्त्रीपुरुषाची सारखी रीघ लागली होती. निरनिराळ्या वस्त्रप्रावरणानीं अलंकृत झालेले, नैवेद्य व पूजासामग्री घेऊन हजारो स्त्रीपुरुषाचा हा जनसमूह कोठें निघाला ह्याचें पार्श्वकुमाराना कोडे पडले. त्यानीं आपल्या सेवकास तपासासाठीं पाठविले.

'गावाच्या बाहेर कमठ तपस्वी आले आहेत. महाराज, त्याच्याच दर्शनाला हे सर्व लोक निघाले आहेत.' नौकराने येऊन सांगितले.

तपस्वी हा शब्द ऐकताच त्याच्या डोळ्यापुढे एका तेजस्वी शांत मूर्तीचे दृश्य उभें राहिले.

तपस्वी म्हणजे जगाला सुखी करण्यात आपले सर्व जीवन वेचणारे

महापुरुषच होत. त्याची वाणी अमृतापेक्षाही मधुर असून त्याची छायाही चंद्रापेक्षा शीतल भासणार असें त्याना वाटले.

'त्याच्या पदरजाने खरोखर कृतकृत्य झाले हें वाराणसी शहर.' कुमार मनाशीच बोलले. त्यानीं घोडा मागविला आणि योगिराजाला पहाण्यासाठीं त्यावर स्वार होऊन अनुचरासहित निघाले.

भर दुपारची वेळ होती. सूर्य आपल्या प्रखर किरणानीं भूमितलाला दग्ध करीत होता. उत्साहातिरेकामुळे पार्श्वकुमाराना त्याचे कांहींच वाटले नाहीं. अथाग लोकसमूह तेथे उसळला होता. एका झाडाखालीं त्यानीं घोडा थांबविला. आपण केलेल्या सर्व कल्पना फोल ठरलेल्या पाहून ते आश्चर्यानें चकितच झाले. कल्पवृक्ष म्हणून आश्रयाला जावे तो कांटेरी वृक्ष निघावा, तहानेने व्याकुळ झालेल्यास सरोवर दिसावे आणि तें मृगजळ ठरावे, तशीच राजकुमाराची स्थिति झाली.

अंगाला राख फासलेला एक कृश तपस्वी व्याघ्रचर्मावर बसलेला होता. त्याच्या चोहोबाजूला अग्नि धडधडत असून वरून पडणारीं सूर्याची प्रखर किरणे तो तपस्वी सहन करीत होता. त्याचे लालबुंद डोळे मंगळाप्रमाणें लुकलुकत होते. उत्तमोत्तम पक्वान्नानीं व फळानी भरलेलीं ताटे नैवेद्य म्हणून भक्तजन त्याच्या चरणीं समर्पण करीत होते. तपस्व्याच्या चमत्काराच्या अनेक दंतकथा भक्तसमूहात पसरलेल्या होत्या. तापस कमठाची अहंकाराने ताठर बनलेली नजर भक्तजनाकडे तुच्छतेनें वळली होती. लोकाची कमठावर पूर्ण श्रद्धा बसली होती. कुमार तेथे आल्याबरोबर लोकानीं त्याचा जयजयकार केला. त्याबरोबरच तपस्व्याच्या नावाचाही जयध्वनि लोकात दुमदुमला.

तपस्व्याने आपली अहंकारपूर्ण नजर राजकुमारावर टाकली. कुमारानीं घोड्यावरूनच भक्तिभावाने जमलेल्या लोकसमूहामधून नजर फिरविली. धर्मकल्पनेची ही विटंबनाच होय असें त्यास वाटले. ह्या कष्टचमत्काराला धर्म म्हणावयाला त्याचे मन तयार होईना. तपस्व्याची नजर त्याच्याकडे वळली. मिस्किलपणाने हसणारे त्याचे डोळे तपस्व्याने ओळखले. राजकुमाराचा उद्धटपणा त्यास असह्य वाटला. रोषाने त्याचा चेहरा उग्र

बनला. डोळ्यातून अग्नीच्या ठिणग्याच उडताहेत कीं काय असे वाटलें. क्रोधाग्नीमुळे त्याची मुद्रा अधिकच भेसूर दिसली.

'राजा धर्मरहित असला तर प्रजाही अधर्मी बनते नाहीं?' व्यंगोक्तीने तपस्वी राजकुमाराना ऐकू जाईल एवढया मोठ्याने बोलला. लोकांच्या चेहऱ्यावरही राजकुमाराच्या उद्धटपणाबद्दल तीव्र नापसतीचा भाव उमटला होता.

'धर्म आणि अधर्म कशाला म्हणावा तोच तर मोठा प्रश्न आहे, तपस्वीजी.' घोडा पुढे आणीत कुमार बोलले.

'शरीरशोषण म्हणजेच तपश्चर्या. तपश्चर्या करणे हाच धर्म आहे. साठ साठ हजार वर्षे तपश्चर्या करणारे विश्वामित्रासारखे मुनि होऊन गेले आहेत.' तपस्वी बोलला.

'तपाचा उद्देश?' कुमारानीं प्रश्न केला.

'स्वर्गसुख आणि मोक्षप्राप्ति.' तपस्व्याने उत्तर केलें.

'केवळ शरीरशोषणाने मोक्षप्राप्ति अथवा स्वर्गसुख कसे प्राप्त होईल? तापसराज, अन्नासाठीं तडफडणारे शेकडो प्राणी काय स्वर्गाला जातील? समुद्रात बुडून अथवा वणव्यात होरपळून निघणारे अगणित प्राणी काय ह्या उच्चस्थानीं पोहोचतील? केवळ कायक्लेश हा कधींच धर्म बनू शकत नाहीं.' कुमार शांतपणे बोलले.

'वा! धर्म जाणण्याचा मोठा आव आणला आहेस कीं! राजविलासात निमग्न राहणाऱ्यानींही तपश्चर्येच्या आणि धर्माच्या गोष्टी माझ्यासारख्याला शिकवाव्यात अं?'

योग्याच्या या स्पष्टोक्तीने जनतेचा त्याच्याविषयींचा आदर द्विगुणित झाला. त्यानीं पार्श्वकुमाराकडे उपेक्षित नजरेने पाहिले.

'स्वर्गलोकांतील सुखाच्या प्राप्तीसाठीं जर हे तप आणि शरीरशोषण आहे तर इहलोकीं ऐषारामात लोळणारे मोठमोठे लक्ष्मीपुत्र आणि राजेरजवाडे याना त्याची कांहींच आवश्यकता नाहीं ना?' पार्श्वकुमारानीं मार्मिक सवाल टाकला.

तपस्वी घोटाळला, निरुत्तर झाला आणि चिडला.

'जगाच्या आदिकालापासून आमचे महान् ऋषिमहर्षि सांगत आले आहेत ते का खोटे आहे? तुझ्या नास्तिकतेची अगदी सीमा झाली. कुमार, असल्या नास्तिकतेमुळेच जग दुःखी आले आहे. धर्म सांगण्याचा हा अव्यापारेषु व्यापार सोड.' विझत चाललेल्या अग्नीवर फुंकर टाकीत कमठ बोलला. त्याबरोबर त्याच्या मनातील आग भडकत होती. लोकांनाही पार्श्वकुमाराचा संताप आला होता. राजकुमार असल्यामुळेच थोडी मर्यादा ठेवली होती. नाही तर जनसमूहाने त्याची दुर्दशाच केली असती.

'प्राचीन महर्षि मूर्ख नव्हेत. त्यांनी सांगितलेले क्रियाकांडही खोटे नाहीं. परंतु त्यातील मर्मच नेमके आम्हीं गाळले आहे. क्रियेच्या जोडीला ज्ञान हे अत्यावश्यक आहे. क्रियारहित ज्ञान पांगळे आहे. तर ज्ञानरहित क्रिया आंधळी आहे. अज्ञानाने केलेल्या कायक्लेशाने आम्ही मानवजीवन व्यर्थ गमावतो हे समजले पाहिजे.

तप म्हणजे इच्छाविरोध. ह्याचे बाह्य आणि अभ्यंतर असे दोन प्रकार पडतील. बाह्य तप म्हणजे इंद्रियांचे दमन करणे आणि अभ्यंतर तप म्हणजे मनःसंयमन व आत्मविकास करणे हे होय. बाह्य तप आणि अभ्यंतर तप ही परस्परावर अवलंबून असतात. लोण्याचा गोळा जराशी आंच लागताच जसा विरघळतो तसें विषयाचे नुसते स्मरण झाल्याने इंद्रियें भडकतात आणि मार्गभ्रष्ट होतात. इंद्रियांना आत्मविकासाला सहायक बनविणे हाच बाह्य तपाचा मुख्य उद्देश असतो. त्यासाठीं इंद्रियदमन हा एकच उपाय आहे. इंद्रियांचे संयमन हे साध्य नसून आत्मजागृति करण्याचे ते साधन आहे. इंद्रियदमन होऊं शकले कीं मनःस्थिरता प्राप्त करणे आवश्यक असते. ती अभ्यंतर तपाने होते. मनःस्थिरतेने दृष्टि अंतर्मुख बनते. अंतर्मुख दृष्टि आत्मसंशोधन करते व हृदयाची मलिनता नाहींशी करते. त्यामुळे द्वेष, दुराग्रह, मिथ्या दृष्टि, क्रोध, मान, माया, लोभ आणि मोह वगैरेचा क्षय होऊन सम्यग्दृष्टि प्राप्त होते आणि आत्मचिंतनात चित्त स्थिर होऊन एकाग्रता वाढते. आत्मविकास जोपर्यंत होत नाहीं तोपर्यंत कितीही उग्र तपश्चर्या केली तरी ती सर्व व्यर्थ आहे.

शरीर आणि आत्मा भिन्न आहेत. शरीर हे नश्वर आहे आणि आत्मा अमर आहे. आत्मज्ञान बाजूला सारून केलेलें शरीराचें पोषण आणि शोषण

व्यर्थ आहे; कारण शरीर हे साधन आहे, साध्य नव्हे. शरीरशुद्धीसाठीं तपादि क्रिया आणि आत्मविकासासाठी ज्ञान अशी ही जोडी आहे. ज्ञान-युक्त तपश्चर्येने शरीरशुद्धि होऊन मनोबल वाढते आणि मनोबल वाढले म्हणजे वृत्ति अतर्मुख होते व आत्म्याच्या विराट स्वरूपात विराम पावते. यालाच आत्मानद म्हणतात. त्याचे वर्णन पुढे वाणीने होऊ शकत नाही. त्याच वेळीं दिव्य ज्ञानाची प्राप्ति होते. या कैवल्यज्ञानप्राप्तीनतर ज्ञानौघ सारखा वाहू लागतो. सर्वसामान्य लोक तिला प्रासादिक वाणी म्हणतात. असा तपस्वीच उग्र तपाचा खरा अधिकारी असतो; कारण आत्मसुखात तो लीन असल्याने देहाविषयी त्याला यत्किंचितही आसक्ति नसते. आणि कायक्लेशाचे त्यास महत्त्वही वाटत नाहीं. त्याच्याशिवाय इतरानी केलेले असले अज्ञान तप म्हणजे धर्माचे विडबनच होय. पार्श्वकुमारानीं तपश्चर्येचा उद्देश स्पष्ट शब्दात सागितला.

कुमाराच्या मुखावर अपूर्व तेज झळकत होते. जनसमूह मुग्ध बनला होता. त्याना आपल्या युवराजाविषयी अभिमान वाटला. पार्श्वकुमाराच्या जयजयकाराची गगनभेदी गर्जना अतराळात उसळली.

तपस्व्याला पार्श्वकुमाराचे म्हणणे अमान्य नव्हते. परंतु त्याला मानापमानाचा मोह आवरेना. आपल्या भक्तासमोर झालेला अपमान त्याला कोठून सहन होणार ? क्रोध अनावर झाल्यामुळे तो थरथर कापूं लागला.

'राज्यलोभाने अनेक निर्दोप माणसाचे खून पाडणाऱ्यानी धर्माचा उपदेश करावा ! वाहवा ! खासा न्याय ! कसाबाने धर्म शिकवावा असेच नाहीं का होत हे ?' दुसरे, एक चंदनाचे खोड हातीं घेत तपस्वी बोलला. लोकाना ते म्हणणे काहीसे पटल्यासारखे दिसले.

'तृष्णा आणि इद्रियलोलुपता ही क्षत्रिय असो कीं संन्याशी दोघानाही सारखीच मारक आहे. परंतु अन्याय्य आक्रमणाला नाहीसे करण्यासाठीं केलेलें युद्ध धर्मच आहे. असल्या युद्धात अनेकाचा संहार होतो ही गोष्ट खरी आहे, परंतु हा सहार नसून जगाच्या कल्याणासाठीं स्वेच्छेने केलेले बलिदान आहे. जनताजनार्दनाची प्राणसहित सर्वस्व अर्पण करून केलेली ही पूजा आहे. तपस्वीराज, निष्काम कर्मवीराची ही अपूर्व तपश्चर्या आहे.' कुमारानीं समर्पक उत्तर दिले.'

'कोणत्या धर्माची आम्ही विटंबना करतो?' कुमाराचें म्हणणे योग्य अर्थानें घेण्याऐवजीं रागानें बेभान झालेल्या कमठ तापसाने वितडवादाला आरंभ केला. एक चंदनाचें खोड त्याने अग्नींत खुपसले.

ह्या चंदनाच्या खोडानेंच त्याचा निर्णय दिला. कुमारांनीं आपल्या सेवकाकडून तें जळतें खोड बाहेर काढविले आणि जपून त्याचे दोन भाग करविले. तों त्यातून एक भुजग निघाला. जीव कासावीस झाल्यामुळे तो सारखा तडफडत होता. शेवटची घटका मोजणाऱ्या त्या दुर्दैवी प्राण्याला कुमारानें नवकारमंत्र ऐकविला. मंत्रश्रवणाच्या त्या पवित्र वातावरणात तो सर्प तन्मय झाला. शातपणाने त्याचे प्राणोत्क्रमण झाले. कुमारानी एक दीर्घ निश्वास सोडला.

'धर्माच्या नावावर अशा कितीतरी प्राण्याचें निष्कारण बलिदान होत असेल! अशा प्रमादाचरणाने का कधीं मोक्ष मिळेल?' असे म्हणून दुःखित अंतःकरणाने कुमार परतले.

अगोदरच युवराजाच्या अपूर्व ज्ञानाने लोकसमूह आकर्षित झालेला होता. त्यातच सर्पप्रकरणाची भर पडली. कुमाराविषयी त्याच्या मनातील पूज्यभाव वृद्धिगत झाला. त्यामुळें ज्याची पूजा करण्यासाठीं ते जमले होते त्याच तपस्व्याची विटंबना करून ते निघून गेले.

तपस्वी क्रोधाने बेभान झाला होता. अपमानाचे शल्य त्याच्या अंतः-करणात वज्रलेप होऊन बसले आणि सूडाची न विझणारी ज्वाला त्याच्या अंतरंगात भडकली. काहीं कालानतर सूडाच्या तीव्र भावनेंत त्याचे प्राणो-त्क्रमण झाले.

४

पार्श्वकुमाराना राज्याभिषेक करण्याची आपली इच्छा दरबारात राजा अश्वसेनाने मन्त्र्यापुढे प्रकट केली. सर्वांनीं त्याला संमति दिली. राजाने कुमाराना बोलावून आपली इच्छा कळविली. परंतु कुमार मौनच राहिले. राजानें पुन्हा विचारले तेव्हा त्यानी उत्तर दिले, 'तात, हे राज्य घेऊन मी काय करूं? भोग आणि विलासाच्या प्राप्तीने मनुष्याची तृप्ति कधींच झाली नाहीं. आणि म्हणून ह्यापासून मी दूर राहूं इच्छितो.'

'पण बेटा, राज्यावर आरूढ होऊनही लोकांचे कल्याण करता येत नाही का ?' अश्वसेनाने विचारले.

'आपण म्हणता ते खरे आहे; परंतु ते राज्यापुरतेच, आणि ते फक्त ऐहिकच: पण त्यामुळे माझे कार्यक्षेत्र संकुचित बनते आणि सत्यमार्गाच्या प्रसारात मोठी अडचण येते. अपवाद जर सोडले तर सर्व जनता ह्या साधनानीं विषयलोलुपच बनते. त्याचा त्याग न करता जनतेला सत्यधर्म कसा दाखविता येईल ? राज्याची जबाबदारी कोणीही घेईल परंतु धर्मात शिरलेली विकृति घालविण्यासाठी कोण बरे पुढे येईल ? माझा अतर्नाद मला त्यासाठींच बोलावितो आहे. पिताजी, सारे विश्व माझे कुटुंब आहे. आणि मला राजवैभवाचा वीट आला आहे.' कुमारानी नम्रपणे पण निश्चित स्वरात सांगितले.

राजाने कुमाराची मनःस्थिति ओळखून ती चर्चा तेथेच थांबविली.

एकदा वसंतोत्सवानिमित्त पार्श्वकुमार राजोद्यानात गेले. निसर्गदेवता सुंदर वस्त्रे परिधान करून बसली होती. कोकिळा कुऊ कुऊ आवाजाने वसंताचे स्वागतगीत गात होत्या. मंद मंद वायुलहरी त्याला सुस्वराची साथ देत होत्या. लता आनंदाने डोलत होत्या. फुले हसत होतीं. परंतु पार्श्व-कुमाराना त्यात काहीच आनंद वाटला नाहीं. मनुष्याच्या विचारलहरी नेहमी हृदयाच्या तारेवर छेडल्या जातात हेच खरे.

'इतकी हसरी वनश्री, पण ही सुद्धा कोमेजणार ना ? काळाच्या कराल दाढेतून कोण बरे सुटणार आहे ? जीवनाचे सार्थक करण्यासाठीं वैराग्य-रंगात मग्न होत चाललेल्या पार्श्वकुमारानी अशा प्रकारच्या विचारात मग्न असतानाच उद्यानातील महालात प्रवेश केला. त्याचे चित्त जास्त अस्वस्थ झाले म्हणून ते एका आसनावर बसले. समोरच्या भिंतीकडे त्याचे लक्ष गेलें. भगवान् श्रीनेमिनाथ आणि महासती राजिमतीचे ते चित्र होते. त्या चित्राकडे एकाग्रतेने त्यानीं पाहिले आणि त्यात ते अगदीं तन्मय झाले.

भगवान् नेमिनाथ-राजिमती याचे जीवन त्याच्या डोळ्यापुढे चल-चित्रपटाप्रमाणे उभे राहिले.

भगवान् श्रीनेमिनाथ हे यादववंशांतील समुद्रविजय महाराजाचे पुत्र आणि श्रीकृष्णाचे चुलत भाऊ होते. शौरीपुरीला त्याचे राज्य होते. कंस-

वधानंतर जरासधाच्या त्रासाने यादवानीं द्वारका नगरी वसविली. नेमिनाथ हे व्हानपणापासून अत्यंत बलवान् व पराक्रमी होते. मथुरेच्या उग्रसेन राजाच्या मुलीशीं त्याचे लग्न ठरले. मोठ्या लवाजम्यासह वऱ्हाडही निघाले. सर्व व्यवस्था श्रीकृष्ण जातीने पहात होते. वऱ्हाड मथुरेच्या सीमेवर पोहोचले. नेमिनाथाचा रथ गावाजवळ आला. इतक्यात पशूचे आक्रदन त्यानीं ऐकले. एका वधशाळेत असंख्य पशुपक्षी कोंडलेले त्यानीं पाहिले. त्याच्या आक्रंदनाने भगवान् श्रीनेमिनाथाचे हृदय द्रवले.

'कशासाठीं हे पशु जमविले आहेत येथे ?' श्रीनेमिनाथानीं सारथ्याला विचारले.

'आपल्या लग्नाच्या मेजवानीसाठी.' हसत हसत सारथी बोलला. नेमिनाथाच्या हृदयावर तीव्र आघात झाला. 'मला असले लग्न कर्तव्य नाहीं' असे म्हणून त्या मूक प्राण्याची त्यानीं सुटका करविली आणि रथ तसाच मागे परतविला. लोकानीं समजाविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परतु व्यर्थ. ससाराच्या बाह्य सौंदर्यावरून त्याचे मन उडाले. राजिमतीला हें कळले. रथ मागे फिरलेला पहाताच ती मूर्छित पडली. शुद्धीवर आल्यानतर तिने एकच आकान्त केला. मातापितानी समजविण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला. त्यावर राजिमती करारीपणाने बोलली, 'पिताजी, ज्या दिवशीं नेमिकुमाराशी माझा वाङ्निश्चय झाला त्याच दिवशी माझे खरे लग्नही झाले. हा समारभ केवळ लोकरीतीसाठी आहे. त्याचेच पावलावर पाऊल टाकण्याचा पत्नीधर्म मी पार पाडणार आहे.' असे म्हणून सती राजिमतीनेही घर सोडले आणि रैवताचल पर्वतावर घनघोर तपश्चर्या करणाऱ्या नेमिनाथाकडे ती गेली. केवलज्ञानाच्या द्वारा जगाच्या सत्य स्वरूपाचा नेमिनाथाना साक्षात्कार झाला होता. त्याच्या हस्तें राजिमतीने भागवती दीक्षा ग्रहण केली. जगात ज्ञानाचा प्रकाश आपल्या प्रासादिक वाणीने पसरवीत भ. नेमिनाथ गिरनार पर्वतावर गेले आणि शुक्लध्यानात तन्मय होऊन त्यानी निर्वाणपद प्राप्त केले.

ह्या जीवनचरित्रात तन्मय झालेल्या पार्श्वनाथाना भगवान् नेमिनाथाचा आदर्श फारच आवडला. केवलज्ञानाच्या प्राप्तीसाठी त्यानींही दीक्षा घेण्याचा निश्चय केला.

मातापितराना त्यानी आपला निश्चय कळविला. त्यानीं कुमाराना

समजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परतु शेवटी कुमारानीच सर्व कौटुंबिक जनाची समजूत घातली. सतत एक वर्षपर्यंत तीर्थंकरपदाला शोभेल असे अगणित दान देऊन त्यानीं आपल्या भावी जीवनाची मुहूर्तमेढ रोविली.

भर तारुण्यात पार्श्वकुमार राजसमृद्धि सोडून स्वपरकल्याणासाठी घराबाहेर पडले. त्यानीं स्वहस्तेच केशलुचन केले. ते दृश्य पाहून त्याच्यावरील प्रेमामुळे त्याचीं मातापिता, पत्नी, आतेष्ट आणि प्रजाजनाच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहू लागल्या. इ. स. पूर्वी ८४७ त सर्व मायापाश तोडून त्यानीं सन्यासदीक्षा घेतली. त्याच वेळीं त्याना मनःपर्यवज्ञान उत्पन्न झाले. त्याच्याबरोबर इतर ३०० राजानीही दीक्षा घेतली. हा दीक्षासमारंभ फारच थाटानें साजरा झाला.

५

श्रीपार्श्वनाथ हे मति, श्रुत, अवधि आणि मनःपर्यव ह्या चार प्रकारच्या ज्ञानानी युक्त असूनही जगाला उपदेश देण्याच्या खटपटींत पडले नाहीत. त्यानी एका साधकाची भूमिका घेतली. जोपर्यंत केवलज्ञान प्राप्त केले नाही तोपर्यंत जगाला त्यानी उपदेश केला नाही. पूर्ण आत्मविकासानंतर स्वभावतः स्फूर्तीने वाहणारा ज्ञानौघ अज्ञानमय विकृतीला वाहून नेण्यास समर्थ असतो उपदेशकाच्या आत्मसामर्थ्यावरच जगाच्या हिताहिताचे प्रमाण अवलबून असते. जगाचे हित साधण्याची भावना दोन प्रकारची असू शकते. एकीत जगाच्या कल्याणाची खरी तळमळ असते. आणि त्यासाठी साधक प्रथम अतःशुद्धि करून पूर्ण आत्मविकास साधतो आणि केवलज्ञानप्राप्तीनंतर जगाच्या कल्याणाकडे वळतो. अशा साधकानाच अवतारी पुरुष म्हणतात. कारण त्याच्या निर्दोष वाणीतून सहज श्रवणाच्या उपदेशाने जगात सुख, शाति आणि पवित्रता नादते. दुसऱ्या प्रकारच्या लोकात प्रसिद्धीची आणि मोठेपणाचीच हाव असल्यामुळे फक्त विद्वत्ता प्राप्त करून तिच्या योगाने जनतेवर आपले वर्चस्व ठेवण्यासाठीं ते सारखे झटत असतात. त्याच्या कोरड्या पाडित्याला केव्हा केव्हा जग भुलते. परतु त्याने जगाचे हित मात्र कधीच होत नाही.

श्रीपार्श्वनाथ हे अन्तर्बाह्य तपाच्या द्वारा आत्मज्योत प्रज्वलित करण्याच्या प्रयत्नाला लागले. इद्रियदमनाचा कडक मार्ग त्यानीं स्वीकारला. शरिरावरील ममत्व हटत चालले. शहर, अरण्य, श्मशाने, ओसाड गावे अशा विविध ठिकाणीं ते ज्ञान आणि ध्यान ह्यात मग्न होऊन विहार करीत होते. कोणी लोक त्याना आदराने वागवीत तर कोणी पाखंडी समजून नानाप्रकारे छळ करीत. या सर्व अनुकूल आणि प्रतिकूल प्रसंगात समभाव ठेवून श्रीपार्श्वनाथ आत्मविकास साधीत होते.

एकदा ते असेच एका गावाबाहेरील अरण्यात झाडाखालीं उभे होते. आत्मानंदात ते अगदीं एकरूप झाले होते. इतक्यात एकाएकी काळ्या मेघानी आकाश भरून आले. मदोन्मत्त हत्तीप्रमाणे ढगानीं तुफान गर्दी माजाविली होती. आकाश कोसळून पडते की काय अशा मेघगर्जना सुरू झाल्या. काडाड् काडाड् विजा चमकूं लागल्या. प्रलयकालच आला कीं काय असे वाटू लागले. मेघातून जलबिंदु इतक्या तीव्र वेगाने खालीं घसरत कीं जणू गोफणीतून सुटलेले दगडच. धनुष्यापासून सुटणाऱ्या शरापेक्षाही अधिक वेगाने ते खाली येत होते. अशा प्रकारे सारखा मुसळधार पाऊस सुरू झाला. प्रकृति जणूं काय आपल्या सर्व बळासह महात्म्याची सत्त्वपरीक्षाच करीत होती. हिंस्र श्वापदेही त्रस्त होऊन निवाऱ्यासाठीं इतस्ततः धावत होती. परतु झाडाखालीं ध्यानस्त असलेले श्रीपार्श्वनाथ मात्र जसेच्या तसे शान्त होते, मेरूपर्वताप्रमाणे अचल होते. पाणी झपाट्याने वाढू लागले. अल्पावकाशात तेथे एक मोठे सरोवरच दिसूं लागले. पाणी त्याच्या गुडघ्यावर चढत चढत नासिकेपर्यंत पोहोचले.

हा निसर्गाचा कोप नव्हताच. वासनेच्या ज्वालेत भस्म झालेल्या कमठ तपस्व्याचा तो उपसर्ग होतो. रोमरोमात सूडाची आग धुमसत असलेला तो मृत्यूनतर मेघमाळी नावाचा दानव बनला होता. ध्यानस्त असलेल्या श्रीपार्श्वनाथाना पाहून त्याचे मागील वैर ताजे झाले. अपमानाबद्दल सूड उगविण्यासाठीं त्याने हा प्रलय निर्माण केला होता.

जगात सन्मार्गांत काटे पसरविणारे दुर्जन पुष्कळ असले तरी त्याच्या त्या काट्यावर स्वतःचा देह टाकून लोकाना सुमार्ग मोकळा करून देणारे

सज्जनही कांहीं असतातच. ह्या सज्जनाच्या अशा त्यागावरच जगाचें सुख आणि समाधान अवलंबून असतें.

कमठ तपस्व्याच्या अग्नीतून निघालेला अर्धदग्ध सर्प शुभ ध्यानानें धरणेन्द्र नावाचा नागदेव बनला होता. त्यानें प्रचंड नागाचें रूपानें येऊन आपली फणा मुनींच्या शिरावर धरली. प्रचंड वृष्टीचें तांडवनृत्य संपलें. अशा भयंकर परिस्थितींतही श्रीपार्श्वनाथाची ती समता आणि निश्चलता पाहून लज्जित झालेला मेघमाळी त्याच्या चरणीं लीन झाला.

ध्यान पूर्ण झाल्यावर मुनींनी डोळे उघडले. एका बाजूला सहायक धरणेन्द्र उभा असून दुसऱ्या बाजूला खलभुजंग मेघमाळी होता. मुनींनीं सारख्याच अमृतमय दृष्टीनें मेघमाळी आणि धरणेन्द्र यांच्याकडे पाहिलें. उपकारक म्हणून धरणेन्द्राविषयीं त्यांना प्रेमभाव वाटला नाहीं किंवा पीडा देणारा म्हणून मेघमाळीविषयीं त्यांच्या अंतःकरणांत तिरस्कारही उत्पन्न झाला नाहीं. अशा प्रकारें इंद्रिय आणि मन ह्यांना संपूर्ण ताब्यांत आणल्यामुळें त्यांचा अंतर्गत विकास होत गेला. पूर्ण ज्ञानमय असलेल्या आत्म्यावरील ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय, मोहनीय आणि अंतराय या चार कर्मांचा पडदा बाजूला सरला. मेघाच्या आवरणांतून निसटलेला सूर्य जसा प्रखर तेजानें तळपतो त्याप्रमाणें हा पडदा बाजूला सरताच त्यांचा आत्मा अनंतज्ञान आणि अनंतदर्शनानें तळपूं लागला. त्या अलौकिक उज्ज्वल स्वरूपांत त्यांच्या भावना विराम पावल्या आणि अखिल विश्व साक्षात् दिसूं लागलें. यालाच केवलज्ञानाची प्राप्ति अथवा आत्मसाक्षात्कार म्हणतात.

दीक्षेनंतर अवघ्या चौऱ्याशीं दिवसांनीं चैत्र कृ. १४च्या दिवशीं श्रीपार्श्वनाथ सर्वज्ञ बनले. भगवान् महावीराच्या पूर्वी 'अहिंसा परमो धर्मः'च्या मंत्रानें साऱ्या भरतवर्षाला पवित्र करणारे भगवान् पार्श्वनाथच होत.

६

ज्ञानदृष्टि प्राप्त झाल्यावर लागलीच सर्वज्ञ अशा पार्श्वनाथप्रभूंनीं आत्मानुभव जनतेपुढें ठेवण्यास सुरुवात केली. आतां त्यांची साधकदशा संपली

होती. आपल्या संपूर्ण ज्ञानाने जगासाठीं हितकारी असा मार्ग त्यानीं खुला केला. दीन, दुःखी अशा जीवमात्राला सान्त्वन आणि समाधान देणाऱ्या परमकल्याणकारी मार्गाचा उपदेश देत ते काशी, कौशल, पचाल, मगध, मालव, अवंती, महाराष्ट्र, अंग, वग, कलिंगादि सर्व देशात ते हिंडले. अशा प्रकारे अखिल भरतखंडात सत्यमार्गाचा त्यानीं प्रसार केला.

विहार करीत करीत ही महान् विभूति वाराणसी नगराबाहेरील उद्यानात आली. अशोक वृक्षाच्या खालीं एका दिव्य आसनावर ती तेजस्वी मूर्ति विराजमान झाली होती. चेहेऱ्यावर सूर्यासारखे तेज चमकत होते. चद्राची शीतलता चोहोकडे फैलावत होती. मुखाभोवतीं तेजाचे एक वलय पसरलेले दिसत होते. स्त्रीपुरुषच नव्हे तर प्राणिमात्र प्रभूंच्या मुखातून बाहेर पडणारीं मुक्ताफळे वेचण्यात आतुर झाले होते. त्या पवित्र वातावरणात ईर्ष-द्वेषाचे लेशमत्रही अस्तित्व दिसत नव्हते.

'हे भव्य जीवानो ! जगाचे सत्यस्वरूप जाणण्यासाठीं अंतर्दृष्टि प्राप्त करा. जगाचे वैचित्र्य किंवा जडाचें मायाजाल ह्यात फसूं नका. मुग्ध बनूं नका. उत्पाद, व्यय आणि ध्रुव ह्या तीघावरच जगाची उभारणी आहे. आत्मा स्वतः ज्ञानी आहे, मुक्त आहे, परतु कर्मजन्य आवरणाने त्याची अनन्तशक्ति दडपली गेली आहे. ह्या आवरणामुळेच देव, मनुष्य, तिर्यच, नारकी इत्यादि भेद पडतात. स्त्रीपुरुष अथवा उच्चनीचतेच्या भावना भासतात. म्हणून आत्म्याचे सत्य स्वरूप ओळखा. अज्ञान हेच सर्व दुःखाचे मूळ आहे. ज्ञानाचा प्रकाश मिळवा. प्राणिमात्राच्या ठिकाणीं आत्मा ओळखा. मी आणि तू हा भेदभाव आत्मार्थी ओळखतच नाहीं. धर्माशी आत्मविकासाचा सबध आहे. सर्व प्राणिमात्र धर्माचे अधिकारी आहेत. पौद्गालिक सुख कृमिकीटकही प्राप्त करतात; त्यासाठी मानवदेह कसा असूं शकेल ?

'इद्रियजन्य सुखाने कधींहि तृप्ति होत नाही. त्याचा त्याग हेच तृप्तीचे साधन जाणा. हे भव्य जीवानो, हे समजा, विचार करा आणि आचरण करा.'

अशा प्रकारें भगवान् पार्श्वनाथाची विश्वहितकर वाणी जीवमात्राच्या आत्म्याला शातवीत होती, क्रियाजड बनत चाललेल्या मानवाना ज्ञानाचा

प्रकाश पोहचवीत होती. समता, विश्वबंधुत्व 'जगा आणि जगूं द्या' चा अमोल संदेश पसरवीत होती. शेकडों कायक्लेशाच्या उग्र तपश्चर्या करणाऱ्या तपस्व्यानी शुद्ध मार्गाची दीक्षा घेतली.

त्याच्या उपदेशाचा स्वीकार करून त्याप्रमाणे आचरण करणारे अनेक लोक निघाले. प्राचीन तीर्थंकराप्रमाणे साधु, साध्वी, श्रावक आणि श्राविका हे चार विभाग त्यानी पाडले. त्याच्या आत्मविकासाच्या चढत्याउतरत्या श्रेणी ठरविल्या. त्याच्या आचरणानेच धर्माचे अस्तित्व रहाणार असल्याने त्यास तीर्थ (तारणारे) ही संज्ञा दिली. अशा प्रकारे तीर्थाची स्थापना केली म्हणून त्याना तीर्थंकर म्हणतात. रागद्वेषादि षड्रिपूना जिंकणारे म्हणून लोक त्याना जिन म्हणू लागले. त्यामुळे त्याच्या अनुयायाना जैन म्हणतात. ह्या कालचक्रात एकदर चोवीस तीर्थंकार झाले असून त्यात भगवान् पार्श्वनाथ हे तेविसावे होत. ज्याच्या आदर्शावरून त्यानी आपला जीवनमार्ग निश्चित केला ते भगवान् नेमिनाथ बाविसावे तीर्थंकर होत

स्वच्छंदी आचरण म्हणजे अधःपाताला आमंत्रण होय हे जाणून त्यानीं चतुर्विध सघाचे आचरण आणि नियम निश्चित केले.

अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह हीं चार मुख्य व्रते सागून जीवनासाठीं अनिवार्य असले अपवाद सोडून पूर्णाशाने त्याचे पालन करणे साधु आणि साध्वींसाठी आवश्यक ठरविले. त्यास पूरक असे इतरही काही आचार सागितले. त्यानतर श्रावक आणि श्राविका या दोन संघाना जीवन आणि व्यवहार ह्या दृष्टीने अपवाद सोडून ह्याच व्रताची आराधना सागितली.

सुरवातीला पार्श्वनाथाच्या शिष्यसमुदायात (१) आर्यदत्तस्वामी, (२) आर्यघोपस्वामी, (३) विशिष्टस्वामी, (४) ब्रह्मस्वामी, (५) सोमस्वामी, (६) श्रीधरस्वामी, (७) वीरसेनस्वामी, (८) भद्रयशस्वामी, (९) जयस्वामी, (१०) विजयस्वामी हे दहा मुनि श्रमणगणाचे मुख्य होते. म्हणून त्यास गणधर म्हणतात. हे तत्कालीन मोठे ज्ञानी आणि सर्वशास्त्रपारगत विद्वान् होते. 'उत्पादव्ययध्रौव्ययुक्त सत्' ह्या सूत्राधारे पार्श्वनाथानीं सागितलेला उपदेश विस्ताररूपाने समजविण्याचे महान् कार्य ह्यानींच केले. ह्या उपदेशात द्रव्यपर्यायरूपाने सर्व स्याद्वादाचे स्वरूप अन्तर्भूत होते. इ. स. पूर्वी आठव्या शतकात पार्श्वनाथाचे अनुयायी

म्हणून १६ हजार साधु, २८ हजार साध्वी, १ लाख ६४ हजार श्रावक आणि ३ लाख २७ हजार श्राविका होत्या असे जैन शास्त्रातून वर्णन आहे. त्यात ३५७ चौदापूर्वांचे ज्ञानी, १४००० अवधिज्ञानी, ७५० केवलज्ञानी असून १००० वैक्रियलब्धिसंपन्न होते.

अशा प्रकारे ह्या शिष्यसमुदायाच्या द्वारा सत्यधर्माची ध्वजापताका चोहोकडे फडकवीत सर्व आयुष्य जनकल्याणात वेचणारा हा महापुरुष सम्मेतशिखर ह्या पर्वतावर आला. बाह्य गोष्टींचा त्याग करून त्यांनीं एका महिन्याची ध्यानसमाधि धारण केली. त्याच्याबरोबर इतर ३३ मुनीही शुक्लध्यानात निमग्न झाले. श्रावण शु ८ ला भगवान् पार्श्वनाथ निर्वाण पावले.

भरतवर्षांत जेव्हा क्रियाकांडाचे प्रस्थ विशेष माजून ज्ञानमार्ग लोपत चालला होता अशा वेळीं ज्ञानमार्गाची ज्योत प्रज्वलित करून शुष्क क्रियाकांड आणि कायक्लेशाला आत्मिक गुणविकासाच्या सन्मुख करण्याचे महान् कार्य त्यानीं केले.

प्राणिमात्राच्या ठिकाणीं असलेल्या आत्म्याची ओळख देऊन त्यानी विषमतेला फाटा देवविला. नानाप्रकारच्या बाह्य देवाना खूष करण्याच्या प्रयत्नात गढून गेलेल्या जनसमूहाला त्यानीं आतील ईश्वराची ओळख पटवून दिली.

आत्मा हाच परमात्मा बनतो. ह्या निसर्गसिद्ध तत्त्वप्रणालीला त्यानीं अपूर्व चालना दिली.

कमठे धरणेन्द्रे च स्वोचितं कर्म कुर्वती ।
प्रभुस्तुल्यमनोवृत्तिः पार्श्वनाथः श्रियेस्तु वः ॥

परिशिष्ट

भगवान् पार्श्वनाथांच्या चरित्राबावत जैन संप्रदायांतील ग्रंथांत असलेलीं मतांतरें

दिगंबर	श्वेतांबर
१ इद्राने चकाकत असलेला पार्श्व पाहून हे नाव ठेविले.	१ वामादेवीने (पार्श्व) सभोवताली सर्प फिरत असलेला पाहून हे नाव ठेविले.
२ कमठाचा जीव नरकातून निघून महिपालपूरचा राजा बनतो आणि मग पचाग्नि तपस्वी बनतो.	२ कमठाचा जीव नरकातून निघून एक ब्राह्मणपुत्र बनून नंतर पंचाग्नि तपस्वी बनतो.
३ पार्श्वनाथ लग्नच करीत नाहीत.	३ पार्श्वनाथाचे राजा प्रसेनजिताची कन्या प्रभावती इच्याशीं लग्न होते.
४ अग्नींतील सर्प धरणेद्र आणि कमठ ज्योतिष्कदेव बनतो.	४ सर्प पाताळात धरणेद्र बनतो आणि कमठ मेघमाळी नामक असुर बनतो.
५ ज्योतिष्कदेव उपसर्ग न करता प्रभूचे समोवसरण पाहूनच सन्मार्गी वळतो.	५ मेघमाळी उपसर्गानंतर सुमार्गी लागतो.
६ उपसर्ग त्याना काशीलाच होतात.	६ उपसर्गानंतर भगवान् काशीस जातात.
७ भगवान् मोक्षास गेले तेव्हा त्या जागी इद्राने स्तूप केला असा कोठींच उल्लेख नाहीं.	७ अशा प्रकारचा उल्लेख आहे.
८ गर्भावतरणतिथि वैशाख कृ. २.	८ ग. ति. चैत्र कृ. ४.
९ जन्म पौप कृ. ११.	९ जन्म पौप कृ. १०.

१० दीक्षेच्या वेळीं भगवान् ज्या पालखींत बसले तिचे नांव विमला.

११ दीक्षेच्या वेळेपासून प्रभु नग्न होते.

१२ केवलज्ञानाची प्राप्ति दीक्षेनतर चार महिन्यानीं चैत्र कृष्ण चतुर्थीस.

१३ निर्वाणतिथि श्रावण शुद्ध ७.

१४ तीर्थकराची माता सोळा शुभ वस्तु गर्भधारणेनतर पहाते.

१० पालखीचें नाव विशाला.

११ भगवानानीं देवदुष्य वस्त्र धारण केले होते.

१२ केवलज्ञानाची प्राप्ति ८३ दिवसानंतर चैत्र कृष्ण चतुर्दशीला.

१३ निर्वाणतिथि श्रावण शुद्ध ८.

१४ ती १४ शुभ वस्तु पहाते.

टीप :— साधुमार्गी सप्रदाय पार्श्वनाथाना वैराग्य राजिमती-नेमिनाथाचें चित्र पाहून झाल्याचें न मानता भगवान् नेमिनाथाच्या जीवनाविषयीं विचार करीत असता उत्पन्न झाल्याचें मानतो. बाकी सर्व बाबतींत सर्व जैन ग्रंथाची एकवाक्यता आहे.

र्थांचे नाव विशाला.

नानीं देवदुष्य वस्त्र

नाची प्राप्ति ८३
कृष्ण चतुर्दशीला.

धि श्रावण शुद्ध ८.
शुभ वस्तु पहाते.

भगवान् पार्श्वनाथांबाबत ऐतिहासिक भ

आसेतुहिमाचल भरतवर्षात सर्वत्र विद्यमान अस
नाथाचीं अगणित मंदिरे आणि त्याचे चमत्कार याविषयीं
लेल्या दंतकथा त्याच्याविषयीं असलेला जनतेचा आदरव
आहेत. सर्वच जैनमंदिराना पारसनाथाचें मंदिर म्हणण्याच
वाक्प्रचार आणि बिहारात भगवान् पार्श्वनाथाच्या पादस्पर्शाने प
एका मोठ्या टेकडीला पारसनाथाचा पहाड हे शेकडो वर्षां
नामाभिधान पार्श्वनाथाचे श्रेष्ठत्व व त्याचें ऐतिहासिकत्व
नाहीं काय ?

बंगालमध्ये अजूनपर्यंत पूर्ण शाकाहारी राहिलेली सराक
पार्श्वनाथाचीच उपासक म्हणविते. तिची संख्या तेथे एक ला

भगवान् पार्श्वनाथाच्या महात्म्याचा आणि ऐतिहासिकते
नव्हे काय ?

× × ×

भगवान् पार्श्वनाथानंतर अडीचशे वर्षांनीं भगवान् म
धर्मतत्त्वाचा पुनरोद्धार केला. त्या वेळीं पार्श्वनाथाच्या
आचार्य केशीस्वामी हयात होते. भगवान् महावीराचे
गौतमस्वामी याच्याशीं त्याची गांठ पडली. एकाच धर्मा
ताना काल आणि परिस्थित्यनुरूप त्याच्यात थोडासा फरक
त्याचीं प्रश्नोत्तरे झालीं. गौतमस्वामींनीं दिलेल्या समाधान
आचार्य केशीस्वामी महावीराच्या श्रमणसंघात मिसळले.
बुद्धपूर्व जैनधर्माचे अस्तित्वाचा त्याचप्रमाणे पार्श्वनाथाना ऐ
देणारा पुरावा असल्याने मुद्दाम थोडक्यात येथें उद्धृत

...नेमिनाथाचे

गणधर गौतम —काळ आणि परिस्थिति लक्षात घेऊन भगवान् महावीरानी चौथ्या महाव्रताचेच ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह असे दोन विभाग केले. त्यामुळे मूळ तत्त्वात काहींसुद्धा फरक होत नाहीं.

आ. केशीस्वामी— भ. पार्श्वनाथ तर सचेलक होते मग भ. महावीर अचेलक का ?

ग. गौतम— वस्त्रत्याग किंवा वस्त्रस्वीकार ह्याबाबत काहीच मतभेद नाहीं. कारण लोकाच्या योग्य विश्वासासाठीं आणि संयम्पालनासाठीच बाह्य वेषाचे प्रयोजन आहे. निश्चयाचे दृष्टीने तर हीं सर्व साधने कुचकामाची असून दर्शन, ज्ञान, चारित्र्य हीच मोक्षप्राप्तीची खरीं साधने आहेत. नाहीं तर भगवान् पार्श्वनाथ आणि भगवान् महावीर ह्याची प्रतिज्ञा सारखीच आहे.

हा संवाद म्हणजे बुद्धपूर्व जैनधर्माचे अस्तित्वाचा आणि भ. पार्श्वनाथाचे ऐतिहासिकतेचा मौलिक पुरावाच आहे.

× × ×

नवव्या शतकात होऊन गेलेल्या आचार्य अमितगतीनीं धर्मपरीक्षा ह्या नावाच्या ग्रंथात १८ व्या अध्यायात ६८ वा श्लोक असा दिला आहे—

रुष्टः श्रीवीरनाथस्य तपस्वी मौडिलायनः ।
शिष्यःश्री पार्श्वनाथस्य विदधे बुद्धदर्शनम् ॥

× × ×

जिस समय महात्मा बुद्ध उन पांच भिक्षुओंके साथ थे उस समय उन्होंने बौद्धधर्मकी नीवारोपण नही किया था जैसे कि वे स्वयं स्वीकार करते है । अतः निःसन्देह उक्त भिक्षुगण जैन थे और उनके साथही महावीरने जीवन व्यतीत किया था जैसे कि सर भाण्डारकरभी भ० बुद्धकों एक समय जैन मुनि हुवा बतलाते है । —जै. हि. भा. १ पृ.५.

× × ×

शिलालेख

ओरिसा प्रातात उदयगिरीचे स्थान हत्तीगुफेच्या शिलालेखामुळे सुप्रसिद्ध आहे. इ. स. पूर्वी २१२ वर्षी सम्राट् खारवेलने करविलेल्या शिल्परचनेत

'पार्श्वनाथांच्या अनेक मूर्ति असून त्याच्या जीवनातील सर्व प्रमुख घटना त्यांनीं त्यांत अत्यंत चातुर्याने खोदविलेल्या आहेत.

—बंगाल, बिहार ओरिसा जैन स्मारक पृ. ८९.

× × ×

मथुरेच्या कंकालीटीलेच्या खोदकामात इ. स. पहिल्या शतकात बनलेल्या पार्श्वनाथाच्या अनेक मूर्ति उपलब्ध असून एक जैन स्तूपही सापडलेला आहे. त्याचा काळ पार्श्वनाथाच्या अगदी जवळचाच असल्याबद्दल बुल्हर, विन्सेंट स्मिथ प्रमुख पाश्चात्य इतिहासकाराचे मत आहे.

आधुनिक भारतीय विद्वानांचे अभिप्राय—

(१) सुप्रसिद्ध भारतीय विद्वान् डॉ. टी. के. लड्डू, बी.ए., पीएच्.डी., एम्. आर. ए. एस्., संस्कृत शिलालेखादि विषयाचे प्रोफेसर, क्वीन्स कॉलेज, बनारस, आपल्या बनारसच्या व्याख्यानात म्हणाले— यह प्रायः निश्चित है कि जैनमत बौद्धमतसे प्राचीन है और इसके संस्थापक चाहे पार्श्वनाथ हो चाहे कोई तीर्थंकर जो महावीरसे पहिले हुये हो.

—जैन लॉ. पृ. २२३.

× × ×

(२) प्रख्यात दार्शनिक विद्वान् साहित्याचार्य ला. कन्नोमलजी, एम्. ए., सेशन्स जज्ज, धोलपूर, एका लेखात लिहितात— श्री. पार्श्वनाथजी जैनियो के तेइसवे तीर्थंकर है। इनका समय ईसासे ८०० वर्ष पूर्वका था।

× × ×

(३) हिन्दी विश्वकोशाचे संपादक श्री. नगेंद्रनाथ बसू, प्राच्यविद्या-महार्णव, सिद्धान्तवारिधि, शब्दरत्नाकर, हरिवंशपुराणाच्या प्रस्तावनेत लिहितात— जैनधर्म कितना प्राचीन है इसकी आलोचना करनेका यह स्थान नहीं है। तब इतना कह देनाहि बस होगा कि जैनसंप्रदायके तेइसवे तीर्थंकर श्रीपार्श्वनाथस्वामी स्वीष्टाब्दसे ७७७ वर्ष पहले मोक्ष पधारे थे. —जैनधर्मविषयमे अजैन विद्वानो की सम्मतियाँ पृ. ५१.

× × ×

(४) एक लब्धकीर्ति बंगाली विद्वान् डॉ. विमलचरण लॉ, एम्. ए., पीएच्. डी., एफ्. आर. एच्. एस्., महावीराच्या पूर्वी जैन धर्मांचा वैशालींतील प्रचार लिहिताना म्हणतात— "पार्श्वनाथजीद्वारा स्थापित हुये धर्म का प्रचार भारत के उत्तरपूर्वी क्षत्रियों में और खासकर वैशालीके निवासियों मे था.' —क्षत्रिय क्लैन्स इन बुद्धिस्ट इण्डिया पृ. ८२.

× × ×

(५) दक्षिणभारतीय विद्वान् प्रो. रामस्वामी आयंगार, एम्. ए., लिहितात— 'भगवान् महावीर के निकटवर्ती पूर्वज पार्श्वनाथ थे जिनका जन्म ईसासे पहले ८७७मे हुवा था। उनका मोक्षकाल इसासे पूर्व ७७७ मे माना जाता है। '—स्टडीज् इन् साउथ इण्डियन जैनिझम् भा. १ पृ. १२.

× × ×

(६) प्रसिद्ध राधास्वामी महर्षि श्री. शिवव्रतलालजी वर्मन्, एम्. ए., एल्एल्. डी., भ. पार्श्नाथाचे अस्तित्व मान्य करून म्हणतात— 'जैनियोमेसे कोई पार्श्वनाथकी पूजा करते है, कोई महावीरकी। इन सबमें मतभेद बहुत कुछ नही। —जैन धर्मका महत्त्व पृ. १४.

× × ×

(७) डॉ. वेणीमाधव बारुआ, डी. लिट्., हेही श्रीपार्श्वनाथजींना श्रीमहावीराचे पुरोगामी तीर्थंकर म्हणून स्वीकारतात. —हिस्ट्री ऑफ दी प्रीबुद्धिस्टिक इण्डियन फिलॉसफी पृ. ३७७.

× × ×

(८) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक— बौद्ध धर्माच्या स्थापनेपूर्वी जैन धर्मांचा प्रसार होत चालला होता! ही गोष्ट विश्वसनीय आहे. —केसरी ता. १३।१२।१९०४.

पाश्चात्य विद्वानांचे अभिप्राय—

(१) डॉ. हर्मन जेकोबी, एम्. ए., पीएच्.डी. (बोन, जर्मनी), आपल्या जैन सूत्राज् च्या प्रस्तावनेत म्हणतात— ...The Parshwa was a historical figure admitted by all as very probable.

—Jain Sutras S. B. E XLV Intro. P.XXI.

× × ×

(२) डॉ. जार्ल चारपेन्टियर, पीएच्. डी., उत्तराध्ययनसूत्राच्या प्रस्तावनेत लिहितात—We ought also to remember both that the Jain religion is certainly older than Mahavira, his reputed predecessor Parshwa having almost certainly existed as a real person and that consequently the main points of the original doctrine may have been codified long before Mahavira.

—Uttaradhyayansutra, Intro. P.21.

× × ×

(३) सर पेट्रिक फैगन, के. सी. आय. ई., सी. एस. आय., एका धर्मसंमेलनात म्हणाले होते की जैन तीर्थंकरापैकीं अंतिम दोन भ. पार्श्वनाथ आणि भ. महावीर निःसन्देह वास्तविक व्यक्ति आहेत कारण त्याचा उल्लेख अशा साहित्यग्रन्थातून येतो कीं जे ऐतिहासिक आहेत.—रिलिजन्स ऑफ दी एम्पायर पृ. २०३.

× × ×

(४) फ्रेंच संस्कृतज्ञ डॉ. गिरनॉट्‌ म्हणतात— "There can no longer be any doubt that Parshwa was a historical personage." —एसे ऑन दी जैन बिब्लॉग्राफी.

× × ×

(५) हॉम्सवर्थ हिस्ट्री ऑफ दी वर्ल्ड भा. २ पृ. ११९८— They (Jains) believe in a great number of prophets of their faith anterior to Natputta and pay special reverence to this last of these Parshva or Parshvanath. Herein they are correct in so far as the latter person-

ality is more than mythical He was indeed the royal founder of Jainism (776 B.C.)

× × ×

(६) बर्लिन विश्वविद्यालयाचे सुप्रसिद्ध विद्वान् प्रो. डॉ. हेल्मुथ व्हॉन ग्लाझेनॉप, पीएच्.डी., यांनी जैनमान्यता विश्वसनीय असल्याचे स्वीकारून भगवान् पार्श्वनाथाची ऐतिहासिकता सार्थ असल्याचे दाखविले आहे. —डर जैनिसमस पृ. १९–२१.

× × ×

वरील सर्व अभिप्रायांशी आम्ही पूर्णतः सम्मत नाही, फक्त भगवान् पार्श्वनाथाचे चरित्र असल्याने त्यापुरते थोडेसे अभिप्राय वाचकासाठी दिले आहेत. बाकी २२ तीर्थंकरही ऐतिहासिक आहेत. त्याच्याविषयींचे आधार त्याच्या चरित्रासोबत यथानुक्रमाने देऊं. —लेखक.

वन्दे वीरम्

महाराष्ट्र जैन साहित्य प्रकाशन समिति, चांदवड

[स्थापना वी. स. २४६८]

आम्हा जैनाचा गौरवशाली इतिहास असूनही आम्ही निःसत्त्व का बनत चाललो ?

शेकडो नव्हे असख्य जैनवीरानी रणागणावर पराक्रम गाजविला असताही जैनाच्या अहिंसेच्या शिकवणीने भरतवर्ष गुलाम झाला असा खोटा आक्षेप का येऊ लागला ?

जैन लेखकाचे ग्रंथ वगळल्यास अर्धमागधी साहित्याची अगदी केविलवाणी स्थिति होते याची आपणास कल्पना तरी आहे काय !

जैन दर्शनातील सिद्धान्त विज्ञानशास्त्रावर (Science) अधिष्ठित आहेत असे आता नव्या शोधानी सिद्ध होऊं लागले आहे याचा आपणास कधीं अभिमान वाटला आहे काय ?

अशी अनुकपनीय परिस्थिति होण्यास कारणे म्हणजे तागडीच्या मोहात तरवारीस पारखे बनलो, प्राचीन साहित्याची उपेक्षा केली, इतिहाससंशोधन केले नाहीं.

श्रीराम, भगवान् बुद्ध, महंमद पैगंबर, येशू ख्रिस्त याचीं चरित्रे जगप्रसिद्ध आहेत. पण प्रभु नेमिनाथ, पार्श्वनाथ किंवा महावीराच्या चरित्रांस विकृत स्वरूप देऊन इतिहासकारानीं त्यास अगदीं गौण स्थान दिले आहे याबद्दल आम्हास खंतही नाहीं !

ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम या संतपुरुषांची ओळख आबालवृद्धास आहे; पण संस्कृत आणि अर्धमागधी साहित्याचे सम्राट् हेमचंद्राचार्य, सिद्धसेन दिवाकर, उमास्वाति, वाचक समंतभद्र, कुंदकुंदाचार्य इत्यादिकाचा आम्हास परिचय नाहीं !

अशोक, अकबर, शिवाजी याची थोरवी सर्व गातात; पण सम्राट् संप्रति, खारवेल, कुमारपाल याच्या थोर कार्याची आपणास जाणीवही नाहीं !

ताजमहालनिर्माता शहाजहान व नूरजहान अमर झाली आहेत; पण शिल्पकलेंत अत्युच्च स्थान पटकावणाऱ्या आबूवरील जैन मंदिराचे निर्माते वस्तुपाल, तेजपाल व विमलमंत्री अजून अंधःकारातच खितपत पडले आहेत!
जैन बंधूंनो, या सर्व श्रेष्ठ पुरुषांना त्यांच्या योग्य स्थानीं प्रस्थापित करणें हे आपले कर्तव्य ठरत नाही काय? हे कर्तव्य करण्यासाठी आम्हीं वरील समिति नुकतीच स्थापिली आहे. समितीने हातीं घेतलेले कार्य मोठे आहे. तें एकट्याचें नाहीं. लेखकानी पुढे येऊन जैनसाहित्य निर्माण केले पाहिजे. धनिकानीं ते प्रकाशित होण्यासाठीं मदत केली पाहिजे. आम्हास विश्वास वाटतो की समितीने हातीं घेतलेल्या कार्यास जैन जनता उत्तेजन देईल.

— कार्याची रूपरेषा —

(१) समितीतर्फे वर्षातून दोन पुस्तके मराठीत प्रकाशित करण्याचे तूर्त ठरविले आहे. दुसरे पुस्तक लवकरच प्रसिद्ध केले जाईल.

(२) समितीस ५ रुपयांची देणगी देणारा गृहस्थ समितीचा **आजीव सभासद** मानला जाईल. त्यास समितीचे प्रत्येक **पुस्तक पाऊणपट** किमतीस मिळेल.

(३) समितीस ५१ रु. **देणगी** देणारे गृहस्थ समितीचे **आश्रयदाते** समजले जातील व त्याना प्रत्येक **पुस्तक फुकट** पाठविले जाईल

(४) कार्यकारी मंडळ आजीव सभासदातून व आश्रयदात्यातून निवडले जाईल. तूर्त खालील गृहस्थाचे कार्यकारी मंडळ निवडले आहे

अध्यक्ष— **श्री. भोगीलाल रामचंद्र शहा**, सोलापूर.
उपाध्यक्ष— ,, **मणिलाल भोगीलाल शहा**, अमळनेर.
खजिनदार— ,, **शांतिलाल रामचंद्र आबड**, चांदवड.
मंत्री— ,, **शांतिलाल खेमचंद शहा**, चांदवड.
,, **रमणलाल दामोदरदास मेहता**, मालेगाव.

पत्रव्यवहारचा पत्ताः— मंत्री, महाराष्ट्र जैन साहित्य प्रकाशन समिति
चांदवड (जि. नासिक)